**प्रकरण २**

## भारतीय स्त्रीवाद आणि स्त्रीवादी विचारक

पार्श्वभुमी:-

संकल्पना ह्या संज्ञाचा वापर समाजशास्त्रज्ञांनी समाज व सामाजिक वागणूक ह्यांचा पृथ्थकरणात्मक प्रकार म्हणून केला आहे. ह्या कल्पनांच्या वापरातून समाजशास्त्रज्ञांनी अशा वर्गाचा विकास केला आहे. जे समाजातील वर्तणुकीचे शास्त्रोत्क संपूर्ण चौकशी करण्यासाठी साधने म्हणून वापरले जातात. लिंगाच्या अभ्यासामध्ये अशा बऱ्याच संकल्पनांचा समावेश आहे ज्या वागणुकीचा अभ्यास करण्याच्या रचनेची तरतूद करतात. उदा. लिल मॅथ्यूज हिने १९८४ मध्ये स्त्रीलिंगची बांधणी ह्या विषयावर अभ्यास करतांना लिंग ह्या संकल्पनेचा विकास पहिल्या प्रथम केला. मॅथ्यूजच्या म्हणण्यानुसार, लिंग संकल्पना ही या गोष्टीला मान्यता देते की, प्रत्येक माहितगार समाज हा स्त्री व पुरुष ह्यामध्ये फरक जाणतो म्हणून लिंग ही संज्ञा / कल्पना ही पुरुष आणि स्त्री ह्यांना सामाजिकरित्या व त्यामधील संबंधाचे उत्तम उदाहरण ह्यांना जाणून घ्यायचा एक पद्धतशीर मार्ग आहे. कुटुंबप्रमुखाची संकल्पना ही समाजातील पुरुषांची अधिसत्ता हिचा अभ्यास करण्यास साहाय्य करतात. लिंग ही कल्पना ही स्त्री आणि पुरुष ह्यांच्या वर्तणुकीतील फरक ह्यांचा अभ्यास करण्यास व ह्या फरकांच्या आधारावर मूलभूत जीवशास्त्रविषयक किंवा समाजविषयक रचना ह्यांचा समाजाने अभ्यास करण्यास मदत करते. पुल्लिंगी व स्त्रीलिंगी ह्या संकल्पना ह्या निश्चित शब्दांत वैशिष्टपूर्ण पुरुष हा पुरुषी स्वभावाचा किंवा वैशिष्ट्यपूर्ण स्त्री व तिचा बायकी स्वभाव ह्यांची व्याख्या करतात. ह्या गटामध्ये काही मूलभूत संकल्पनांचा अभ्यास केला जाईल. ह्या कल्पना म्हणजे जाती व लिंग, कुटुंब प्रमुख, पुल्लिंगी व स्त्रीलिंगी या आहेत.

स्त्री-पुरुष समतावादाच्या लिखाणांत व लिंगविषयक व्याख्यानांत ह्या संकल्पना आपल्याला समाजातील स्त्री आणि पुरुष ह्यांच्यातील सामाजिक फरक समजून घेण्यासाठी पायाभूत आहेत. ह्या संकल्पनांचा अभ्यास हा पृथ्थकरण वर्ग म्हणून करण्यास उपयोगी आहे.

### जाती आणि लिंग (*Sex and Gender) :-*

संज्ञा, जाती, आणि लिंग ह्या विद्वान लोकांनी, *(Academicians)* संशोधक आणि स्त्री-पुरुष समतावाद लेखक ह्यांनी जीवशास्त्रविषयक पुरुष व स्त्री ह्यामधील वेगळेपण व सामाजिकरित्या पुरुष व स्त्री ह्यांतील फरक करण्यासाठी वापरलेल्या संकल्पना आहेत. पुरूष स्त्री समतावादी समाजशास्त्रज्ञ असे सुचवितात की, अभ्यासविषयक भाषणे व लिखाण ह्यामध्ये संज्ञा जाती व लिंग ह्यांच्यातील फरक समजून घेण्याची आवश्यकता आहे.

जाती (*Sex) :-*

मोठ्या ढोबळमनाने "जाती"चा संदर्भ हा स्त्री व पुरुष ह्यांमधील जीवशास्त्रविषयक आणि शरीरविज्ञानशास्त्र विषयक फरकांशी आहे. संज्ञा जाती ही जीवशास्त्र पुरुष व जीवशास्त्र स्त्री ह्यामधील शारीरिक फरक दर्शविते. म्हणून जेव्हा तान्हे मूल वा बालक (*Infant)* जन्माला येते तेव्हां त्याच्या जातीवरुन त्याला "मुलगा" किंवा "मुलगी" अशी चिठ्ठी लावली जाते. पुरुष व स्त्री ह्यामधील पुनरुत्पादक लिंग (*Genital)* फरक हा अशा विशेष लक्षणाचे मूळ मानले जाते. जातींमध्ये जीवशास्त्रदृष्ट्या फरक असतो आणि बहुतांशी लोक हे एक जाती वा दुसरी जाती (पुरुष वा स्त्री) म्हणून जन्माला येतात. (ह्याला अपवाद काही संदिग्ध घटना) तथापि असे प्रतिपादन केले जाते की, एक वा दुसऱ्या जातीत जन्म घेतल्याने व्यक्तिना त्यांच्या विशिष्ट अशा लैंगिक अपेक्षा व भूमिका ह्यावरुन राष्ट्रीयकरण (*Socialize)* केले जाते. जीवशास्त्र पुरुष हे पुरुषी भूमिका करण्यास शिकतात. त्यांना पुरुषी मार्गानी विचार व काम करणे ह्यांसाठी समाजीकरण केले जाते. जीवशास्त्र स्त्रीया ह्या स्त्री भूमिका करण्याचा स्वीकार करतात. त्यांना स्त्रीसुलभ मार्गानी विचार व काम करणे ह्यांसाठी समाजीकरण केले जाते. सिमोन डी बिहेवियर, मान्यवर स्त्रीपुरुष समतावादी लेखक असे सांगतो, एखादा पुरुष म्हणून जन्माला येत नाही पण तो एक होतो, एखादी ही स्त्री म्हणून जन्म घेत नाही पण ती स्त्री बनते.

जन्माच्या वेळी, पुनरुत्पादक लिंग (*Genital)* आणि पुनरुत्पादन इंद्रिये (*Reproductive Organs)* ह्यांच्यामधील जैविक फरकांशिवाय, पुरुष बालक व स्त्री बालक ह्यांमध्ये जास्त फरक आढळत नाही. ह्या लिंग बांधणीकामावरुनच समाज हा स्त्री व पुरुष असा फरक करतो. जातीमधील जैविक फरक वा भेदभाव हे काही मर्यादेपर्यंत ठराविक मानसशास्त्रीय व सामाजिकरीत्या बांधणी केलेले मेदभाव ह्यांचे स्पष्टीकरण देतात.

जुडिय बटलर असे मत मांडतो की, जाती ही नैसर्गिक आहे व पहिल्या प्रथम येते लिंग हे दुय्यम रचना असे अशा दृष्टीने आकलन केले जाते जे ह्या नैसर्गिक वेगळेपणावर लादलेले आहे अशा दृष्टीने पाहिल्यास "लिंग" हे स्वतःच एक सामाजिक वर्ग बनते असे बटलरचे म्हणणे आहे. ह्याचा अर्थ असा आहे की, पुरुष व स्त्री हा सामाजिक मेदभाव समाजाने केलेला आहे म्हणजेच ही सामाजिक रचना आहे हा एक विशिष्ट प्रकारे पाहण्याची व पुरुष व स्त्री ह्यामधील फरकाचे विभाजन करण्याचा मार्ग आहे. बटलर असे स्पष्ट करतो की, जाती जरी जीवशास्त्रदृष्टचा पाहिली तरी ती समाजाचे लिंग म्हणून उत्पादन वस्तू आहे. म्हणून संज्ञा जाती ही पण सामाजिक रीतीने बांधणी केली गेली आहे. जातीची शास्त्रोत्क, जीवशास्त्रदृष्ट्या अर्थ व व्याख्या ही जातीतील फरकाचा मूळ मुद्दा स्पष्टीकरणाचे एक महत्त्वपूर्ण असे साधन आहे. बटलरचा विचार असा आहे की, जीवशास्त्र हे स्वतःथ एक शास्त्रशुद्ध शिस्त, म्हणून सामाजिक प्रतिनिधीत्व पद्धत व जास्त महत्त्वाचे म्हणजे मनुष्यप्रांतात खूप भेदभाव आहेत परंतु त्यापैकी काहीच हे फक्त मनुष्य प्राण्याचे निरनिराळ्या प्रकारांत विभाजन करण्याचे मूळ बनतात अन्य शब्दांत सांगायचे झाले तर जरी जातीमध्ये फरक आहेत ह्याचा जरी आपण स्वीकार केला तरी त्याचा वापर करण्यासाठी काही तर्कशुद्ध वा सुसंस्कृत कारण नाही हेच मनुष्य प्राण्याचे दोन गटांमध्ये वा जातीमध्ये विभाग करण्याचे मूळ आहे,

जुडिथ बटलर पुढे असेही स्पष्ट करतो की, जाती (*sex)* ही फक्त एक सूक्ष्म पृथ्थकरण वर्ग नाही. ती एक नमुनेदार वर्ग आहे. ती स्त्री व पुरुष काय आहेत हे अटी घालून देते तसेच पुरुष व स्त्रीयांनी काय असले पाहिजे हह्याचा करार करुन देते तसेच जाती ही पुरुष व स्त्री ह्यांच्या वागणूकीचे नियमन करण्यासाठी नियम बनवून देते बटलर शेवटी असे अनुमान करतो की, जाती ही पण एक सामाजिक प्रकार आहे. काही स्त्री-पुरुष समतावादी लेखक आहेत. जे बटलरशी सहमत नाहीत व जाती हे मूळातच जीवशास्त्र स्वरुपात आहे असे मानतात.

समाजशास्त्रांतील अधिक संशोधन असे गृहित धरुन चालते की, प्रत्येक व्यक्तिला एक जात, एक लैंगिकता (*Sexuality)* व एक लिंग आहे काहीवेळा जाती आणि लिंग हे एकमेकांची जागा घेण्यासाठी वापरले जातात. काही वेळा जाती म्हणजे लैंगिकता (कामुकता) ज्याचा संदर्भ हा जीवशास्त्र स्त्री व पुरुष हा पुल्लिंगी पुरुष असे गृहीत धरले जाते संशोधन बदल हे जाती पुरुष व स्त्रीमा म्हणून निगडीत करतात, लैंगिकता ही समलिंगी (*Homosexuals)* व असमलिंगी (*Heterosexuals)* ह्यांच्याशी निगडित केली जाते लिंग हे समलिंगी दृष्टिने व स्त्रीया हे रुबीबद्ध शरीरे आहेत ज्या पुरुषांच्या ठागी स्त्रीचे व स्त्रीया जागी पुरुषी कपडे घालण्याची इच्छा (*Transvestites),* द्विजातीय (*Bisexuals)* ह्यांचा विचार पण करीत नाहीत. लिंगाच्या अभ्यासांत किंवा स्त्रीयांच्या अभ्यासांत चौघांचा संबंध हा जीवशास्त्रविषयक जातीवर आहे पुरुष, स्त्री, नर व मादी (*Male & Female)* ह्यांच्याशी मुख्यत्वे आणि ज्या मानि जैविक भेदभाव हे कुटुंब प्रमुख समाजाने सामाजिक रीत्या निरनिराळ्या मार्गांनी लिंगभेद केले आहेत जेव्हा अर्भकाचे विशिष्ट जाती म्हणून वर्गीकरण केले जाते तेव्हा ते लैंगिक समाजीकरणातून निरनिराळ्या मर्यादेच्या लैगिक वागणुकीचे विषय असतात, म्हणून आपणापुढे प्रश्न निर्माण होतो. लिंग (*Gender)* म्हणजे काय ?

**लिंग (*Gender):-***

स्त्री-पुरुष समतावादी लेखन आणि अन्य सामाजिक भाषणे ह्यामध्ये लिंगाची संकल्पना ही १९७० च्या आधी अत्यंत लोकप्रिय झाली. साध्या शब्दांत सांगायचे झाल्यास लिंग हे सामाजिक संज्ञाच्या रुपांत पुरुष व स्त्रीया ह्यामधील भेद स्पष्ट करते पुरुष म्हणून माणूस काय करु शकतो व स्त्री म्हणून बाई काय करु शकते व काय करु शकत नाही.

म्हणून लिंग हा सूक्ष्म अभ्यास प्रकार आहे ज्याची सामाजिक बांधणी ही पुरुष व स्त्री ह्यांच्यामधील जीवशास्त्रविषयक भेदभावाचे वेगळेपण दाखविण्यासाठी झाली आहे. लिंग ह्या संज्ञेचा वापर हा पुरुष व स्त्री ह्यांच्या वागणूकीतील फरक वर्णन करण्यासाठी केला जातो ज्या फरकांना पुल्लिंगी (*Masculine)* स्त्रीलिंगी (*Feminine)* असे म्हणतात. स्त्री-पुरुष समतावादी लेख ह्या दृष्टीकोनावर प्रकाश टाकतात व असा दावा करतात की, हे भेद भेदभाव जैविकशास्त्रीय नाहीत पण विशिष्ट प्रकारच्या समाजाची सामाजिक बांधणी आहे.

काही सिद्धांत असे सुचवितात की, पुरुष व स्त्री ह्यामधील जीवशास्त्र भेद हे ह्यामुळे त्यांच्या मानसिक व शारीरिक फरकांवर परिणाम करतात ते सिद्धांत असे मत व्यक्त करतात की, जीवशास्त्रदृष्ट्या, पुरुष हे स्त्रियांपेक्षा मानसिक व शारीरिक दृष्ट्या जास्त वरचढ (*Superior)* आहेत अन्य सिद्धांतवादी (*Theorists)* असे सूचित करतात की, पुरुष व स्त्री ह्यांच्यामधील जीवशास्त्रविषयक फरकांत अतिशयोक्ती आहे. कुटुंबप्रमुख समाज प्रणालीने हे भेदभाव सामाजिकदृष्टीने रचले आहेत ज्यामुळे पुरुष हा स्त्रीपेक्षा जास्त श्रेष्ठ मानला जातो. त्यामुळे समाजांत स्त्रिया ह्या पुरुषांच्यापेक्षा कमी महत्त्वाच्या वा पुरुषांच्या हाताखालच्या म्हणून ठरविल्या जातात.

ॲन ओकलेने तिच्या "सेक्स, जेंडर व सोसायटी ह्या १९७२ साली लिहिलेल्या पुस्तकांत लिंग ह्या संज्ञेचा पूर्ण अभ्यास केलेला आहे. ओकले असे सांगते की, पाश्चिमात्य संस्कृतीत स्त्रिमा ह्या घरगृहिणी (*Housewife)* आणि माता (*Mother)* ह्या भूमिका करतात. कारण स्त्रियांच्या जीवशास्त्रामुळे त्यांना ह्या भूमिका करणे भाग पडते. पाश्चिमात्य संस्कृती आणखी असा विश्वास ठेवते की, समाजातील पुरुष व स्त्रीया ह्यांच्या पारंपारिक भूमिकांमध्ये बदल करण्याचा कोणताही प्रयत्न केला गेला तर समाजाची सामाजिक जाणीवतेला नुकसान पोहोचेल. ओकले असा शेवट करते की, ह्या पुरुष व स्त्रियां ह्यांच्या भूमिकासंबंधीचा दृष्टिकोन हा कुटुंबप्रमुख समाज (*Patriarchal Society)* ह्याला आधार व देखभाल करण्यास मदत करतो.

सिमोन डी बोवा ही तिचे पुस्तक "दी सेकंड सेक्स" ह्यांत असे सांगते की, एखादी जन्माला येत नाही पण कदाचित तो स्त्री होऊ शकतो. ती असे स्पष्ट करते की, समाजातील लिंग भेदभाव हर पुरुषाला त्याच्या "ब्रेड विनर' ह्या भूमिकेतून श्रेष्ठ करतो. तो त्याला समाजामध्ये व कुटुंबात अधिकाराचा दर्जा देतो. लिंग फरक हे अधिकारी परंपरा विरोधांत अशा त-हेने उभारलेले आहेत की, पुरुष हे श्रेष्ठ व स्त्रिया ह्या दुय्यम (कनिष्ठ) आहेत. स्त्रियांचा दर्जा हा अन्य असा म्हणून असतो व स्त्रिया ह्या नेहमीच बाहेरून येणाऱ्या राहतात. संस्कृती ही पुल्लिंगी म्हणून अगदी खूप खोल रुजली होती.

"शालुमिथ फारस्टोन तिच्या डामइलेक्टिक्स ऑफ सेक्स (१९७०)" ह्या लिहिलेल्या पुस्तकांत असे सुचविते की, कुटुंबप्रमुखता ही स्त्रिची पुनरुत्पादन करणे ही जीवशास्त्र क्षमता एक आवश्यक कमजोरपणा म्हणून आहे. ती असे स्पष्टीकरण देते की, स्त्रियांचा ह्या जुलमीपणापासून दूर होण्याचा एकमेव मार्ग म्हणजे अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करुन त्या मुलाच्या जन्माच्या ओझ्यापासून दूर राहणे, ती ह्या माता आणि मुले ह्यांच्यातील जीवशास्त्रीय बंधन तोडून तादाम्य पावणारी गोष्ट प्रस्थापित करणे जेथे एक पत्नी (पती व्रत) आणि केंद्रीय कुटुंब ह्यांचे अस्तित्व नसते ह्या गोष्टीचे फायरस्टोन जोरदारपणे समर्थन करते.

काही स्त्रीपुरुष समतावादी फायरस्टोनच्या दृष्टिकोनांचा मुख्यत्वे करुन स्वीकार करतात कारण तंत्रज्ञान व त्यांचा वापर ह्या गोष्टी अजूनही खंबीरपणे पुरुषांच्या हातांत आहेत. तर सांस्कृतिक फेमिनीस्ट असा प्रश्न करतात की, स्त्री व पुरुष हांच्यातील भेव हे पूर्णपणे सांस्कृतिक तसेच जीवशास्त्रविषयक आहेत काय हे स्त्री-पुरुष समतावादी मातृत्वाची भूमिका ही मूल्यवान व साजरी करण्यास प्राधान्य देतात कारण ती स्त्रीयांची पालनपोषण करणे ही नैसर्गिक प्रवृत्ति आहे व जरी तिला शक्य असले तरी त्याचा त्याग करणे तिला आवडत नाही.

ॲन ओकली असे सांगते की, जाती व लिंग ह्या दोन्हींमध्ये सतत चूक होत असते उदा. लोकांना सामान्यपणे अर्जामध्ये त्यांच्या जातीऐवजी लिंग हे जाहीर करावे लागते. स्त्री पुरुष समतावादी लेखनांत जीवशास्त्रविषयक किंवा

नैसर्गिकरित्या ह्यांचा एकमेकांशी अत्यंत घनिष्ठ संबंध असणे आवश्यक अपरिहार्य आहे ह्याविषयीचे संदर्भ आहेत. अगदी अलीकडची जाती व लिंग ह्यावरची लिखाणे असे सुचवितात की, स्त्री-पुरुष समतावाद (*Feminism)* हा लिंगाच्या विचारभावनांशी केंद्रीकरण व लिंगभेद ह्यावर जास्त अवलंबून राहिला आहे व असे दाखविले आहे की, जातीभेद हे स्वतःच सामाजिकरित्या बांधलेले व बदलणाऱ्या अशा अर्थाना जोडलेले आहेत. आपण कोणत्या तन्हेने ते समजून घेतो त्यावर अवलंबून आहे आणि आपल्या स्वतःच्या ऐतिहासिक संस्कृतिच्या संदर्भात ह्या जीवशास्त्रविषयक फरकांना निरनिराळे परिणाम म्हणून जोडतात्त. त्याचवेळी असे एक विधान आहे की, जीवशास्त्र हे काही वागणूक विषयक गुणधर्माना योगदान देते.

मोव्हिया गॅटेन्स असे सांगते की, पुराव्याचे मुद्दे की, पुरुषाचे शरीर व स्त्रियांचे शरीर ह्या दोघांना निरनिराळी सामाजिक मूल्ये व महत्त्व आहे व ते पुरुष व स्त्री ह्यांच्या सवत्सतविवेक बुद्धिवर दृश्य परिणाम करण्यास मदत करु शकत नाहीत. फक्त एकाच प्रकारच्या जातीमध्ये आढळणाऱ्या काही ठराविक प्रसंगांना प्रचंड महत्त्व आहे. ती हस्तमैथुनाचे उदाहरण देते (*Menstruation)*. ही क्रिया जीवशास्त्रविषयक पुरुषाने पूर्ण तडीस नेल्याशिवाय त्याच्या पुल्लिंगीपणाला महत्त्व नसते असे ती सुचित करते. म्हणूनच पुरुषाचे शरीर हे आमच्या संस्कृतितील पौराणिक कथांमध्ये मानवी प्रमाणबद्धतेचे श्रेष्ठत्व म्हणून स्फूर्तिस्थान मानले गेले आहे.

जुडिथ बटलरचा लिंगासंबंधी सिद्धांतवाद (*Theorization)* हा काम तडीस नेण्याच्या युक्तिची ओळख करुन देतो की, लिंगाची काम पूर्ण करण्याची क्रिया ही नाखुषीने विभिन्नपणे प्रमुख भाषणांत केली जाते. बटलरची ही संकल्पना कदाचित अतिशय मूलगामी (*Radical)* असू शकेल कारण ती असे ठासून सांगते की, सर्व ओळखीच्या संकल्पना ह्या संस्थांच्या पद्धति, अनेक भागांत व विखुरलेल्या उगम असलेल्या भाषणांचा परिणाम आहे. ती पुढे असे सांगते की, "जाती / लिंग भेदभाव हा जातीय शरीरे (*Sexed bodies)* आणि सांस्कृतिकपणे बांधणी केलेले लिंग ह्यामधील मूलगामी खंडितपणा सूचित करते." हा मार्ग हा लिंग ओळखण्याची बांधणी करु शकेल का हा एक प्रश्न आहे. व्यक्ति ह्या भाषणांनी प्रस्थापित झालेल्या मार्गाना आव्हान देऊ शकतात व काही अर्थ आणि सक्तिच्या विभिन्न जातीय संस्था ह्यांना मजबूत करतात.

जाती आणि लिंग ह्यामधील न बदलणारा (*Rigid)* फरक हा संपूर्णपणे जीवशास्त्रीयपणे किंवा एकट्या संस्कृतिपणे स्वीकारणे हे कठीण काम आहे. मानवाच्या संकल्पना बांधणीमध्ये सतत बदल होत असतात. ज्यांचे नियंत्रण हे एक तर जैविक किंवा सामाजिक शक्तिंनी वरचढपणे केलेले असते. जाती व लिंग ह्यांवरील चर्चा वा वादविवाद है, घालून राहतील कारण ते जीवशास्त्र भेदाच्या अनुकूलतेत असतील तर कांही स्त्रीपुरुष समतावादी लेखक हे भेदभाव सामाजिकरित्या संधणी केली गेले आहेत ह्याला प्राधान्य देतील कारण त्यांना धर्म, जात, कौटुंबिक लग्न व अन्य अशा संस्थांचा आधार मिळालेला असतो. स्त्रियांच्या जीवनांतील व अपेक्षा ह्यामधील भरघोस बदल हा १९६० पासून असे स्पष्टपणे सांगतो आहे की, स्त्रिलिंगी वर्ग हा अंगळसा लवचिक आहे. स्त्रियांच्या भूमिका व कार्यशक्ति हह्यांमध्ये काही दशकांत वेगाने बदल झाला आहे जो ज्यामुळे जाती / लिंग भेदभाव ह्यांना फेमिनीस्ट व अन्य लोकांनी भाषणांत नवीन आकारमान (*Dimensions)* दिले आहे.

### जाती आणि लिंग विधेयकता (*Deconstructing Sex and Gender):-*

लिंगाच्या प्रकारांचा पुनर्विचार करतांना हे आवश्यक आहे की, जाती आणि लिंग हे संकल्पनेत भिन्न आहेत. प्रत्येकाची सामाजिकरीत्या निरनिराळ्या मार्गानी रचना झालेली आहे. लिंग हा एक कमनीय वर्ग आहे, एक महत्वपूर्ण सामाजिक प्रतिष्ठा जी सामाजिक जीवनाच्या सर्व क्षेत्रांचे संघटन करते. म्हणून शरीरे ही लिंगमय केली जातात व त्यांचे अर्थशास्त्र, कल्पनांचे उत्पत्तिशास्त्र (*Ideology)* राज्यसंस्था (*Polity)*. कुटुंब व अन्य इतर अशा प्रमुख सामाजिक संस्थामध्ये उभारणी केली जाते.

एखाद्या व्यक्तिसाठी, लिंगाचे घटक म्हणजे पुनरुत्पादक अवयवाच्या (*genetalia)* जन्माच्या वेळी दिसून येणाऱ्या मूळ लिंगाधा वर्ग हा आहे. प्रत्येक वर्ग हा लिंगाची ओळख, लिंगाचे जातीय निश्चितता, वैवाहिक (*Marital)* आणि जन्मजात दर्जा (*Procreative status),* लिंगामुळे मिळालेले व्यक्तिमत्त्व, लिंगाची श्रद्धा व प्रवृत्ति, लिंगाचे काम व कौटुंबिक भूमिका हह्यांची तरतूद करतो. हे सर्व सामाजिक घटक हे प्रत्येकाच्या जीवशास्त्राशी सुसंगत (*consistent)* आणि एकरुप (*Congruent)* असतात प्रत्यक्ष संयोग हा एकमेकांशी एकरूप असेल वा नसेल आणखी हे घटक दुहेरी विभागाच्या एकाच बाजूवर रांगेत नसतील,

समाजातील नवीन जन्माला येणाऱ्या अर्भकांना अधिकृतरीत्या जन्मानंतर मुलगा किंवा मुलगी हे लेबल नीटपणे चिकटविणे हे काही वेळा जाती नियुक्तिच्या जुलमीपणाचा विषय होतो. नियमाविरुद्ध पुनरुत्पावन अवयवाच्या बालकासाठी जातीबदल शस्त्रक्रिया ही काही असाधारण बाब राहिलेली नाही समाजशास्त्रज्ञांना जीवशास्त्र व शारीरिक जाती विभिन्नतेबद्दल माहिती आहे. नियमबाह्य वा अपवादात्मक अशा अर्भकाला सुसंगतपणे स्त्री किंवा पुरुष असे दिलेले वर्गीकरण हे अशा प्रणालींवर प्रकाशझोत टाकते की, जे जाती भेदभावाच्या स्पष्ट मोहजालाची देखभाल करते. अशा निर्णायक स्वरुपाच्या कसून शोध घेतल्याशिवाय जाती भेदभाव हा ज्याधी सामाजिकरीत्या बांधणी झालेली आहे असा नैसर्गिक म्हणून सहजपणे विचारांत घेतला जाऊ शकतो.

**पुल्लिंगी आणि स्त्रीलिंगी (*Masculinity and Femininity):-***

जाती / लिंग ह्यामधील फरक हे स्त्री-पुरुष, पुलिंगी व स्त्रीलिंगी, पुरुषाचा संबंध पुल्लिंगाशी व स्त्रियांचा संबंध स्त्रीलिंगाशी असे विचार उभे करतात. प्रत्येक बांधणीमध्ये पुरुष आणि स्त्रिया ह्यांमधील जीवशास्त्र फरक / भेदभाव ह्याचे सामाजिक संज्ञा व वर्णने ह्यांच्यात भाषांतर केले जाते. स्त्री-पुरुष समतावादी असे मत मांडतात की, जीवशास्त्र विषयक भेदभाव हा पुल्लिंगी व स्त्रिलिंगी ह्यांच्या सामाजिक वर्णनामधून उंधी वाढवित नेतो.

जेव्हा गुणधर्म हा पुल्लिंगी किंवा स्त्रिलिंगी असतो तेव्हां लिंगातील भाषा फरक हा दिसून येतो. उदा. गुलाबी आणि निळा रंग हे लिंगाचे रंग आहेत त्यापैकी गुलाबी हा स्त्रीलिंगी व निळा रंग हा पुल्लिंगी मानला जातो. पुढे बळकट व चिवट म्हणजे पुल्लिंगी आणि कमजोर आणि कोमल ह्यांचे संघटन हे स्त्रीलिंगी गुणधर्माशी असते. असे आणखी पुष्कळ गुणविशेष आहेत ज्यांचे पुल्लिंगी व स्त्रीलिंगी असे वर्गीकरण केलेले आहे. पुल्लिंगी व स्त्रीलिंगी ह्या संकल्पना आहेत ज्या पुरुष किंवा स्त्री ह्यांच्या सामाजिक निष्पतीतून विशेष गुण व गुणधर्म सुचवितात जे पुरुष व स्त्री ह्यांचे वर्णन करतात व पुरुषांना स्त्रीयांपेक्षा जास्त फायदे देतात.

मोईरा गॅटेन्स सूचविले की, जीवशास्त्र पुरुषाने पूर्ण केल्याशिवाय पुल्लिंगीपणाला किंमत नाही म्हणून आपल्या संस्कृतिमध्ये पुरुषी शरीर हे काही विशेष गुण जे पुल्लिंगी वा पुरुषत्व गुणविशेष स्पष्ट करणारे असे स्फूर्तिस्थान झाले आहे. म्हणजेच मानवाच्या पुरुषी श्रेष्ठत्वाचे सर्वमान्य प्रमाण (*Norm)* त्याचप्रमाणे स्त्रीलिंगी हे जैविक स्त्रीने पुरे केले जाते. आपल्या संस्कृतीत स्त्री देह हा काही गुणधर्म स्पष्ट करतात ह्यासाठी विशेष स्थान आहे जुडिथ बटलरच्या मते लिंगाबद्दलचा कोणताही सिद्धांतवाद हा पुल्लिंगी व स्त्रीलिंगी ह्या संज्ञा संदर्भात भूमिका वा कल्पना ही पूर्ण करण्याची ओळख करुन देतो. म्हणूनच लिंगाची भूमिका ही अनैच्छिक (*Involuntary)* बनते कारण लिंग हे सामाजिकरणाच्या प्रणालीतून अंतर्गतरीत्या कुटुंबप्रमुखाच्या लिंगविषयक भाषणांचा प्रमुख भाग बनते ज्याची भूमिका ही कुटुंब व समाज ह्या दोन्हींमध्ये निरनिराळ्या पातळीवर बजावली जाते. आपण सामाजिकरीत्या जन्मापासून आपल्या पुल्लिंगी व स्त्रीलिंगी ह्या लिंगविषयक वर्गीकरणात प्रवेश करती.

पुल्लिंगी व स्त्रीलिंगी ह्या संकल्पनाची गरज ही स्त्रीपुरुष समतावादी व्याख्याने व लिखाण ह्यामध्ये पुरुष व स्त्री ह्यांतील भेद स्पष्ट करण्यासाठी आहे. काही जण असे प्रतिपादन करतात की, हे भेदभाव हे त्यांच्या जीवशास्त्रावर आधारित आहेत तर काहीजणे हा मुद्दा फेटाळून लावतात व हे फरक सामाजिकरित्या बांधणी झालेले आहेत ह्यावर भर

देतात. म्हणून पुरुष व पुल्लिंगी ह्यांची रचना ही फक्त पुरुष शरीरानाच येऊन मिळेल (*Accrue).* तसेच स्त्रीयांची व स्त्रीलिंगी बांधणी ही फक्त स्त्रियांच्या शरीरापुरतीच मर्यादित राहील.

समकालीन लिखाणांस अशी मान्यता मिळाली आहे की, हे पुल्लिंगी व स्त्रीलिंगी असे सामाजिक प्रकार हा एक अस्पष्ट देखावा (*Blurring)* आहे. जीवशास्त्रविषयक वा सामाजिक शक्तिंनी पूर्णपणे नियंत्रण केल्यामुळे मानवी प्राण्याच्या संकल्पनेत सतत बदल घडून येत आहे. स्त्रियांच्या अपेक्षा बदलल्या आहेत, स्त्रियांच्या भूमिका व आयुष्य हे विस्तृत होत गेले आहे. स्त्रीलिंगाचा प्रकार हा कसा जुळवाजुळवी करणारा ह्याचे थोडक्यांत स्पष्टीकरण येथे आहे.

**पिता व कुटुंबप्रमुख (*Patriarchy):-***

कुटुंब प्रमुख ही संज्ञा रोजच्या संभाषणात वारंवार वापरली जाते येथे हा प्रश्न उभा राहतो "पिता व कुटुंबप्रमुख म्हणजे काय?" इंग्रजी किंवा अन्य कोणत्याहि भाषेतील सहजगत्या होणाऱ्या संभाषणात ही संज्ञा पुरुषांचे प्रभुत्व स्पष्ट करते. पुरुषी अहंकार (स्त्रियांच्या विरुद्ध) किंवा साध्या शब्दांत पुरुषशक्ति (*Male Power).* साध्या भाषते ठेवली असता ही संज्ञा म्हणजे "पित्याचे संपूर्ण राज्य किया कुटुंबावरचा सर्वात मोठा पुरुष सदस्य." म्हणजेच कुटुंबप्रमुख व पिता ह्याचे कुटुंबातील सर्व स्त्रिया व तसेच सामाजिकरीत्या व आर्थिकदृष्ट्या दुय्यम पुरुष व तरुण वर्ग ह्यांच्यावर राज्य करणे, शब्दशः (*Literally)* कुटुंबप्रमुख म्हणजे सामाजिक क्षेत्रांतील प्रमुख पुरुषांचे राज्य (जसे कुटुंब, जमात) कुटुंबप्रमुख वा पिता हा वैशिष्टपूर्ण अत्ता समाजशील वयाने मोठा (*Elder)* असा आहे ज्याला समाजक्षेत्रांत अन्य व्यक्तिंवर पुरेसे अधिकार / हक्क असतात.

तथापि, विसाव्या शतकाच्या आधीच्या काळांत स्त्रीपुरुष समतावादी लेखकांनी संज्ञा कुटुंबामुखाचा वापर हा पुल्लिंगीचे स्त्रियांवरील वर्चस्व दर्शविणारी सामाजिक पद्धत संकल्पना केला आहे. लिंगाच्या अभ्यासामध्ये कुटुंबप्रमुख व पिता ही एक मूलगामी महत्त्वपूर्ण कल्पना आहे. स्त्रीपुरुष समतावादी लेखकांनी असे सिद्धांत विकसित केले आहेत ज्यांचे लक्ष्य हे स्त्रियांचे पुरुषाशी दुय्यमस्थान ह्याचा पाया समजून घेण्यासाठी आहे.

कुटुंबाप्रमुख वा पिता ही संज्ञा फक्त वर्णनकारक नाही जी निरनिराळे समाज है पुरुषाच्या अधिकार व शक्ति ह्यांची बांधणी करतात ह्याचे स्पष्टीकरण करतात तर तो एक पृथ्थकरणाचा वर्ग बनतो. हा कुटुंबप्रमुख संज्ञेचा वापर वर्णनात्मक ते पृथ्थकरण वर्गात बदल हा १९७० घडून आला व तो बदल हा स्त्रीपुरुष समतावादीच्या राजकीय आणि बौद्धिक संस्कृति ह्यांच्या जागतिक संदर्भात घडून आला. काळाच्या ओघांत पुढे त्याचा स्त्रियांच्या अभ्यासाची शिस्त किंवा लिंग अभ्यास जेव्हां स्त्रियांनी त्यांच्या हक्कांसाठी आंदोलन केले त्यावेळी विकासाला कारणीभूत झाला विश्वविद्यापीठात स्त्रियांनी मागणी केली की, त्यांचा अनुभव व दृष्टीकोन हे गंभीरपणे विचारात घेतले गेले पाहिजेत की, कुटुंबप्रमुख हा जगाचे वर्णन व स्पष्टीकरण असा दुहेरी मार्ग म्हणून उदयास आला. त्या वेळेपासून कुटुंबप्रमुख वा पिता हह्याचा वापर हा कटाक्षाने कोणत्याहि समाज पद्धतीत अधिकार व सत्ता ह्या मुख्य घटकांचे स्पष्टीकरण करण्यासाठी केला जातो. कुटुंबप्रमुख आपोआपच (*Automatically)* पुरुषाला स्त्रियांवर असे विशेष हक्क आहेत की, स्त्रिया ह्या समाजातील भौतिक, जाती आणि बौद्धिक स्त्रोत हांवर अल्प प्रमाणात वा अजिबात हक्क सांगू शकत नाहीत. म्हणजेच कुटुंबप्रमुख समाजात स्त्रियांना शिक्षणासाठी मालमत्ता मिळविण्यासाठी किंवा लग्न आणि जीवनांतील अन्य गोष्टी ह्यांची निवड करण्यासाठी झगडावे लागते. पुरुषांसाठी हे सर्व स्त्रोत एक हक्काची गोष्ट आहे व त्यांचे आयुष्यावर परिणाम घडविणारे पर्याय करु शकतात.

आपल्या दैनंदिन जीवनांत कुटुंबप्रमुख वा पित्ता ह्याची स्पष्ट दिसणारी गरज हिचे स्पष्टीकरण देणारी काही उदाहरणे आपण आता घेऊया.

जेव्हा पुरुष हा वादविवाद करतांना त्याचा आवाज चढवितो व त्याच्या दृष्टिकोनावर दुसऱ्या कोणालाहि विशेषकरुन स्त्रियांना एक चकार शब्द बोलण्याची संधि देत नाही व आपल्या दृष्टीकोनाला चिकटून राहतो त्यावेळी

त्याच्या क्रिया ह्याचे वर्णन है आक्रमक कुटुंबप्रमुख (*Aggressively Patrirchal)* म्हणून केल्या जाऊ शकतात.

जर एखाद्या स्त्रीने कामाच्या ठिकाणी लैंगिक छळवादाची तक्रार केली व त्या कार्यालयातील सर्व पुरुषांनी असे कधी होणेच शक्य नाही म्हणून ह्याची सत्यता नाकारली, तर त्या पुरुषांनी दिलेल्या कारणामीमांसेचे वर्णन हे विशिष्ट प्रकारचे कुटुंबप्रमुखत्व (*Typically Patriarchal)* असे केले जाऊ शकते.

सार्वजनिक भाषणांत ज्यामध्ये स्त्रियांचे दुय्यम स्थान हे नाकारले जाते त्या अपूर्णांकाचे (*Decimal)* कुटुंबप्रमुख ह्या संज्ञोने वर्णन केले जाते,

सर्वसाधारणपणे कुटुंबप्रमुख हा खुबीदार (*Catch)* शब्द आहे, जो स्त्रियांच्या विरुद्ध समाज तफावत करतो हे वर्शविणाऱ्या निरनिराळ्या मार्गाचे वर्णन करते. ही वरील उदाहरणे पुष्कळ विभिन्न व सूक्ष्म मार्गाने स्पष्टीकरण देतात ज्यामधून समाजांतील कुटुंबप्रमुखत्व हे व्यक्त केले जाते.

१९ व्या शतकात अँग्लो-युरोपियन मानववंशशास्त्रज्ञांनी केलेल्या लिखाणांत वरील संज्ञेचा (कुटुंबप्रमुख) मोठ्या प्रमाणांत वापर केला. त्यांच्या लिखाणांत, कुटुंबप्रमुख हा साधारणपणे सामाजिक पद्धतीशी संदर्भ होता जेथे पुरुष हे कुटुंब प्रमुख होते व ते त्यांच्या वडिलांपासून जन्माला आले होते. पुरुष हेच फक्त धर्मगुरु होते व समाजामध्ये वडिलधाऱ्या पुरुषांनी कायदे व प्रथा हह्यांच्या वापराचा हुकूम दिलेला होता. जेव्हा हुकुमशहा अशा दृष्टिने शब्द वापरला गेला तेव्हा कुटुंब प्रमुख पिता संज्ञा हिची तुलना वारंवार मातृसत्ताक ह्या शब्दाशी केली गेली. ज्याचा संदर्भ हा अशा सामाजिक प्रणालीशी निगडीत होता ज्याठिकाणी कर्त्या स्त्रियांनी पुरुषांवर राजकीय अधिकार गाजविला होता किंवा त्यांना प्रचंड अधिकार होते व त्याचा वापर स्त्रियांनी सामाजिक संबंध आणि दैनंदिन जीवन ह्यावर मोठे नियंत्रण करण्यासाठी केला होता. समाजाच्या उत्क्रांतिमध्ये कुटुंबप्रमुख स्त्री ही (*Matriarchy)* हा विचार अत्यंत प्राथमिक अवस्था व आधीच्या काळांत विचारात घेतला जात होता व कुटुंबप्रमुख पितृत्व हा विचार पुढे समाजाच्या जास्त प्रगतीशील काळांत केला गेला.

लिंगावरील समकालीन भाषणांत कुटुंबामुख ही वा पिता ही मध्यवर्ति संकल्पना आहे जी स्त्री-पुरुष समतावादी लेखकांनी पुरुष व स्त्रिया ह्यांची समाजातील निरनिराळी स्थाने स्पष्ट करण्यासाठी घट्ट पकडून ठेवली आहे. ह्या लेखनांत कुटुंबप्रमुख हा स्त्रियांची ताबेदारी असा दृष्टिकोन आहे. कुटुंबप्रमुख पद्धती ही स्वतःघ स्त्रियांसाठी व्याख्या व प्रमाण ह्याची तरतूद करते. ही सामाजिक प्रमाणे (*Norms)* स्त्रीयांची माता आणि पत्नी अशा सामाजिक भूमिका म्हणून मर्यादित करतात कुटुंबप्रमुख व पिता पद्धत ही ज्या स्त्रिया त्याची ठराविक भूमिका सकारात्मक रीत्या शिकतात त्यांना पुरेशी बक्षीसे प्रदान करते.

मातृत्व आणि पत्नीत्व (*Motherland & Wifehood)* ही दोन्हीं कुटुंबप्रमुख पद्धतीत श्रेष्ठत्व देणारी बनतात. ह्या भूमिकांना सामाजिक मान्यता आहे व त्याचवेळी त्यांची स्थानिक कथा (*Local Folklore)* वाडमय व धर्म ह्यामध्ये प्रशंसा केली गेलेली आहे त्यामुळे स्त्रिया त्यांची सामाजिक भूमिका निभावण्यांत सक्रिय असतात व खरोखरीच स्वतःच कुटुंबप्रमुख सामाजिक आशा शाश्वत ठेवतात व त्यासाठी योगदान देतात. कुटुंबप्रमुखत्व हे दोन्ही उत्पादनशील व दंडात्मक प्रकार आहेत म्हणून ज्या स्त्रिया अविवाहित (*Single)* राहाण्याचे ठरवितात व लग्नाला नकार देतात त्यांना समाजाकडून तुच्छ लेखले जाते (*Disdain)* तसेच ज्या स्त्रिया गर्भधारणा (*fertile)* किंवा ज्या स्त्रिया विशेषकरुन पुरुष बालकांना जन्म देत नाहीत त्यांची टिंगल केली जाते व त्यांना तुच्छ लेखले जाऊन त्यांची कुटुंबातील स्थान हे अस्तित्व नसल्यासारखे (*Non-existent)* होते. विधवांची स्थिती विशेषकरुन उच्च जातीय विधवांची स्थिती ही कुटुंबप्रमुख प्रणालीत अत्यंत दयनीय होती स्त्रियांच्या पुनर्विवाहास बंदी होती. विधवेला कुटुंबातील सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांतून वगळले जात होते. तिला फक्त घर व घरगुती काम हह्यापुरतेच मर्यादित क्षेत्र होते ज्या स्त्रिया समाजाच्या या पद्धतीमध्ये येत नव्हत्या म्हणजेच ज्या स्त्रिया दृष्टिआड होण्यास नकार देत होत्या. व त्यांची

गर्भधारणा ह्या नागरी ओळखीस अनुरुप नव्हत्या तसेच घरगुती दर्जास पात्र नव्हत्या त्यांची टवाळी केली जात होती व त्यांना दुराग्रही (*stubborn)* व त्यांच्या मूलभूत जीवशास्त्रापासून अनैसर्गिक म्हणून टीकेला तोंड द्यावे लागत होते.

काही देशामध्ये ज्या स्त्रिया लग्न करीत नव्हत्या वा गर्भार राहात नव्हत्या वा ज्या तरुणवयांतच विधवा होत होत्या त्यांना काही मागांनी विद्रूप केले जात होते (*Deforminised)* उदा. भारतामध्ये उच्चवर्णीय जातीत विधवांना त्यांचे केस कापावे लागत, दागिने घालता येत नसत वा रंगीत कपडे वापरता येत नव्हते कारण त्यांच्याकडे संशयी वृत्तीने पाहिले जात होते. त्यांना रुढीबद्ध पुनरुत्पादन (*Conventional Reproduction)* ह्या प्रथेपासून दूर ठेवले जात होते आणि अत्यंत हीन दर्जा व परिस्थिती यामध्ये ढकलले जात होते. ज्या स्त्रिया नियंत्रित अशा स्त्री वागणुकीप्रमाणे अनुरुप नव्हत्या त्या कारणास्तव त्यांना समाजांत एक धोकेबाज म्हणून मानले जात होते व त्यांना जादूटोणा (*Magic)* व चेटकी कृत्ये (*sorcery)* हह्यांचा व्यवसाय करण्यास बंदी होती. त्यांना जादुटोणा व चेटकीण (*witches)* कृत्याची शिकार म्हणून ज्या पुरुषांकडून त्यांच्याविरुद्ध दंगा करुन प्रदर्शित केले जात होते अशांना कठोर शिक्षा केली जात होती, सार्वजनिक रीत्या मानखंडना केली जात होती व त्यांना ठार मारले जात होते.

कुटुंबप्रमुखत्व स्त्रियांच्या दुय्यमतेपेक्षा जास्त रीतीने विचारांत घेतले गेले आहे, असे सूचित केले गेले आहे की, सर्वच पुरुष हे कुटुंबामुख पद्धतीत बलवान नसतात उदा. कुटुंबातील तरुण सभासदांना म्हाताऱ्या माणसापेक्षा कमी अधिकार व शक्ति असते. त्यांना त्यांची हुकुमत गाजवायची वेळ येईपर्यंत वृद्ध माणसांच्या आज्ञेनुसार वागावे लागते. खालचा वर्ग आणि दुर्बल पुरुष (*Under privilleged)* व भारतीयांच्या संदर्भात दलित वर्ग हह्यांना वरच्या जातीतील पुरुषांपेक्षा कमी अधिकार वा काहीच हक्क नसतात, अशा पुरुषांना ज्यांचेवर बलवान माणसांनी शोषण व अन्याय केला आहे त्यांना समाजाची साधनसंपत्ती व त्यांची स्वतःची पुल्लिंगत्वाची ओळख ह्यासाठी प्रवेश नाकारला जातो. याखेरीज, सर्व पुरुष हे त्यांच्या जातीत वा कुटुंबात स्त्रियांपेक्षा जास्त सुलभतेने साधनसंपत्ति व अधिकार ह्यांचा दावा करू शकत असले तरी काही ठराविक वर्गाचे, व प्रकारचे पुरुष हे कुटुंब प्रमुख अधिकाराचे लक्ष्य बनतात (*Target)* खालच्या जातीतील खालच्या वर्गातील कुटुंबात्त पुरुष बालकाला चांगले खाणेपिणे व शाळेत जाण्यास मिळते व त्याच्याकडे स्त्री बालकापेक्षा आरोग्याच्या दृष्टीने काळजीपूर्वक ध्यान दिले जाते. भारतात आणखी एक उदाहरण म्हणजे हिजडे (*enuchs)* ते क्रियाशीलपणे त्यांचा पुल्लिंगीपणाच्या अधिकाराचा त्याग करतात नकार देतात. ते नेहमी टवाळी आणि उपहास ह्यांचे उद्दिष्ट (*object)* बनतात. आणखी म्हणजे त्यांच्यातील बरेचसे हे खालचा वर्ग व खालच्या जातीतील असतात. वरील चर्चा ही स्पष्टपणे अशा रीतीने स्त्रिया व व पुरुष ह्यांच्यामधील कुटुंबप्रमुखातील फरक दाखवून देते व अशा त-हेच्या वेगळ्या वागणूकीमुळे स्त्रियांना समाजातील साधनसंपत्ती तसेच कुटुंब आणि जातीमधील अधिकार व सामर्थ्यवान पदे वा वर्जा ह्यांच्याकडे जाण्याचा मार्ग नाकारला जातो.

**कुटुंबप्रमुख वा पिता पद्धतीमध्ये पुरुष काय नियंत्रण करतात?** ***(What do men control in Patriarchal System):-***

**१) स्त्रियांची उत्पादक वा कामाची शक्ति (*Women's Productive or Labour Power) :-***

पुरुष हे दोन्ही तन्हेने घरांमध्ये व बाहेर पगारी काम ह्यांमध्ये स्त्रियांच्या उत्पादकतेवर नियंत्रण ठेवतात. घरामध्ये स्त्री तिचा नवरा, मुलेबाळे व अन्य कुटुंबीय सभासद ह्यांना त्यांच्या आयुष्यभर सतत सर्व तसेच्या सेवा पुरवित असते. स्त्रीपुरुष समतावादी लेखिका सिल्व्हिया वालबे हह्याला कुटुंबप्रमुख उत्पादन तन्हा (*Patriarhal Mode of Production)* असे म्हणते, जेथे त्यांचे नवरे व कुटुंबात राहणाऱ्या अन्य सभासद ह्यांनी स्त्रियांच्या कामाचा मालकी हक्क काढून घेतलेला असतो (*Expropriated)* ती गृहिणी वर्गाला (*Housewifes)* उत्पादन करणारा वर्ग (*Producing class)* आणि नवऱ्यांना मालकी हक्क कायदेशीरपणे काढून घेणारा वर्ग (*Expropriating class)* असे संबोधन देते. घरगृहिणीनी केलेले काम हे काम म्हणून मुळींच विचारात घेतले जात नाही व घरगृहिणी ह्या त्यांच्या नवऱ्यांवर पूर्णपणे अवलंबून राहणाऱ्या बनतात,

घराच्या बाहेर सुद्धा पुरुष हे स्त्रियांच्या कामावर नियंत्रण ठेवतात. ते स्त्रियांना त्यांच्या कामाची विक्री करण्यास भाग पाडलात किंवा ते स्त्रियांना काम करण्यास प्रतिबंध करु शकतात. बायकांना नेहमी काय कमाई होते ह्याचा ते अंदाज करतात, व त्यांना चांगले पगारी काम देण्यापासून मनाई करतात स्त्रिया ह्या नेहमी कमी पगारावर काम करीत असतात किंवा घरगुती कामे करतात ज्याला घर आधारित उत्पादन (*Home Base Production)* असे म्हणतात.जी एक पिळवणूक करणारी पद्धत आहे. (*Exploitative System)* स्त्रियाच्या कामावरील हे नियंत्रण व पिळवणूक म्हरजे पुरुषांना कुटुंबप्रमुखत्वातून भौतिक फायदा मिळतो. स्त्रियांच्या दुय्यम दर्जामधून त्यांना (पुरुषांना) आर्थिक द्दष्टभा लाभ होतो हे कुटुंबप्रमुख पद्धतीचे भौतिक (*Material)* किंवा आर्थिक मूळ आहे.

## **२) स्त्रियांचे पुनरुत्पादन (*Women's Reproduction) :-***

पुरुष हे स्त्रियांची पुनरुत्पादनशक्ति सुद्धा नियंत्रित करतात. बऱ्याच समाजामध्ये, स्त्रियांचे त्यांच्या पुनरुत्पादनशक्तिच्या क्षमतेवर नियंत्रण नसते. त्या आपल्याला किती मुले हवी हे ठरवू शकत नाहींत, गर्भनियंत्रण साधने वापरायची का गर्भपात करायचा ह्याचा निर्णय घेऊ शकत नाहींत शिवाय पुरुष हे पुरुषी प्रभुत्व असलेल्या धर्म आणि राजकारण अशा संस्थांचे नियंत्रण करतात. स्त्रियांच्या पुनरुत्पादन क्षमतेसंबंधी नियम केले जाऊन नियंत्रण हे संस्थात्मक केले जाते. (*Institutianalized)* उदा. ख्रिश्चन चर्चमध्ये पुरुष धार्मिक शासन हे स्त्रिया व पुरुषांनी गर्भनियंत्रक साधने वापरावयाची की नाही हे ठरविते. आधुनिक काळांत, कुटुंबप्रमुख पद्धत ही स्त्रियांची पुनरुत्पादन पद्धत ह्याचे नियंत्रण कुटुंब नियोजन कार्यक्रमांद्वारे करण्याचा प्रयत्न करते. (*Family Planning Programmes)* देशाच्या कमीत कमी लोकसंख्येचे आकारमान हे राज्यशात्तन ठरविते. उदा. भारत देशांत बालकजन्म नियंत्रण कार्यक्रम हा कुटुंबाचा आकार मर्यादित ठेवतो व स्त्रियांना दोन पेक्षा जास्त मुले होण्यापासून परावृत्त करतो. उलटपक्षी, युरोपमध्ये जेथे जन्माचे प्रमाण हे कमी आहे तेथे बायकांना जास्त मुले होण्यासाठी निरनिराळ्या प्रोत्साहन योजनांतून आकर्षित केले जाते. स्त्रियांना खंडित काळाच्या नोकरीच्या संधि (*Part-Time Jobs)* दिल्या जातात.

कुटुंबप्रमुखत्व हे मातृत्व (*Motherland)* आदर्शवत मानते व त्याद्वारे स्त्रियांना माता बनणे हे सूचित करते. ही मातृत्वाची पायाभूत कल्पना ही स्त्रियांवरील अत्याचारांची मूळ म्हणून विचारात घेतली जाते तसेच तो स्त्रिलिंगी व पुल्लिंगी हे प्रकार निर्माण करते व कुटुंबप्रमुखत्वाला चिरस्थायी वा शाश्वत बनविते. ती स्त्रियांची चालनशक्ति मर्यादित करते व त्यामुळे पुरुषांच्या प्रभुत्वाचे पुनरुत्पादन होते.

## **३) स्त्रियांच्या लैंगिकतेवर नियंत्रण (*Control Over Women's Sexuality):-***

पुरुषांच्या गरजा व इच्छा ह्यानुसार स्त्रियांना नवऱ्यांना लैंगिक सेवा पुरविणे क्रमप्राप्त असते. प्रत्येक समाजात स्त्रियांचे विवाहबाह्य लैंगिक संबंध व्यक्त करण्यावर मर्यादा घालणारे नैतिक व कायदेशीर नियम हे अस्तित्वांत असतात तथापि पुरुष संकराकडे नेहमी दुर्लक्ष केले जाते (*Male Promiscuity).*

स्त्रियांच्या लैंगिककत्तेवर नियंत्रण करण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे जेव्हां पुरुष त्यांची पत्नी, मुली किंवा अन्य स्त्रियाचे नियंत्रण वेश्या व्यवसायांत करण्यास भाग पाडणे, बलात्कार (*Rape)* आणि बलात्काराची धमकी हा आणखी एक मार्ग आहे ज्यामध्ये स्त्रियांची लैगिकता ही लाज आणि मान, कुटुंबाचा मान ह्या कल्पनांमधून नियंत्रित केली जाते. शेवटी स्त्रियांची लैंगिकता ही त्यांचा पोषाख, वागणूक आणि चालनाशक्ति ह्याबाबत (*Mobility)* त्यांचे कुटुंबिय तसेच समाज, सांस्कृतिक व वागण्याचे धार्मिक नियम ह्यांच्याकडून काळजीपूर्वक दिले गेलेले संरक्षण ह्यामुळे नियंत्रित केली जाते.

## **४) स्त्रियांची गतिक्षमता (*Women's Mobility):-***

स्त्रियांच्या लैगिक, उत्पादन व पुनरुत्पादन ह्याच्या नियंत्रणाशिवाय पुरुष है स्त्रियांची गतिक्षमता पण नियंत्रित करतात. घरातून बाहेर पडतांना बुरखा सक्तिने घालणे, दोन जातीमध्ये (पुरुष व स्त्री) ह्यांच्यात परस्परसंबंधावर बंधन,

हे आणखी काही मार्ग आहेत ज्यामुळे कुटुंबप्रमुख समाज हा स्त्रियांची गतिक्षमता व हालचालींचे स्वातंत्र्य ह्यांवर नियंत्रण करु शकतो. अशा त-हेची बंधने ही स्त्रियांसाठी विलक्षण आहेत पण पुरुष मात्र अशा प्रकाराच्या बंधनाचे शिकार झालेले नाहीत.

## १) मालमत्ता आणि अन्य आर्थिक स्त्रोत (*Property and other Economic Resources) :-*

बहुतांशी मालमत्ता व अन्य उत्पादनक्षम स्त्रोत ह्यांचे नियंत्रण पुरुषांनी केलेले असते व ती नियंत्रण परंपरा बापाकडून मुलाकडे पुढे दिली जाते. इतकेच काय, ज्या समाजांत स्त्रियांना मालमत्तेमध्ये वंशपरंपरा अधिकार आहे त्याठिकाणी परंपरागत पद्धति, सामाजिक मान्यता व भावनात्मक दबाव यामुळे स्त्रियांना ह्या गोष्टींवर नियंत्रण करण्मास प्रतिबंध केला जातो एकूण संयुक्त राष्ट्रांच्या आकडेवारीनुसार (*UN Statistics)* "जगांत केल्या एकूण जागाऱ्या कामाच्या ६० टक्के तासांहून जास्त काम हे स्त्रिया करतात पण त्यांना जगाच्या उत्पन्नाध्या १० टक्के उत्पन्न व स्वतःच्या जागतिक मालमत्तेच्या १ टक्का उत्पन्न मिळवितात."

समाजाच्या कुटुंबप्रमुख अधिकाराखाली पुरुष हे स्त्रियांच्या जीवनांतील निरनिराळ्या क्षेत्रावर कशा रीतीने नियंत्रणा करतात हे आता आपण पाहिले आहे. ह्या गटामध्ये जाती आणि लिंग ह्या पहिल्या संकल्पना जोडीचा अभ्यास केला जात आहे. संज्ञा जाती ही पुरुष व स्त्रीया ह्यांमधील जीवशास्त्रविषयक आणि शारीरिक भेदभावांशी वा फरकांशी संबंधित आहे. स्त्री पुरुष समतावादी हे मूळ जीवशास्त्रविषयक फरकांचा स्वीकार करतात पण असे प्रतिपादन करतात की, जीवशास्त्रीय पुरुष व जैविक स्त्री हह्यांचे विशेष गुण (*Traits)* व गुणधर्म ह्यांची सामाजिक बांधणी झालेली आहे. संज्ञा लिंग ही कुटुंबामुख समाजांत पुरुष व स्त्री ह्यांच्यामधील सामाजिक बांधणीच्या भेदाचा संदर्भ देते. अगदी अलीकडच्या काळातील आणखी स्त्रीपुरुष समतावाद लिखाणांत असा एक उदयोन्मुख (*Emergent)* दृष्टीकोन आहे की, जाली आणि लिंग ह्यामधील चटकन न वाकणारा फरक हा पूर्णपणे जीवशास्त्रविषयक वा एकट्याच सांस्कृतिकपणे स्वीकारणे हे कठीण आहे.

जाती / लिंग भेदभाव / फरक पुरष स्त्री / पुल्लिंगी स्त्रीलिंगी / पुरुषाचा संबंध हा पुल्लिंगाशी आणि स्त्रीचा संबंध हा स्त्रिलिंगाशी हा महत्त्वाचा प्रश्न उभा करतो. अशा रचना / अभिप्राय ह्या पुरुष आणि स्त्री ह्यामधील जीवशास्त्र भेदभाव ह्यांचे सामाजिक संज्ञा व वर्णने ह्यांच्यात भाषांतर (रुपांतर) करतात. स्त्रीपुरुष समतावादी लेखक असे मत मांडतात की, पुल्लिंगत्व व स्त्रिलिंगत्व ह्यांच्या सामाजिक वर्णनांतून जीवशास्त्रविषयक फरक हा कळसाला जाऊन पोहोचतो.

स्त्री पुरुष समतावादी लेखक हे कुटुंब ह्या कल्पनेचा संदर्भ पुरुषत्वाचे (पुल्लिंगाचे) स्त्रियांवरील वर्चस्व ह्या सामाजिक प्रणालीसाठी देतात. त्यांनी कुटुंबप्रमुख समाजातील स्त्रियांच्या दुय्यम स्थानाच्या मूलभूत तत्त्चे समजून घेण्यासाठी बऱ्याच सिद्धांतांचा विकास केला आहे.

कुटुंबप्रमुख व पिता ह्या समाजांत पुरुष हे स्त्रियांचे उत्पादन काम व पुनरुत्पादन हह्यांचे नियंत्रण करतात. कुटुंबप्रमुखत्च हे मातृत्वाला आदर्श मानते व त्यायोगे स्त्रियांना माता होण्यास जबरदस्ती करते व त्यांच्या मातृत्वाच्या परिस्थिती निश्‍चित करते. कुटुंब प्रमुखत्य हे स्त्रियांची गतिक्षमता रोखून धरते व पुरुषांच्या वरचढपणाचे पुनरुत्पादन करते ह्या संकल्पनांचा वापर हा लिंगाविषयी अभ्यास करतांना पुरुषांचा वरचद्धपणा वा श्रेष्ठत्व आणि स्त्रियांचा दुय्यमपणा ह्यांची मूलभूत तत्वे समजून घेण्यासाठी केलेला आहे.

## स्त्रीयांचे घटनात्मक सक्षमीकरण

### लोकसभा आणि पंचायत हयामध्ये स्त्रियांना ३३% आरक्षण (*33% Reservation for Women in Panchayat): Parliament*

स्त्रियांच्या हया ३३% आरक्षण जागाबद्दल उमटलेल्या प्रतिक्रिया हया निरनिराळया व तीव्र होत्या. त्यावर पहिल्या प्रथम भाष्य करणाऱ्या विरोधी पक्षांत मुख्यतः भारतीय जनता पार्टी व शिवसेना हे होते. त्यांनी असा संशय

आवाजी शब्दात व्यक्त केला की काँग्रेस पक्षाकडून खेळली गेलेली स्पष्ट खेळी आहे - एक म्हणजे राजकीय व दुसरी म्हणजे त्यांच्यावर कुरघोडी करणे.

हया चालीला (*move)* पाठिंबा हा फक्त निरनिराळ्या पक्षांच्या राजकीय स्त्री नेत्यांकडून मिळाला.

**पंचायती राज्य संस्था** (*Panchayati Raj Institutions):*

स्वयं सरकारची खोल मूळे क्षेत्र ही भारतातील ग्रामीण भागांत सामाजिक, आर्थिक परिवर्तन करुन आणणारी वाहाने म्हणून जाहिर केली गेली आहेत. अशा या संस्थांचे परिणामकारक व अर्थपूर्ण कामकाज हे फक्त त्यांच्या पुरुष आणि स्त्रिया दोन्ही प्रकारच्या नागरिकांच्या सक्रिय गुंतवणूक योगदान आणि सहभाग हयावर अवलंबून राहिल.

"पंचायत राज" ही संज्ञा ही तुलनात्मकदृष्टया नवीन असून तिचा उगम हा ब्रिटिश प्रशासनाच्या काळात राज्य म्हणजे शब्दशः अर्थ हा राज्य वा सरकार हयापासून झाला. महात्मा गांधीनी पंचायत राज हयाचे विकेंद्रीत असे सरकारचे रुप असे समर्थन केले होते, ज्यामध्ये प्रत्येक खेडेगाव हे त्यासाठी (सरकारसाठी) स्वतःचे व्यवहार बघण्यास जबाबदार राहिल व ते राज हे भारताच्या राजकीय प्रणालीचा पाया असेल. त्यांची स्वतःचे स्वप्न म्हणून ग्राम स्वराज्य (खेडेगावाचे स्वतःचे सरकार) ही संज्ञा होते.

राज्य सरकारने १९५० मध्ये त्याचा स्वीकार केला व १९६० साली निरनिराळ्या राज्यांत अशी पंचायती स्थापना करण्यासाठी कायदे हे मंजूर केले गेले, हया कल्पनेला सामावून घेण्यासाठी १९९२ साली ७३ व्या कायदा दुरुस्तीने (*73 Amendment)* तिला भारतीय राज्यघटनेत पाठिंबा मिळाला १९९२ चा दुरुस्त कायदा हा पंचायतीना अधिकार व जबाबदाऱ्या हया दोन्ही देण्याची तरतूद करतो, त्यामुळे पंचायतींना आर्थिक विकास योजना व सामाजिक न्याय हया दोन्हीसाठी योजना बनविणे शक्य होईल, तसेच भारतीय राज्यघटनेच्या ११ व्या तपशीलांत मादी केलेल्या २९ विषयांच्या संदर्भात त्या योजनांची अंमलबजावणी करणे शक्य होईल.

पंचायत पध्दती हिला तीन स्तरीय (*Three Tier)* रचना आहे उदा. १) खेडेगाव पंचायत किंवा ग्राम पंचायत (२) पंचायत समिती आणि (३) जिल्हा परिषद,

ही मंडळे जी कायदेशीरपणे स्थानिक सरकार आहेत, त्यांना चार त्रिकोणी बाजू असलेली घनाकृति रचना आहे (*Pyramid)* त्याच्या पायाशी ग्रामसभेत त्या खेडयातील गावच्या नागरिकांचे संपूर्ण मंडळ अहे. ही म्हणजे सर्वसाधारण मंडळ असून जी स्थानिक सरकारची निवड करते आणि त्यांच्यावर काही ठराविक जबाबदाऱ्यांचा भार सोपविते हया मंडळाने ठराविक वेळी भेटण्याची अपेक्षा असते व निवड मंडळाने घेतलेल्या प्रमुख निर्णयांना मान्यता देते हया पायाभूत लोकशाही क्षेत्राच्या वर ग्रामपंचायत येते जी पहिल्या पातळीवरील निवडलेली समिती असते. त्यांनतर मध्य भागांतील संस्था हया पंचायत समिती असतात ज्या समुदाय पातळी (*Block Level)* म्हणून काम करतात, प्रत्येक समुदायामध्ये अनेक खेडेगावांचा समावेश असतो.

शेवटी जिल्हा परिषदा येतात ज्या तालुका पातळीवर काम करतात. हया दोन मंडळांचा मुख्य उद्देश हा ग्रामपंचायतीच्या कार्यक्रमांचे सूत्रसंचालन करणे व त्यांना अशा क्षमता पुरविणे ज्या सूक्ष्म पातळीवर संपूर्णपणे निर्माण केल्या जात नाहीत. ह्या पंचायतींना जे अधिकार असतात ते प्रत्येक राज्याने केलेल्या कायद्यांमध्ये जतन करून ठेवावे लागतात व भारतामध्ये प्रत्येक राज्यामध्ये महत्वाची विभिन्नता आहे.

पंचायत राज्य पध्दतीचे ध्येय हे खेडयातील बहुजन समाजाला ज्यामध्ये खिया व दारिद्रयरेषेखालील गट हयांना स्वंयरोजगार निर्माण करने, शिक्षणाला बढती देणे व त्यांना त्यांच्या राजकीय व सामाजिक अधिकार हयांबदद्ल जागरुक करणे हयासाठी सत्ता बहाल करने असे आहे.

११९२ सालातील ७३ व्या घटनादुरुस्तीने ३३% टक्के जागा हया स्त्रियांना पंचायत राज्यांत आरक्षित केल्या गेल्या पंचायत पातळीवर स्त्रियांच्या आरक्षणाचा अनुभव हा अत्यंत उत्साहवर्धक/उत्तेजन देणारा आहे. दर पांच वर्षांनी देशामध्ये लक्षावधी स्त्रिया हया पंचायतीसाठी निवडल्या जातात. आरक्षण घोरणाचे समर्थन करणारे असे प्रतिपादन करतात की, पंचायतीमध्ये स्त्रियांना राखीव जागा ठेवल्याने भारतामध्ये स्त्रियांचे खूप भले झाले आहे. तथापि हे लक्षात घेतले पाहिजे की, राजस्थान व उत्तर प्रदेश हया राज्यात जेथे लिंगविषयक समानता आकडेवारी ही भारतात अत्यंत वाईट अशी आहे, खियांच्या पंचायती हया त्यांच्या नवऱ्यांना प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार आंधळेपणाने बहाल करतात. अशा कितीतरी स्त्रियांची उदाहरणे देता येतील जेथे त्या स्त्रियांनी संपूर्णपणे त्यांच्या नवऱ्यांनी सांगितल्याप्रमाणे वा कुटुंबाच्या अन्य पुरुष सभासदांच्या सांगण्यानुसार कारभार केला आहे काही घटनांमध्ये त्या निवडून आलेल्या स्त्रिया घरी राहात तर त्यांचे नवरे हे पंचायत सभाना हजेरी लावीत व त्या स्त्रियांच्या वतीने अधिकृत व्यवहार करीत होते. कांही निवडून आलेल्या स्त्रियांकडे पुरुषांकडून संपर्क हा फक्त जेव्हा त्यांच्या सहया वा आंगठयाच्या ठशाची गरज भासली तेव्हा केला गेला. वरील बहुसंख्य घटनांत जेव्हा पंचायती जागी ही स्त्रीसाठी राखीव असते तेव्हा निवडून आलेल्या महिलेचा नवरा हा प्रत्यक्षात (*de facto)* निवडून आलेला प्रतिनिधी बनतो जो त्याच्या पत्नीच्या नावाने व्यवहार / कारभार नियंत्रित करण्याचा प्रयत्न करतो. असे ठासून सांगितले जाते की, बऱ्याच खिया हया पहिल्या वेळेलाच निवडून आल्या आहेत, व त्या अशिक्षित आहेत त्यामुळे त्या त्यांच्या पुरुष मंडळीवर पंचायत कारभार चालविण्यासाठी अवलंबून राहातात. अन्य शब्दांत स्त्रिया त्यांच्या पुरुष मंडळीचे परिणाम समजून न घेताच अनुकरण करतात.

हया आरक्षण बिलापूर्वी स्त्रियांचा पंचायती राज्यांत सहभागाची आकडेवारी ही अत्यंत कमी होती ( ४ ते ५ टक्कयांमध्ये) आज उमेदवारांपैकी ३३% टक्के उमेदवार ज्या पंचायती राज्यांत सहभागी होत आहेत त्या खिया आहेत. साधारणतः स्थानिक पातळी/ स्तरावरील सहभाग हा दोन दृष्टीकोनातून पाहिला जातो दर्जा आणि प्रमाण (*Quality and Quantity)* दर्जा वा गुणवत्ता हा भाग पाहिल्यास तीन तऱ्हेच्या गुणवत्ता सहभाग पातळया हया दिसून येतात अक्रियाशील सहभाग (*Passive Participation)* क्रियाशील सहभाग (*Active Participation)* व निर्णय घेण्याचा प्रक्रियेत सहभाग (*Decision making participation)* पण खी प्रतिनिधीमध्ये हया गुणवत्ता सहभागाची उणीव आहे. घटनात्मक तरतूद ही फक्त आवश्यक पायरी आहे जिचा वापर हा ग्रामीण भागातील स्त्रियांचे उद्धारासाठी प्रभावशाली उपायांनी केला गेला पाहिजे. स्त्रियांचा समाजांत राजकारणात सहभाग सत्य स्वरुपात आणण्यासाठी त्यांच्या सध्याच्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीमध्ये पुष्कळ काम करावयाचे अद्याप बाकी आहे.

स्त्रियांच्या प्रभावी आरक्षणाखेरीज पंचायती राज्यसंस्थात, सहभाग हा स्थानिक दलाल शक्तीमुळे गैरवापर व बनावट रीतीने केला गेला आहे. स्त्रियांचे त्यांच्या हक्क आणि पध्दती व त्यांचा स्थितीजन्य कार्यशक्ति व जबाबदाऱ्या हयाविषयीचे अज्ञान हयामुळे स्त्रिया हया स्थानिक मंडळात पुरुषांच्या खूप मागे ठेवल्या गेल्या आहेत. स्त्रियांसाठी स्थानिक स्वराज्यसंस्थांत राखीव जागांची संख्या वाढल्याने खियांचा वाढता सहभाग हा होईल याबदद्ल बरीच शंका वाटते. कांहीतरी रचनात्मक बदल घडवून आणल्याशिवाय, स्त्रियांना शिक्षण देऊन सुशिक्षित करणे व सध्याचे ग्रामीण विभागातील अधिकारसत्ता रचना ही पूर्णपणे तटस्थ झाल्याशिवाय या बाबतीत जास्त काहीही करता येणे शक्य नाही.

**मानसशास्त्रीय अटकाव (*Psychological Barriers):***

स्त्री प्रतिनिधी हया नेहमी अटकाव / प्रतिबंध हया मागे धावतात (विशेष करून कौटुंबिक आणि सामाजिक प्रतिबंध) व प्रभावशाली सहभाग घेण्यात मागे पडतात. जेव्हा त्या पुरुषी अधिसत्ता असलेल्या मोठया विधिमंडळात असतात तेव्हा विशेषतः त्या बोलणे दाबून ठेवतात असे वाटते. ज्या मोठे धैर्य आणून व शक्ती आणून बोलतात त्यांच्याकडे अंत्यंत कमी लक्ष वा मान दिला जातो. असे दिसून आले आहे की, गणसंख्या पुरी करण्यासाठीच स्त्रियांना फक्त आमंत्रण दिले जाते. आणखी पुढे असे आहे की, अधिकारी पुरुष वा व्यक्ति हे वरच्या वर्गातील स्त्रियांच्या गरजांकडे खालच्या वर्गातील स्त्रियांच्या गरजांपेक्षा जास्त लक्ष देतात. त्यामुळे स्त्रियांचे हक्क हे पध्दतशीरपणे नोकरशाहीकडून रद्द केले जातात.

**पंचायती राज्य संस्थांच्या प्रभावशाली काम करण्याच्या मार्गात अडथळे येणारे स्त्रियांचे व्यक्तिगत कमजोरपणा (*Women that come in the way of effective functioning of PRI):***

कुटुंब, समाज आणि राज्य (ज्यांचे प्रतिनिधीत्व हे अधिकारी करतात) हया सर्वानी मिळून परिस्थिती निर्माण केली आहे की, जेथे निवडून आलेल्या खिया प्रतिनिधी हयांना खूप कामकाजातील अडथळयांना तोंड द्यावे लागते ज्यावेळी त्या त्यांच्या भूमिका व कामे हया पंचायत राज्य संस्थामध्ये करीत असतात. महिला प्रतिनिधीमध्ये काही व्यक्तिगत दुबळेपणाचे दोष आहेत.

१) निरक्षरता (*Illiteracy)* आणि कमी शैक्षणिक पातळी ही बहुसंख्या पंचायतराज्य संस्थांमध्ये निवडलेल्या महिलांत असते.

२) कौटुंबिक जबाबदाऱ्याच्या ओझाने दबून जाणे.

३) संपर्क यंत्रणा कौशल्यांचा उणीव असल्याने अंतर्मुखता (*Introversion)..*

४) गरीब सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी ज्यामुळे स्त्रिया हया प्रणालीमध्ये येतात व दुर्बल क्षमता बांधणी.

५) कुटुंबप्रमुखत्व पध्दत्त अप्रत्यक्षरीत्या त्यांच्या सहभागावर थेट नियंत्रण ठेवते.

स्त्रियांच्या गुणविशेष सहभाग हा पंचायतीराज्य संस्थामध्ये असण्यासंबंधी आणखी अन्य मर्यादा आहेत.

अ) कुटुंबातील पुरुष सभासह आणि जातिगटांतील नेते / समाज नेते हे पंचायतीच्या कारभाराच्या मार्गात अडथळा आणतात.

ब) हया पंचायतीराज्य पध्दतीत काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची बेपर्वा वृत्ति व वागणूक.

क) स्थानिक नोकरशाहीने केलेले चुकीचे मार्गदर्शन.

ड) हया पध्दतीमधील अन्य निर्वाचित सभासदांकडून अविश्वासाचा ठराव आणण्याची भीति.

इ) पंचायतराज्य पध्दतीत ज्यांचे लिंगविषयक आरक्षण जागांमध्ये आर्थिक हितसंबंध गुंतलेले आहेत, अशा राजकीय पक्षाचा वाढता दबाव.

ग्रामसभा ते जिल्हा परिषद हया प्रत्येक सहभागाच्या वेळी स्त्री प्रतिनिधींना प्रत्येक पायरीवर समस्यांना तोंड द्यावे लागते. उत्तर प्रदेशातील पंचायतराज्य सभांमध्ये निवडून आलेल्या ३०० महिला प्रतिनिधीची एक खुली सभा ही ग्रामीण खटले व अधिकार केंद्राने आयोजित केली होती त्यावेळी भाग घेणाऱ्यांनी पुढील निरीक्षणे नोंदविली.

१) सरकार हे पंचायतराज्य संस्थांना हक्क / अधिकर स्वाधीन करण्याचा हुकूम देते ही केवळ चेष्टा आहे/उपहास आहे.

२) त्या समुदाय पातळी कर्मचा-यांकडून सतत दलाली/कमिशन मागणे ही अव्याहत प्रथा होती.

३) खेडुतांच्या नजरेत स्त्रिया हया अकार्यक्षम म्हणून शिक्का मारला गेला व त्यांना अविश्वासाचा ठराव संमत करून जबरदस्तीने जागा खाली कराव्या लागल्या.

४) महिलांच्या नवऱ्यांच्या ढवळाढवळीमुळे (हुद्दा सरपंच) महिला प्रतिनिधींना ते केवळ बुजगावणे (*Dummy)* म्हणून वागणूक देत होते.

५) पुरुष सभासद आणि स्थानिक नोकरशाही हयांच्यामधील वाढत्या प्रमाणातील भ्रष्टाचाराची पध्दती.

आरक्षण हे पुरेसे नाही हे स्पष्ट आहे कारण महिला प्रतिनिधी हया अंतर्गत व बाहय हया दोन्ही कारणांमुळे गुणवत्तात्मक सहभाग घेण्यात मागे पडतात. स्त्रियांचे अधिकार हे काहीतरी चीज नाही जी फक्त स्त्रियांनाच दिली जाऊ शकते. ही एक प्रक्रिया आहे ज्यामध्ये प्रामाणिकपणा, उत्सुकता आणि क्षमता व कार्यतत्परता हया गोष्टीची स्त्रिया व पुरुष हया दोघांच्याही गुंतवणुकीचा भाग आहे. भारतीय खेडेगावांत ही एक आव्हानात्मक कठीण काम आहे कारण आजसुध्दा स्त्री ही स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकत नाही. ती तिच्या नवऱ्याला व मुलाला पण दुय्यम वाटते.

**स्त्रियाचा पंचायत राज्य संस्थांमध्ये सहभाग वाढविण्याचा उपाय**

## *(Remedy to increase women's Participation in the Panchayat Raj Institutions):*

काही समस्या व त्यावरील उपाय हे पुढीलप्रमाणे आहेत.

### १) कमी प्रतिष्ठा / दर्जा व नीतिधैर्य ते अद्ययावत करण्याची गजर (*Low Status and Morale: Need of Upgradation):*

खेडेगाव क्षेत्रांतील बहुसंख्य महिला हया कौटुंबि सदस्य / पंचायत सदस्य हयांच्या समोर स्वतःला कमी दर्जाच्या समजतात. ही प्रवृत्ति बदलण्यसाठी स्त्रियांना घरातील सदस्यांचा एक त्याचप्रमाणे पंचायतीचा एक भाग व घटक बनविणे गरजेचे आहे. त्यांनी त्यांची आत्मविश्वासाची पातळी / उंची कायम राखून ठेवली पाहिजे. महिला प्रतिनिधीबरोबर आणखी एक प्रमुख अडचण आहे. वन्य जात व वन्य जमात हयामधून येणाऱ्या स्त्रियांना सर्वसाधारण वर्गात्तील प्रतिनिधीशी मिसळून जाणे कठीण वाटते. हया समस्येशी लढा देण्यासाठी / बरोबरी करण्यासाठी त्यांच्यामध्ये आत्मविश्वास उत्पन्न केला पाहिजे तसेच वरिष्ठ वर्गाच्या मनोवृत्तीत प्रशिक्षीत मानसिक बदल घडवून आणण्यासाठी अशा वृत्तीच्या व्यक्ति ज्या जातीय भावनांना चिथावणी देतात (*Foment)* त्यांच्या विरोधात कडक कारवाई ही केली गेली पाहिजे.

### २) बालपणापासूनच पुरुषांवर अवलंबत्व (*Dependence upon men since childhood):*

लहान वयाच्या अवस्थेपासूनच स्वतंत्रपणाची गरज भारतीय खेडयांत / ग्रामीण भागांत, मुली हया बाप, भाऊ वा भाचा हयांच्यावर अवलंबून राहतात व ही भावनाच त्यांच्या वैवाहिक जीवनानंतर पण चालूच राहते. आपण शाळांमध्ये मुलींना स्वतंत्र बनण्पासाठी क्षमता वाढीचे प्रशिक्षण दिले पाहिजे १४ वर्षापर्यत मोफत विश्वविद्यालयीन शिक्षण कार्यक्रम हयांची जोरदारपणे अंमलबजावणी केली गेली पाहिजे. ह्या अभ्यासक्रमामध्ये लिंगविषयक समानता, स्वाभिमान, धैर्य, स्वातंत्र्य इत्यादि मूल्ये ही मनावर ठासून बिबविली गेली पाहिजेत त्यामुळे स्त्रिया / मुली हयांचा व्यक्तिमत्व विकास होण्यास मदत होईल, सर्व प्रकारच्या सार्वजनिक सहभागांत घराकडे लक्ष देणे व मुलांकडे नीट ध्यान देणे हया प्राथमिक जबाबदाऱ्या खियांच्या मार्गात अडथळा म्हणून येतात जोपर्यंत मुलांचे संगोपन व अन्य जबाबदाऱ्या हयांच्याकरीता व्यवस्था केल्या जात नाहीत. तोपर्यंत सार्वजनिक क्षेत्रांतील स्त्रियांचा उचलून धरणारा सहभाग हा शक्य नाही.

### ३) पंचायत राज्य संस्थामध्ये निवडून आलेल्या महिला प्रतिनिधी त्यांच्या पुरुष मंडळीसाठी मार्ग मोकळा करून देतात स्वतंत्र निर्णय घेण्याची आवश्यकता (*Women elected Representatives of PRIs Give way to their men folk: Need of taking independent Decision):*

पंचायत राज्यसंस्थामधील महिला प्रतिनिधींना हयांना निर्णय घेण्याची कला व शाख हयांमध्ये प्रशिक्षण देणे आवश्यक आहे त्यामुळे बाहय घटकांचा त्यांच्यावर प्रभाव पडणार नाही. त्यांनी नेतृत्वाच्या गुणधर्माचा विकास केलाच पाहिजे. त्यांनी अन्य स्त्रियांबरोबर चर्चा व त्यांचे मत घेतले पाहिजे, पंचायतीच्या सर्व महिला सभासद व अन्य कार्यकारी मंडळे हयांना त्यांचा अधिकार वापरण्यासाठी प्रशिक्षण व सत्ता दिली गेली पाहिजे. विशेष ध्यान हे जातीतील नेत्यांमध्ये

परस्परसंबंध संपर्क कौशल्ये विकसित करण्यासाठी दिले गेले पाहिजे, निवडून आलेले प्रतिनिधी व विकास अधिकारी हयांच्यामध्ये जोडणी करून महिलांचा सहभाग स्पष्ट करण्यासाठी प्रयत्न हे प्रस्थापित करण्याची गरज आहे. पूर्वी खेडेगावात प्रचलित असलेली पुरुष वर्चस्व असलेली अधिसत्ता रचना ही स्त्रियांना कार्याध्यक्ष (सरपंच, समुदाय समितीचे प्रधान आणि जिल्हा परिषदेचे कार्याध्यक्ष) म्हणून स्वीकार करण्यास तयार नाही. त्रियांना जबाबदारी स्वीकारण्यासाठी पुढे येण्यासाठी प्रवृत्त करुन ही समस्या सोडविली जाऊ शकते. त्यासाठी ग्रामीण भागांतील प्रतिष्ठित व्यक्तिसाठी विशेष ओळख करून देणाऱ्या शिबिरांची आवश्यकता आहे.

### ४) आस्था आणि ज्ञान हयांची कमतरता उत्साह आणि प्रशिक्षणाची गरज (*Lack of Interest & Knowledge: Need of Enthusiasm & Training):*

केंद्र सरकार व राज्य सरकारे हयांच्या पंचायतराज्य संस्थाबद्दल उदासीनवृत्ति हयामुळे स्त्रियांना पंचायतराज्यसंस्थामध्ये आस्थेची उणीव आहे. त्यांनी (स्त्रियांनी) स्वतःमध्येच एक ध्येय ठरवून उत्साह हा निर्माण केला पाहिजे व समर्पण आणि आदर हया चैतन्यांनी त्या बदलाला स्वतःच जोडून घेतले पाहिजे. सहभागी स्त्रिया हया कल्पनांची देवाणघेवाण करण्यांसाठी सामंजस्य असणाऱ्या पात्रतेच्या असल्या पाहिजेत त्यांना राजकीय प्रशासकीय संस्थांमध्ये काम करण्यासाठी योग्य ते प्रशिक्षण दिले गेले पाहिजे. असे सुचवावेसे वाटते की, पंचायतराज्य संस्थांनी स्थानिक भाषांमध्ये प्रसिध्दी साहित्य-ऑडियो-व्हिज्युयल तयार केले पाहिजे व छपाई माध्यमे (*Print Media)* हया बाबतीत स्त्रियांसंबंधीत विषय व पुढील आशा (*Prospects)* हह्यांबद्दल माहितीचा फैलाव करून महत्वपूर्ण रीतीन योगदान देऊ शकतील.

### ५) विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी खुले स्थान नाही सर्व स्त्रियांसाठी खुल्या जागेची गरज (*No forum to Exchange Ideas: Need for all Women Forum):*

निवडून आलेल्या त्रिस्तरीय प्रतिनिधींनी तीन महिन्यातून एकदा भेटले पाहिजे व पूर्णत्व असलेल्या योजना निर्माण केल्या पाहिजेत. अशा रीतीने महत्वाच्या विषयांवर साधकबाधक चर्चा करतांना त्यांना जास्त भाग घेता येईल, संघर्षासाठी स्त्रियांच्या गटांना संघटन करून व चालना देऊन सत्ता बहाल करण्याच्या प्रक्रियेत सामाजिक बदल आवश्यक आहे. सर्व खेडयांमध्ये महिला मंडळांची स्थापना झाली पाहिजे व त्याला राष्ट्रीय महिला कमिशन व इतर स्त्री कल्याण आधारित असरकारी संघटनांचा पाठिंबा असला पाहिजे.

### ६) महिला आमदार (*MLA)* आणि खासवार (*MPs)* हया त्यांच्याबददल आस्था दाखवित नाहीत स्वतः या उदाहरणावरुन चालना देण्याची गरज (*Women MLAs and MPs do not take interest in them: Need of Motivation by their own examples):*

स्त्री आमदार व खासदार हयांनी पंचायतराज्य संस्थांच्या निर्वाचित प्रतिनिधीची वारंवार भेट घेऊन ग्रामीण महिला सभासदांना तोंड द्यावा लागणाऱ्या प्रश्नांवर उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यांनी त्या महिला प्रतिनिधींना स्वतंत्रपणे निर्णय घेण्यासाठी उत्तेजन दिले पाहिजे. राष्ट्रीय व ग्रामीण राजकीय पक्ष हे त्यांना प्रजासत्ताक / लोकशाही संस्थांचे कामकाज, प्रक्रिया व मूल्ये हयाबददल जागरुक करण्यांत मोलाची भूमिका करु शकतात.

सत्ता बहाल करणे हमाला बहुव्यापी आकारमान केंद्रबिंदू आहे आणि दिलेल्या समाजातील वातावरणाच्या शक्तिवर त्याचे यश हे अवलंबून असते. त्यासाठी सामान्य लोकांच्या पातळीवर (*Grass-root level)* खियांना सत्ता बहाल करण्यासाठी सशक्त वातावरणाची ही आवश्यकता आहे. अनुभवांवरुन घडे शिकणे आणि स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर घटनांचा अभ्यास हे महत्वपूर्ण आहे.

शेवट करताना असे सांगितले जाऊ शकते की, पंचायतराज्य संस्थांमध्ये स्त्रियांना ३३% आरक्षण ही चांगली पायरी आहे पण तिला प्रभावशाली उपायांनी आधार दिला पाहिजे ज्यामुळे स्त्रियांच्या गुणवत्ता विषयक सहभागाची खात्री

देता येऊ शकते. राखीव जागा हयांना योग्य प्रमाणांत होकारार्थी कृती कार्यक्रमाची जोड दिली गेली पाहिजे. स्त्रियांना सत्ता वा अधिकार देणे हे फक्त आरक्षणातूनच दिले जाणे शक्य होऊ शकत नाही तर सत्ता बहाल न करणाऱ्या कारणांना दूर हटविणे जरूरीचे आहे जरी ती कारणे सामाजिक, राजकीय व मानसशास्त्रीय असतील आणि स्त्रियांच्याकडे बहुजन बदल समाजामध्ये प्रवृत्ति बदल ही असू शकतील.

**आरक्षणाची आवश्यकता** (*The Necessity for Reservations):*

डाव्या पक्षाच्या स्त्रियांनी महिला उमदेवारांच्या घसरत जाणाऱ्या संख्येबददल काळजी / चिंता व्यक्त केली आहे. फक्त हाताच्या बोटावर मोजता येईल इतक्याच स्त्रिया हया स्वातंत्र्य सैनिकांची पिढी तयार करतात. उदा. मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर, मंजू गांधी, प्रमिला दंडवते ज्या अजूनहि राजकारणांत सक्रीय भाग घेत आहेत. त्या सर्व त्यांची जागा, त्यांच्या संघटनाचे नेतृत्व आणि त्यांचा संघर्ष जिवंत ठेवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या तरुण महिलांची उणीव ही क्रियाशीपणे भरुन काढतात्त. हया कमी होणाऱ्या संख्येच्या कलाला आकडेवारीने पुष्टि दिली आहे. १९८९-९० मध्ये महाराष्ट्रांत झालेल्या विधानसभा निवडणूकीत २८८ एकूण जागा होत्या ज्या ६२६८ पुरुष उमेदवारांनी व १४८ स्त्री उमेदवारांनी लढविल्या होत्या म्हणजेच २.३%

राजकारणी महिला हया दुःखदायक घसरणुकीला दोष हा त्यांच्या पक्षांच्या चुकांना देतात, त्यांचा पक्ष हा राष्ट्रीयत्व चळवळीला पाठिंबा देत नव्हता व राजकीय पक्ष ज्यांनी महिलांना त्यांच्या हक्कासाठी संघर्ष करण्यास उत्तेजन दिले व निवडणूक प्रक्रियेत भाग घेण्यास प्रोत्साहन विले तेच पक्ष आज स्त्रियांच्या राजकीय प्रवेशासाठी विरोध करीत आहेत. उपरोधाने तेच पक्ष पहिल्या प्रथम त्यांच्या निर्मितीपासून त्यांनी स्त्रियांना प्रचंड आश्वासने दिली आहेत. ते सर्व पक्ष लिंगविषयक भेदभाव नष्ट करणे आणि आर्थिक संधी पुरविणे हया विषयांवर भाषण करतात. जनता दलाचा जाहिरनामा हा ३० टक्के सरकारी नोकऱ्या हया स्त्रियांसाठी राखीव जागा ठेवण्याचे आश्वासन देतो. भारतीय जनात पक्षाला नवऱ्याच्या संपत्ति आणि उत्पन्न हयात पत्नीला सहभागीदार करणे पसंत आहे. कॉंग्रेस आय ही स्त्रियांना स्थानिक स्वतंत्र सरकारांत स्त्रियांना ३०% आरक्षण हयाखेरीज स्त्रियांची नावे ही जमीन व घरमालकी हयामध्ये समाविष्ट करण्याचे वचन देते व स्त्रियांमध्ये त्यांच्या अधिकार / हक्कांविषयी जागरुकता पसरविण्याचे आश्वासन देते.

बहुतेक पक्ष हे स्त्रियांना उमेदवारी देऊन निवडणूकीच्या रणांगणात आणण्यास नाखूष आहेत स्त्रिया हया जबाबदाऱ्या / भार, बिनअनुभवी आणि काही स्त्रोत नसणाऱ्या म्हणून विचारांत घेतल्या जातात, शर्वसाधारणतः त्यांना निवडणूक राजकारणांत विचारांत घेतले जात नाही जर त्यांना कोणत्या तरी धर्मपिता (*God Father)* किंवा पक्षाची महत्वाची व्यक्ति हयांचा पाठिंबा असतो आणि त्यांना राजकीय कुटुंबाचा उदार आश्रय असेल तरच त्यांचा विचार केला जाऊ शकतो बरेच वेळा त्यांना असे खडतर मतदार संघ दिले जातात जेथून जिकंण्याच्या संधी फार कमी असतात किंवा त्यांना निवडणूकीच्या जुळवाजुळव करतांना जागा खाली करा म्हणून सांगण्यात येते. थोडक्यात स्त्रिया फक्त महत्वाच्या नेत्याचा अपवाद वगळता हया नको असलेले नातेवाईक वा संधी मिळण्याची वाट पाहात राखीव प्रवासी हयाप्रमाणे भासल्या गेल्या आहेत.

काही स्त्रिया मात्र जवळजवळ निश्वय करुन घरगुती व अन्य कामांचे शारीरिक अडथळे हयांवर मात करतात त्याचप्रमाणे मर्यादा घालणाऱ्या कुटुंबप्रमुखत्वाच्या कल्पना ज्या त्यांना राजकारणापासून दूर ढकलून देतात हयावर पण मात करतात. पण त्या सर्वजणी संदर्भासाठी सहज भेद करता येतील अशा असतात व लैंगिक स्वरुपाच्या चारित्र्य विश्वासघाताने केलेला खून हा खत्रीचे राजकीय प्रगती नष्ट करण्याचा एक कडवट / कटू मार्ग आहे. त्यांना घटनांच्या अफवा हया खोटया आहेत हे सिध्द करून दाखवावे लागते. गुप्त विवाह किंवा नातेसंबंध, मानखंडना किंवा बलात्कार हयांचे प्रसंग जे त्यांच्या इच्छेविरुध्द झालेले असू शकतात हया गोष्टी त्यांना सार्वजनिक वादग्रस्त विषय बनवू शकतात व त्यांना निवडणूकीच्या राजकारणातून अपात्र ठरवू शकतात तथापि, राजकीय पक्ष हे पत्नीला मारझोड करणारे त्यांना रणांगणात उतरविण्या इतके चोखंदळ नाहीत, उभे राहिलेले किंवा छळणारे त्यांचे उमेदवार असतात व अशा तहेचा कडक व नैतिकदृष्टया दुटप्पी मोजमापे ही स्त्रियांना आणखी एका मार्गाने अडथळा आणतात. पुरुषांपेक्षा निराळा असा

त्या स्त्रियांना आक्रमकरीत्या संघर्ष करताना खूप काळजी घ्यावी लागते ज्यायोगे राजकीय मोठेपणा मिळविता येईल, राकट ह्रदयाची कार्यशक्ति ही राजकीय बदला म्हणून मर्जी खप्पा होणारा काळा डाग आहे तर पुरुषांना न्यायालयीन अटक व अधिकाऱ्याबरोबर मारामारी हे "त्याग" आहेत जे त्यांचे राजकीय मोठेपणा वाढविण्यास कारणीभूत ठरतात.

आता स्त्रियांची क्रियाशीलता व लाकरशाही हे दृश्यरूप झालेले आहेत. असा प्रश्न विचारला जातो की, स्त्रियांना निषेध करणाऱ्या म्हणून जबाबदार धरले जाते व पुरुष हे सत्तेची स्थाने धारण करतात असे का? त्रिया आता नेतृत्व जागांसाठी निवडणूक लढविण्यास तयार आहेत. दांडेकर स्कूल फॉर पॉलिटिकल एकॉनॉमि (१९८२-८४) येथे आयोजित केल्या गेलेल्या चर्चासत्रांच्या शुक्खलामध्ये लोणावळा येथे ग्रामीण भागांतील हजेरी लावणाऱ्या स्त्रीया हया वरिष्ठगिरी (*Bossing)* आणि स्थानिक स्वयंसरकार हयामधील भ्रष्टाचार या विषयांवर बोलल्या. व त्यांनी विचारले की, त्या जागांसाठी त्या निवडणूक का लढवू शकणार नाहीस ? ४० महिला कार्यकर्त्या हया चार दिवस बसून निवडणूक राजकारणांसंबंधीच्या निरनिराळ्या विषयांवर चर्चा करीत होत्या उदा. पंचायतराज्य संस्थांत पध्दतीचे कामकाज, उमेदवारांची निवड करण्याच्या कसोटी, खियांच्या आघाडीची गरज, अंबरनाथ येथील प्रशिक्षण शिबिर इत्यादि महाराष्ट्रातील बऱ्याच खेडेगावांतील महिलांनी ग्रामपंचायतीच्या निवडणुकांमध्ये स्त्रियांची पॅनेल संघटित केली आहेत. सहकारी संघटनेने जुलै १९८९ मध्ये ग्रामस्वराज्य निवडणूकांसाठी सर्व खियांची पॅनेल उभी केली होती त्यापैकी ७ घटना हया यशस्वी झाल्या.

उलटपक्षी काहीजण असे विचारतात राखीव जागा हा स्त्रियांना मुख्य राजकीय प्रवाहापासून वेगळे करीत नाहीत काय? स्त्रियांनी असे उत्तर दिले की, वन्य जाती व वन्य जमाती आरक्षण हयामुळे त्यांना राजकाणाच्या मुख्य प्रवाहापासून अलग केलेले नाहीं. उलट राजकीय पध्दतीवर एक प्रकारचा दबाव निर्माण केला गेला आहे ज्याशिवाय दलित व त्यांचे विषय हे कदाचित सार्वजनिक वादविवाद क्षेत्राच्या बाहेर राहून गेले असते. बऱ्याच स्त्रिया हया आरक्षण हे सामान्य राजकारणांत एकत्र येण्यासाठी मैलाया दगड म्हणून विचार करतात.

सरोज काशिकर, जनता दल आमदार म्हणाल्या "आरक्षण हे फक्त लक्ष्मणरेषेसारखे असू नये जेथे स्त्रियांना सर्वसाधारण मत निर्वाचन क्षेत्रांपासून दूर ठेवले जाईल." आता पक्ष काय करु शकणार आहे तर स्त्री उमेदवाराला राखीव वार्डमध्ये उभे करण्यांत येईल जेव्हा तो मतदारसंघ हा अ-आरक्षित वॉर्ड असेल, जेव्हा तो वॉर्ड अ-आरक्षित असेल तेव्हा उभी राहणारी महिला नगरसेविका हिला बहुतेक करुन दुसऱ्या राखीव मतदारसंघांत स्थलांतरीत केले जाईल. हयाचा अर्थ असा आहे की, तिला एकच मतदारसंघ असणार नाही वा त्या विभागात अखंडत्व असणार नाही. त्यांना सर्वसामान्य निर्वाचन क्षेत्रांमधून निवडणूक लढविण्याबददल रोखले जाणार नाही. रक्षण करण्यासाठी स्त्रिया हया राजकारणांत येण्याचे टाळतात.

### राखीव जागा / आरक्षणाची गरज (*Need for Reservation) :*

१) स्त्रियांना राजकारणांत प्रवेश करण्याची संधी दिली गेली पाहिजे व राजकीय जागा जिंकण्याची संधी दिली पाहिजे. हया मार्गाने त्या राजकारणाचे चांगले मुद्दे समजून घेऊ शकतील व त्यांची क्षमता दाखवू शकतील म्हणून महिलांसाठी आरक्षण हे आवश्यक आहे.

२) नेतृत्वाच्या स्थानासाठी महिला हया तयार असतात. म्हणून त्यांना निवडणूक लढविण्याची व जिंकून येण्यासाठी पुरेशी संधी दिली गेली पाहिजे.

३) असे दिसून आले की, राजकारणी महिला हयांनी निर्णय घेण्याच्या प्रक्रियेच्या क्षमता / पात्रता शिकून घेतल्या आहेत तसेच त्यांना चटकन रीतीने धोरण ठरविण्याचे शिक्षण मिळाले आहे.

४) असे निरीक्षणास आले आहे की, मुत्सद्दी राजकारणी महिलांनी बळकट राजकीय प्रभाव तयार केला आहे. सामान्य बहुजन महिला पुरुष राजकारणी व्यक्तिपेक्षा स्त्री राजकारणी मुत्सद्दींकडे जाणे जास्त पसंत करतात.

५) खालच्या पातळीवरील आरक्षण हे स्त्रियांना राजकारण क्षेत्रामध्ये प्रवेश करण्यास निश्चितच साहाय्यकारक ठरेल व त्यांना स्वतःला सिध्द करुन दाखविता येईल. त्यामुळे त्यांना राज्यपातळी व राष्ट्रीय पातळी निवडणूकांशी झटापट करण्यास सोपे जाईल.

६) महिला आमदारांच्या कमी होणाऱ्या संख्येच्या कलाला थोपवून धरण्यासाठी राखीव जागा / आरक्षण हे आवश्यक आहे. तसेच स्त्रियांना राजकीय क्षेत्रात सहभागी होण्यासाठी आत्मविश्वास मिळविण्यासाठी मदत करण्यास गरजेचे आहे.

७) आरक्षण वा राखीव जागा हया प्रणालीतून निवडून आलेल्या महिलांना मोठया जबाबदारीच्या भावनेची जाणीव तसेच त्यांचे काम व मतदार हयांच्याकडे लक्ष देणे हयाचीही जाण असेल.

८) राजकारणांत स्त्रियांना आरक्षण हयांचा घनिष्ठ संबंध हा समता व लोकशाही हया संकल्पनांशी आहे.

**वारंवार येणारा विषय (*The Recurring Issue):***

आरक्षणाचा / राखीव जागांचा प्रश्न हा जुनाच विषय आहे जो राष्ट्रीयत्व चळवळीच्या वेळेपासून आहे. त्याचा काही समान आरडाओरड करणाऱ्यांनी जोरदार प्रचार केला आहे तर काहींनी त्याला नकार दिला आहे.

मालमत्ता असलेल्या पुरुषाला जेव्हा मताचा हक्क दिला गेला तेव्हा स्यिांना पण हा हक्क दिला गेला पाहिजे का आणि तिच कसोटी त्यांच्यासाठी वापरली गेली पाहिजे का असा प्रश्न विचारला गेला होता. महिला नेत्यांचा एक गट हा सायमन कमिशन समोर प्रतिनिधीत्व करण्यासाठी गेला असा विचार करणे हे वेडेपणाचे होते. त्यांनी असे प्रतिपादन केले की, स्त्रियांची पण स्वतःची मालमत्ता आहे, त्या आयकर व घरभाडे देतात त्या प्रतिनिधी मंडळाने अशा शिफारशी केलया की, सर्व पुरुष खरे मालक होते व सर्व सुशिक्षित महिलांना मत देण्याचा अधिकार दिला गेलाच पाहिजे व स्त्रियांच्या प्रत्यक्षात निवडणूक प्रक्रियेत सहभागाची खात्री करुन घेण्यासाठी जागांचे आरक्षण झालेच पाहिजे हा संवाद दुसऱ्या गोलमेज परिषदेपर्यंत चालूच राहिला जेव्हा दोन नामांकन केलेल्या सभासदांमध्ये विरोधी मुद्यांचा दृष्टिकोन उभा राहिला जेथे बेगम शहा नवाझ हा तयार झाला नाही तर सौ. सुब्बारायन हयांनी ठासून सांगितले की, जागांच्या आरक्षणाखेरीज भारतीय स्त्रियांनी निवडणुका लढविणे जड जाईल.

तथापि, राष्ट्रीयत्व चळवळीचे वातावरण महात्मा गांधीना पाठिंबा देण्याचा निर्णय व जातीय निवडणुकीच्या बक्षीसांच्या विरोधात त्यांचे उपोषण समाप्त करण्यासाठी दबाव आणणे हया गोष्टींचा हया स्त्रियांना मतदान करण्याचा हक्क देण्याच्या प्रश्नावर मोठया प्रमाणात परिणाम झाला. त्यानंतर जातीय प्रभागांचे व गांधीशी एकनिष्ठ राहणे त्यांनी अशी इच्छा व्यक्त झाली की, सर्व महिला संघटना म्हणजेच भारतीय महिलांच्या संस्थेने स्त्रियांना मतदानाच्या हक्काचे स्वातंत्र्य हयाची संमिश्र निवडणुकासह स्त्रियांसाठी राखीव जागा नाही. नामांकन पध्दतीने नेमणुक नाही वा सहकार्य नाही हयांची मागणी केली.

१९८८ मध्ये जरी वृत्तपत्र बातमी लेखक वा स्त्रियांचे समूह हयांच्याकडून काहीही मागणी नव्हती तरी राष्ट्रीय प्रमाणबध्द योजना जिची निर्मिती राजीव गांधी चळवळीने केली होती, तिने ३० टक्के जागा हया स्थानिक स्वसरकार पंचायत समिती व जिल्हा परिषद हयामध्ये आरक्षित असल्या पाहिजेत अशी शिफारस केली गेली जरी स्त्रियांचे गट हे त्यांचे फायदे व तोटे हयावर वादविवाद करीत होते त्या शिफारशीचा अवलंब जनता दल सरकारने कर्नाटक राज्यात केला व महाराष्ट्राच्या काँग्रेस सरकारने पुढील होणाऱ्या म्युनिसीपल निवडणुकांपर्यंत आणण्याचा विचार पण केला नाही.

**फक्त राजकीय जाहिरात बाजीची युक्ति (*Just a Political Gimmick):***

फक्त विरोधी पक्षांनीच नव्हे तर बऱ्याच महिला गटांनी ज्यांनी खियांकरिता राखीव जागांची सुरुवात करुन देण्यास विरोध केला होता. विरोधी पक्षांनी प्रथम त्याकडे फक्त राजकीय हालचालींच्या मैदानात प्रामुख्याने आकषून

घेतले कारण काँग्रेस पक्षाप्रमाणे त्यांच्याकडे निवडणुकीच्या रणांगणात लढविण्यासाठी पुष्कळ स्त्रिया सभासद नाहीत त्यांनी त्यांच्या प्रत्यक्ष कामकाजावर ठराविक संशय व्यक्त केले आहेत अशी फिरती पध्दत (*Rotation System)* जिच्यांत अशी बनवाबनवी केली जाते की, जे प्रभाग विरोधी पक्षांच्या प्रभावाखाली आहेत तेथे राखीव म्हणून स्त्रियांना ठेवून गैरफायदा निर्माण केला जाईल. दुसरी गोष्ट म्हणजे राखीव प्रभागातील पुरुष नगरसेवकांची त्यांच्या मतदारसंघाबदद्लची आस्था / कळकळ ही नाहिशी होईल.

तिसरी गोष्ट म्हणजे टक्केवारी आरक्षण हे पक्षांना स्त्रियांची भरती किंवा तो विशिष्ट मतदार संघ प्रभाग हातातून घालविणे हयांसाठी जबरदस्ती करेल. प्रश्न असा आहे की, पक्षांनी कोणत्या प्रकारच्या महिलांची भरती करावी? वर्तमानपत्राच्या लेखांनी असा वृत्तांत दिला आहे की, स्त्रियांच्या राखीव जागांची सुरुवात त्यावर विरोधी नेत्यांचा तिटकारा व्यक्त झाला असून त्यांनी आपल्या बायका व नातेवाईक हयांना निवडणुकीच्या रिंगणात उतरविण्यासाठी परवानगी मागण्याचा अर्ज केला आहे.

**काही उभे राहाणारे प्रश्न (*Raising Some Questions):***

निश्चितपणेच ही केली गेलेली निव्वळ राजकीय जाहिरातबाजी आहे व स्वतः त्यांनी त्यांच्या प्रदीर्घ राजकीय कारकिर्दीमध्ये महिलांच्या बाबतीत कधीहि चिंता व्यक्त केलेली नाही. परंतु अशा वेळी ३० टक्के आरक्षणाचा वापर हा एकाचवेळेला महाराष्ट्राच्या खऱ्या वेडयाच्या वा कावऱ्याबावऱ्या (*Frenzied)* परिस्थितीच्या राजकारणाच्या वेळी दर्शविणारी आरक्षणाला मान्यता आणि महिला संघटना हयांनी त्या विषयावर चर्चा करण्याची गरज आहे व एकमेकांशी आमचे विचार व अनुभव हयाचे एकमेकांशी वाटा उचलणे गरजेचे आहे. कल्पनाशक्तीचा मूळ पाया कोणता ज्याठिकाणाहून आम्ही आमची चर्चा थांबवू शकतो व स्त्रियांच्या चळवळीसाठी एक डावपेच / व्यूहरचना म्हणून आकलन करु शकतो ?

आरक्षण हे प्रत्यक्षात कार्यान्वित होण्यासाठी आपण काय करु शकतो? गहिलांची चळवळ ही स्वतःच सामाजिक मनोवृत्तीच्या महिला हयांच्याशीच जास्त बांधली गेली आहे व ज्यांचा स्त्रियांच्या पध्दतशीरपणे चाललेल्या जुलुमांवर विश्वास नाही अशा उजव्या गटाच्या संबंधित महिलांचा त्या चळवळीशी काहीही संबंध नाही. तसेच पुरुष व स्त्रिया हयांमधील नवीन बदलांवर आधारित व सर्व मानव समान आहेत (*Egalitaria)* असा नातेसंबंध हा दृष्टीकोन त्यांच्यापाशी नाही वर्ग आणि जाती हयामध्ये एक आशा, न्याय व समानता हयांचा एक समान

**कायदे - सामाजिक बदलाचे एक साधन म्हणून (*Laws As An Instrument of Social Change)***

ब्रिटिशांच्या काळांत सामाजिक व धार्मिक गोष्टी हयामधील सर्वसाधारण मध्यस्ती न करणारे धोरण अनेक भाग असणाऱ्या पध्दती कायम स्वरूपी झाल्या (*Perpetuated)* वा सामान्य सामाजिक-आर्थिक जुळवणीला प्रतिबंध हयामुळे निरनिराळ्या धार्मिक जमाती व त्या जमातीच्या मधील पोटविभाग हयांच्यामधील भेदभाव / दुरावे हे साठून राहण्यास व जास्त प्रखर होण्यास मदत झाली. १९ व्या शतकातील सामाजिक सुधारणांनी काही काठावरील जुळवणी करण्याचा प्रयत्न केला जी मानवी विचारांच्या सामाजिक मागणीतून आली होती. सतीच्या चालीविरुध्द कायदा हा त्यामधील एक महत्वपूर्ण पराक्रम आहे तथापि अशा सामाजिक कायद्यांचा १८५७ नंतर प्रयत्न केला गेला नाही. राष्ट्रीय चळवळींची वाढती ताकद व महात्मा गांधींचे प्रयत्न, हयामुळे कायद्यांमध्ये महत्वपूर्ण बदल घडवून आणणे व स्त्रियांची कायदेशीर गौणत्व हयांचे उच्चाटन व त्यांच्या विरुध्द लग्न, घटस्फोट, वारसाहक्क किंवा मुलांचे पालकत्व ज्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व व आयुष्य हयावर परिणाम झाला होता, अशा भेदभावांची समाप्ति करण्यासाठी मोठया प्रमाणांत मागणी होऊ लागली हिंदू कायद्यामधील सुधारणा सुरवात ही स्वातंत्र्यकाळापूर्वीच झाली होती जरी त्याला पुराणात्वावादी प्रतिकार झाला होता तरी १९५० मध्ये तुकडया तुकडया अशा खंडित पध्दतीने (*Piecemeal Fashion)* परिणाम दिला गेला.

विशिष्ट गुणविशेषाने सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी कायद्यांवर जास्त प्रमाणांत अवलंबून राहणे, हे फक्त आपल्या देशातच नव्हे पण निरनिराळया पुष्कळ आधुनिक समाजात पण आहे. विशेषकरून ज्यांच्या उगम हा विदेशी राज्य अधिपत्यातून झाला आहे. सामाजिक बदलाच्या हेतूला बढती देण्यासाठी कायदा हा उपयोगी पडतो हयाबद्दल शकांच नाही पण हे नीट जाणून घेतले पाहिजे की, कायदा हा स्वतःहून समाजाला बदलू शकत नाही. कायद्याच्या तत्वाखाली असणाऱ्या मुख्य तत्वांना प्रयत्न करण्यांत न्यायसंस्था ही नेहमीच वा वारंवार अपयशी ठरली आहे. उदा. दोन बायकांच्या घटना (*Bigamy)* किंवा बायकोचा काम करण्याचा हक्क अशा घटनांचा समावेश त्यात आहे. वरिष्ठ अधिकारी हे कायद्याची अंमलबजावणी करण्यात अयशस्वी झाले आहेत किंवा बहुजन माध्यमातून त्यांचा प्रसार करुन जागरुकता निर्माण करण्यास त्यांना यश मिळालेले नाही. जर कायदा हा देशाचे सामाजिक मूल्य प्रतिबींबीत करतो तर स्त्रियांची बंधनमुक्ति (*Womens Emancipation)* ही त्यांच्या सामान्य सांस्कृतिक प्रगतीचा मापदंड आहे.

## विवाह (*Marriage)*

विवाहासंबंधात जे महत्वाचे विषय आहेत ज्यावर काळजीपूर्वक लक्ष दिले गेले पाहिजे व बहुपत्नीकत्व (*Polygamy),* हिंदू विवाह कायद्याच्या अन्वये दोन बायका असणाऱ्यांच्या विरुध्द परिणामकारक अंमलबजावणीच्या तरतूदी, लग्नाचे वय, विवाहाचे सक्तिचे नोंदणीकरण व हुंडा इत्यादि.

## १) बहुपत्नीकत्व (*Polygamy)*

संपूर्ण लिंगविषयक समानता ही कायदेशीर पध्दतीमध्ये अगदी क्वचितच शक्य आहे ज्यामुळे बहुपत्नीकत्व हयाला संमती मिळते व जी सामाजिक पध्दत सहन केली जाते. सुदैवाने बहुपत्नीकत्व ही संस्था जी भारतात अधिकपणे बोकाळली होती ही गेल्या काही दशकांत कमी होत गेली आहे. ख्रिश्चन, हिंदू, पारशी आणि ज्यू हयांच्यामधील कायद्यांत एक पत्नी व्रताचा (*Monogamy)* स्वीकार केला गेला आहे. त्यामुळे भारताच्या ८८ टक्के लोकसंख्या ही हया तत्वाने कायदेशीरपणे नियंत्रित केली गेली आहे. फक्त मुस्लिम कायद्यावर हया एकपत्नीत्व कलाकडे बदल न होऊन तो तसाच परिणाम न होता राहिलेला आहे.

१) बहुपत्नीकत्वावर मुस्लिम कायदा (*Muslim Law on Polygamy)*

आम्ही मुस्लिम स्त्रियांच्या मुलाखती घेतल्या तेव्हा ३ प्रकारचे दृष्टीकोन हे व्यक्त करण्यांत आले.

अ) उत्तर प्रदेशातील सुशिक्षीत मध्यमवर्गीय स्त्रियांचा कोणत्याहि तहेच्या बदलाला विरोध होता.

ब) काही राज्यांतील संभावित व योग्य स्त्रियांनी एकपत्नीत्व स्वरुपाच्या विवाहाची इच्छा प्रगट केली व बहुपत्नीकत्वाच्या असमानता हयांना प्रगटपणे विरोध केला आणि

क) काश्मिरमधील स्त्रियांची बहुपत्नीकत्वावर संपूर्ण बंदी घालण्यासाठी एकसंघ व जोरदार मागणी होती.

मुस्लिम कायदा विवाह हा एक प्रकारचा करार मानतो. काही कायदेपंडितांनी (*Jurists)* प्रमाणबध्द कंत्राटाचा / कराराचा स्वीकार करण्याचे समर्थन केले आहे. जर नवऱ्याने / पतीने दुसरी पत्नी केली तर त्या कराराच्या अंतर्गत पत्नीला तिच्या नवऱ्याला घटस्फोट देण्याचा अधिकार असेल. जरी बहुपत्नीकत्वाला प्रतिबंध करण्यासाठी हा उपाय प्रतिपादन केला गेला आहे तरी तो अर्थातच स्वतंत्रपणे कोणत्याही स्वरूपाची मदत देऊ शकत नाही. (१) प्रथम पत्नीला मुलाबाळासकट पण त्याचा तिच्या नवऱ्याच्या प्रतिष्ठेवर कोणताच परिणाम होत नाही कारण दुसरा विवाह कायद्याबरहुकूम असणारा (*Valid)* राहतो आणि त्यामुळे दोन बायका असणे हे कायद्याने चुकीचे ठरत नाही. तसेच अन्य कायद्यांनुसार दोन पत्नींची बदी टाळण्यासाठी मुस्लिम धर्मात धर्मांतर करण्यास प्रतिबंध करण्यापासून परिणामशून्य आहे (*Ineffective)*

जरी मुस्लिम कायद्यांत सुधारणा करण्याची इच्छा ही साधारणपणे मान्य असली आणि बहुपत्नीकत्व हयावर बहुतांशी मुस्लिम देशांत मनाई केली गेली आहे तरीहि भारत सरकारने हया दिशेने कोणतीच पावले उचलली नाहीत हयाचे कारण असे की, मुस्लिम जमातीमधील सामाजिक मत हया बदलासाठी अनुकूल नाही. त्यांच्या आस्थांकडे दुर्लक्ष करून मुस्लिम स्त्रियांना समता व सामाजिक न्याय हयापासून नकार दिला गेला आहे आणि म्हणूनच भारतातील सर्व जमातीसाठी एकपत्नी व्रत हे उदाहरण म्हणून मानून हयामधील मूळ धोरणाशी कोणतीही तडजोड ही होता कामा नये.

### हिंदू विवाह कायद्यान्वये एकाच वेळी दोन बायका असणाऱ्यांविरुध्द कायदेशीर तरतुदीची अंमलबजावणी (*Enforcement of Provision Against Bigamy Under the Hindu Marriage Act*)

जरी दोन बायका करणे हा हिंदुसाठी गुन्हा म्हणून ठरविला गेला आहे व कायद्याने २ ऱ्या विवाहास कायदेशीर बंधन नाही तरी अशा तऱ्हेने विवाह हे अजुनही प्रचलित आहेत ज्याचा पुरावा हा १९६१ च्या शिरगणती अभ्यासांत दिला गेला आहे व अशा तहेच्या घटना हया मणिपूर, आंध्र प्रदेश, बिहार, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि मध्य प्रदेश या राज्यातून फिरत असतांना समितीच्या नजरेसमोर आल्या आहेत. अशिक्षित व आर्थिक दृष्टया अवलंबून असणाऱ्या महिलांना न्यायालयात जाणे कठिण असते व त्यांच्या कुटुंबियांकडून त्यांना खटला दाखल करण्यासाठी नेहमी पाठिंबा वा आधार हा मिळत नसतो. विवाह या शब्दाचे गांभीर्य हयाचे तांत्रिक स्पष्टीकरण वा अर्थ हा अडचणी निर्माण करतो. त्यामुळे त्या कायद्यामध्ये पुढील बदल हे त्याची अंमलबजावणी करण्यासाठी अत्यावश्यक असे आहेत.

अ) न्यायालयाच्या परवानगीने, दुसऱ्या पत्नी असणाऱ्यांविरुध्द खटला चालविण्याच्या हक्काची परवानगी ही मुलीच्या कुटुंबियांना सोडून दुसऱ्या लग्न करणाऱ्या व्यक्तिविरुध्द विस्तृत केली गेली पाहिजे त्यामुळे कायद्याचे मोठया प्रमाणांत उल्लंघन होणे हयावर निबंध राहिल.

ब) हिंदु विवाह कायदा, १९५५ च्या कलम ४ च्या अंतर्गत गांभीर्य हे शब्द बदलून त्याऐवजी विवाहाच्या स्वरुपातील शब्द हे गेले पाहिजेत. त्याचप्रमाणे पक्षांनी केलेल्या आवश्यक विवाहसमारंभाचे आवश्यक ते स्पष्टीकरण वाढविले पाहिजे त्यामुळे दुसऱ्या पत्नीविवाहाचा गुन्हा हा केला गेला नव्हता असा होऊ शकणार नाही जर अशा त-हेचा विवाह समारंभ हा पत्नी व नवरा हयामधील प्रत्यक्ष नातेसंबंधात वाढ करणार नसेल तर

क) हिंदू विवाह कायदा, १९५५ कलम ६ मध्ये अशी तरतूद ही ओळख करून दिली गेली पाहिजे की, त्या कायद्यामध्ये अशा द्वितीय विवाहाच्या विरुध्द न्यायालयीन हुकूम हे मंजूर करण्यास न्यायालयाला कोणी रोखू शकणार नाही.

### देखभाल (*Maintenance):*

### १) गुन्हेगारीसंबंधी कायदा (*Criminal Law) :-*

काही गुन्हेगारी पध्दती कायदा १९७४, हे स्त्रियांसाठी जुनी प्रवृत्ती हयावर प्रकाश टाकतात आणि घटस्फोटित महिला व दारिद्र्याने गांजलेले पालक हयांना देखभाल खर्चाची मागणी करण्याचा हक्क पुरावितात. हयाची जबाबदारी ही फक्त पुरुषांवरच टाकण्यात आली आहे व ते बदलत्या सामाजिक परिस्थितीमध्ये अयोग्य आहे कारण बऱ्याच स्त्रिया हया आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र आहेत. पती व पत्नी व मुलगा आणि मुलगी हयांच्यामध्ये समानता दर्जा हा संपादन करण्यासाठी आम्ही कायद्याला अशी दुरुस्ती सुचविण्याची शिफारस करतो की, आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र असलेल्या स्त्रियांनी त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या पतीची देखभाल करणे, त्यांच्या मुलाबाळांचे संगोपन करण्यासाठी तसेच त्यांचे भाऊ व गरीब आईवडील हयांची देखभाल करणे इत्यादि. तसेच आम्ही रु. ५०० दरमहा ही मर्यादा उठविण्याची पण शिफारस करतो जी स्त्रियांना दिली गेली आहे व त्यांना व्यक्तिगत कायदा वा चालिरीती प्रमाणे मिळणारी रक्कम हयामध्ये मुस्लिम महिलांचा ज्या घटस्फोटित आहे त्यांचा समावेश नाही. हा अन्यायकारक अपवाद हा नाहिसा झालाच पाहिजे.

### २) हिंदू कायदा (*Hindu Law*)

हा गुन्हेगारी कायद्यापेक्षा वेगळा कायदा आहे. हयामध्ये पत्नीचा देखभाल खर्चाचा दावा हा पतीच्या पुरेशा उत्पन्नाच्या मार्गावर अवलंबून असतो. हिंदु कायदा हयानुसार हा हक्क/अधिकार अमर्याद आहे पण त्याचा गाभा हा नाहिसा होतो जर पत्नीने शासन करण्याच्या विचाराने देखभाल रक्कमेचे मूल्यांकन केले तर न्यायालय हे पक्षकारांची आर्थिक स्थिती व प्रतिष्ठा हया गोष्टी विचारांत घेते. वाजवी गरजा हे दावा करणारा व नवरा हयांची कायदेशीर जबाबदारी आहे. त्याचप्रमाणे पत्नीच्या स्वतंत्र राहण्याला समर्थन मिळते. हा कायदा पण देखभालाची जबाबदारी ही फक्त पुरुषांसाठीच मर्यादित ठेवीत नाही.

### ३) मुस्लिम कायदा (*Muslim Law*)

हया मुस्लिम कायद्याचे नवऱ्याची जरी देखभाल करण्याची प्रचंड जबाबदारी दाखविणारे वेगळेपण असले तरी स्त्री ही पुरुषाला सहज भेटता आली पाहिजे आणि त्याच्या रास्त आज्ञा तिने पालन केल्या पाहिजेत. घटस्फोटित मुस्लिम स्त्रीला ३ महिन्याच्या पलिकडे देखभालीचा हक्क नाही. अशा तहेच्या फरक करण्यास काही स्पष्टीकरण / समर्थन नाही. म्हणून मुस्लिम घटस्फोटीत महिलांसाठी देखभालीचा हक्क हा वाढविला गेला पाहिजे अशी शिफारस केली गेली आहे.

### ४) पारशी आणि ख्रिश्चन (*Parsees and Christians*)

पारशी व ख्रिश्चन हयामध्ये देखभालीच्या हक्क कायद्यात खूप सारखेपणा आहे व दोन्ही धर्म हे हक्क हा फक्त महिलांनाच मान्य करतात. देखभालीच्या रक्कमेचे परिमाण (*Quantum*) निश्चित ठरवितांना न्यायालय हे नवऱ्याची पात्रता, पत्नीची स्वतःची मालमत्ता आणि पक्षकारांची वर्तणूक हया गोष्टी विचारांत घेते. भारतीय घटस्फोट कायदा १९८९, जो ख्रिश्चनांची व्यवस्था पाहातो हा न्यायालयाला असे मुखत्यारपत्र देतो की, पत्नीच्या मालमत्तेची नवरा किंवा मुलाबाळांसाठी चुकती करण्याचा हुकूम देतो जर बायकोच्या व्याभिचारामुळे घटस्फोट हा नवऱ्याला मिळाला असेल तर जर न्यायालयाने नवऱ्याला त्याने व्यभिचार केल्याबददल नुकसान भरपाईचा हुकूम दिला असेल तर न्यायालय हे नवऱ्याची संपूर्ण वा अंशतः मालमत्ता रक्कम ही मुलांच्या भल्यासाठीं व पत्नीच्या देखभाल खर्चासाठी देण्याचा आदेश देते.

देखभाल खर्च मिळविणे व तो अदा केला जाईल याची खात्री करुन घेणे हयामधील अडचणी कमी करण्यासाठी आम्ही अशी शिफारस करतो की, सर्व देखभालखर्च रक्कम ही मालकाच्या स्त्रोतातून कापली गेली पाहिजे. जसे आयकर भरतांना केले जाते. ज्याठिकाणी ही गोष्ट शक्य नाही त्याठिकाणी देखभालीची थकबाकी ही जमिनीची महसूल म्हणून वसूल केली गेली पाहिजे किंवा गुन्हेगारी पध्दती कायद्यामधील तरतूदीनुसार दंड हया स्वरुपात वसूल केली गेली पाहिजे. सर्वात उत्तम उपाय म्हणजे हा देखभालीचा संपूर्ण प्रश्न विशेष न्यायालयाने उदा. कौटुंबिक न्यायालये हयांच्यावर सोपविणे जी पती किंवा पत्नी हया दोघांच्या उत्पन्न व आर्थिक अवलंबून राहण्याचे प्रमाण हया गोष्टी अशा त-हेच्या महत्वपूर्ण प्रसंगात समेट करताना विचारात घेतात.

### ५. वारसा हक्क (*Inheritance*) वा वारसदार

भारतीय वारसा हक्क १९२५, जो ख्रिश्चन, पारशी व ज्यू तसेच ज्यांचा विवाह हा विशेष विवाह कायदा हया अन्वये झाला आहे त्यांच्यावर ताबा ठेवतो व त्यांच्यावर एखाद्या व्यक्तिला त्याच्या मालमत्तेचे इच्छापत्र करणे, हयावर मर्यादा बहाल करीत नाही. तसेच मुस्लिम विधवा स्त्रियांना मालमत्तेमध्ये सहभागीदार होणे हया मिळालेल्या संरक्षणाचा उपभोग घेणे आणि हिंदू विधवेला देखभालखर्च मिळतो जो अन्य विधवांना हया कायद्यानुसार नाकारला गेला आहे. मृत्यूपत्रावरील हक्क जो मुस्लिम कायद्याप्रमाणे सध्या अस्तित्वात आहे यावर काही मर्यादा घालून विधवेला ती संपूर्णपणे दरिद्री वा कंगाल होईल हयावर प्रतिबंध घातला गेला पाहिजे. दुरुस्त वा सुधारित कायदा अशी तरतूद करतो की, आंतरराज्य वारसदारांच्या बाबतीत विधवा स्त्री जिला परंपरागत वारसदार नाही, ती सर्व मालमत्तेला पात्र असेल जर

मालमत्तेची किंमत ही ५००० रुपयांच्या वर जाणार नाही जेथे ही रक्कम जास्त आहे अशा घटनांत ही तरतूद भारतीय ख्रिश्चन आणि हिंदू, बौध्द व जैन हयांना लागू होणार नाही. कोणाच्या मालमत्तेचा वारसदार हे हक्क मुलेबाळे, विधवा हया गटांना नकार हयाचे स्पष्टीकरण दिले जाऊ शकत नाही.

## हिदू कायदा (*Hindu Law*)

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतामध्ये हिंदूमध्ये पुष्कळ वारसघटक परंपरा पध्दती होत्या ज्या बहुतेक परंपरेत स्त्रिया हया अवलंबून असणाऱ्यांपैकी एक होत्या व त्यांना निव्वळ मालकी हक्क होते. ज्याजागी त्यांनी काही अधिकारांचा उपभोग घेतला त्यामध्ये फक्त जीवनाबदद्लची आस्था होती पण संपूर्ण मालकी मात्र नव्हती. हिंदू वारसा हक्क १९५६ हयाने काही आमूलाग्र बदल केले. त्यापैकी अत्यंत महत्वपूर्ण हा एकाच वर्गातील पुरुष व स्त्री वारसदार हयांमधील समान वारस हक्क हा होता. त्याने मिताक्षरा व देवभागा शाळांखाली हयांच्याखाली प्रचलित असलेल्या निरनिराळ्या प्रणाली नष्ट केल्या आणि मरुम्मा कोटीआयाम यांचा ताबा असलेल्या दक्षिण भारतातील व्यक्तींना सुधारीत कायदे वाढवून दिले गट १ च्या माणसाचे वारस जे मालमता ही समप्रमाणात घेता वा संपूर्णपणे वा अमर्याद मालक हया विधवा किंवा त्यांचा पुत्र, मुलगी, आधी मृत झालेल्या मुलाच्या मुलींच्या मुली हया होत्या.

दुदैवाने परंपरागत प्रतिकारामुळे मूळच्या हेतूंमध्ये काही तडजोड/समेट करावा लागला उदा. एक प्रमुख घटक हा मुलगे व मुली हयांच्यामधील असमानता पुढें चालू ठेवण्यास जबाबदार होता तो म्हणजे मिस्ताक्षरी कोपार्सीनरी, जिचे सभासदत्व हे फक्त पुरूषांपुरतेच मर्यादित आहे. हिंदू स्त्रियांचा हक्क मालमत्ता कायदा व हिंदू वारसदार कायदा हयासारखे कायदे व मोठया प्रमाणात घेतले गेलेले निर्णय हयांनी पुरुषाचा जन्म देण्याचा हक्क (*Coparency*) हया सारख्या संकल्पनाचे भाग केले गेले. दी हिंदू कोड बिल १९४८ जिची निवड समितीने दुरुस्ती केली हयामुळे प्रत्यक्षात कोपॅरंसीचे शेवट करणे हे सुचविले गेले. म्हणजेच पुरुषाचा जन्म देण्याचा हक्क (*Coparency*) परंतु पारंपारिक प्रतिकार हा प्रचंड ताकदीचा होता. तडजोड जी कायद्याने संमत नव्हती अशी खात्री देते की कोपॅरंसीचे पुरुष सभासद हयांचे वारसदारांना त्यांच्या मालमत्तेचा वाटा / हिस्सा हा मिळतो जो राष्ट्रीय विभाजनामुळे मर्यादित झालेला आहे. त्याच्या परिणामस्वरुपी, मुलांना त्यांच्या वडिलांच्या मालमत्तेमध्ये हिस्सा हा त्यांची आस्था असलेल्या कोपॅरंशीशिवाय अधिक मिळतो. दयाभागा पध्दतीमध्ये मुलींना भावाच्या बरोबरीने समप्रमाणात मालमत्ता हिस्सा मिळतो कारण मुलांना जन्माने हा हक्क नाही. सहपालकाचा कोपॅरंसीमध्ये त्याचा हिस्सा त्याग करण्याचा अधिकार व स्वतः मिळावलेली मालमत्ता हिचे संयुक्त कुटुंब मालमत्तेमध्ये रुपांतर करणे हयाचा वापर वारंवार महिला वारसाचा हिस्सा कमी करण्यासाठी केला गेला आहे. म्हणून आम्ही असा सल्ला देतो की, पुरुषाच्या जन्माने हक्क हा रदद् करणे आणि मिताक्षरा कोपॅरंसीचे फक्त दयाभागामध्ये रुपांतर करणे,

हिंदू वारसा हक्क कायदा, १९५६ चा विभाग २३ ज्याचा संबंध हा राहात्या घराचा (*Dwelling House*) वारसा हक्क पण अविवाहित, विधवा व विवाहित स्त्रिया यांच्यामधील त्याचप्रकारच्या भेदभावाचा परिणाम घेण्यात झाला होता. जरी कुटुंबाला मुख्य आधार देणे हा व्यक्तिच्या विरोधात विभाजन मर्यादित करतो तरी आम्ही विवाहित व अन्य मुली हयामधील फरक हया बदद्ल खुष नाही. जरी राहात्या घराचा हक्क हा फक्त अविवाहित किंवा विधवा मुली यांच्या पुरताच मर्यादित आहे व त्यांच्या नक्यापासून विभक्त झालेल्या वा त्यांचा त्याग केला गेला आहे. म्हणून आम्ही असे स्पष्ट पणे सांगतो की हा भेदभाव दूर करा त्यामुळे सर्व मुलींना हा हक्क उपभोगता येईल.

दहा फेस्टेशनचा अमर्यादित अधिकार हा महिला वारसदारांना त्यांच्या वारसाहक्कापासन वंचित करतो. म्हणून आम्ही हया हक्काच्या मर्यादा हया हिंदू वारसदार कायदा १९५६ मध्ये करावी अशी शिफारस करतो. आमच्या पाहण्यांत पुष्कळ स्त्रिया आल्या आहेत ज्या त्यांच्या वंशपरंपरागत वारसा हक्काबदद्ल अज्ञानी / अनभिज्ञ होत्या व त्यांची स्थिती अशी होती की, त्यांनी बहिण ही भावाची मालमत्ता हिरावून घेते हया कल्पनेला विरोध केला होता. एकत्रित कायद्याचा प्रस्ताव व सामान्य कायदा हयाचा पराभव होईल जोपर्यंत त्यांच्या तरतूदींना पुरेशी प्रसिध्दी व स्त्रियांना शिक्षण मिळत नाही तोपर्यंत सामाजिक सुरक्षितला आणि पुरेशा नोकरीव्यवसायाच्या संधी हयांच्या गैरहजेरीत, मालमतेमध्ये वारसदार

हक्क हा आर्थिक सुरक्षितता पुरवितो व महिलांचे अंतिम ठिकाणी जाण्यास प्रतिबंध करतो. जरी असे म्हंटले जाते की, मालमत्ता अधिकार त्यामुळे फक्त मर्यादित क्षेत्रानाच फायदा मिळेल हयाबदद्ल संशय नाही व त्यामुळे स्त्रिया हया स्वतंत्र बनतील आणि त्यांची प्रतिष्ठा परिणामकारकपणे सुधारण्यास मदत करतील तसेच स्त्रिया हया कुटुंबाबरचा एक भार आहे हया भावनांना रोखून धरण्यास साहाय्य करतील.

**कौटुंबिक कायदे** (*Family Laws*)

कौटुंबिक नियमांचा संबंध हा विवाह घटस्फोट, वारसाहक्क, मालमत्ता अधिकार/हक्क इत्यादिशी आहे ज्यांचे कुटुंबातील माणसांना महत्व वाटते. त्यांना व्यक्तिगत नियम असे पण म्हटले जाते (किंवा व्यक्तिगत कायदे) कुटुंबाचे कायदे हे धार्मिक श्रध्दा व स्त्रियां हयांवर आधारलेले आहेत म्हणून हया कायद्याविषयी गैरसमज होण्याची शक्यता आहे. बऱ्याच असमानता हया त्या नियमात आढळून येतात ज्यांचा संबंध हा विवाह, घटस्फोट, देखभाल, मालमत्ता हक्क इत्यादि गोष्टींशी येतो. सर्व जमातींचे कौटुबिक कायदे हे भेदभाव करणारे आहेत. हयाचे कारण जवळजवळ सर्व धर्म हे असा विश्वास ठेवतात की, स्त्रिया हया पुरुषापेक्षा कनिष्ठ आहेत व म्हणून त्या समान नाहीत. कौटुंबिक कायदे हे फक्त कायदे आहेत जे आपल्या देशात सर्व लोकांना समान करण्यात आले आहेत.

वेदकालीन समाजात विवाह हा एक धार्मिक विधी म्हणून मानला गेला (*Sacrament)* आजच्या आधुनिक समाजात विवाह हा एक करार म्हणून गणला जातो. भारतीय विवाह कायदा १९५५ हयाने हिंदू विवाहाचे कायदे हयांत सुधारणा केल्या आहेत. पुढे काही महत्वाचे विषय दिलेले आहेत.

१) विवाहास धार्मिक विधी आणि करार हे दोन गुणविरोध आहेत. धार्मिक विधी गुणविशेष हा बऱ्याच धार्मिक समारंभात स्पष्ट दिसून येतो. उदा. सप्तपदी, कन्यादान इत्यादि. करार गुणविशेष हा दोन्ही पक्षांची संमति ही महत्वाची आहे हयामधून प्रगट होतो जरी सहवास हा अत्यंत महत्वाचा आहे.

२) दोन्ही पक्ष हे हिंदू धर्माचे असले पाहिजेत.

३) विवाह हा एकपत्नीव्रत असला पाहिजे (*Monogamous)* दोन बायका करणे हयाला

शिक्षा होते. (*Bigamy)*

४) हिंदू विवाह कायदा हा विवाहाचे नोंदणीकरण सक्तिचे करीत नाही तथापि विवाहाची नोंदणी हे विवाहाचा पुरावा आहे.

५) लग्नानंतर तिसऱ्या पक्षाशी शारिरीक संबंध

६) शारीरिक व मानसिक छळ

७) २ वर्षे किंवा जास्त काळासाठी अखंड परित्याग (*Desertion)*

८) दुसऱ्या धर्मात धर्मातर

९) संसर्गजन्य व बरे न होणाऱ्या कुष्ठरोगापासून त्रास

१०) विवाहीत जोडपे हे न्यायालयीन फारकतीनंतर एक वर्षभर एकत्र राहिलेले नाही.

११) वैवाहिक बलात्कार हया कारणामुळे पत्नी ही घटस्फोट मिळवू शकते.

१२) दुसरी पत्नी हे घटस्फोट मिळण्यासाठी एक महत्वाचे कारण आहे.

**देखभाल (*Maintenance)* किवा पोटगी :**

१) हिंदू कायद्यांत पोटगी ही संज्ञा विस्तृत दृष्टींनी वापरली गेली आहे. भारतीय दत्तक व पोटगी कायदा १९५६ हा देखभाल (पोटगी) हयाची व्याख्या अन्नपाणी, कपडे, निवास, शिक्षण आणि वैद्यकीय काळजी हयासाठी केलेली तरतूद अशी करतो. अविवाहीत कन्येच्या बाबतीत त्यामध्ये तिच्या लग्नाच्या रास्त वा वाजवी खर्चाचा समावेश असतो.

२) आपल्या पत्नीची देखभाल करणे ही नवऱ्याची प्रत्यक्ष जबाबदारी आहे. ही जबाबदारी लग्नापासून सुरु होते पण विवाहाचा शेवट झाल्यानंतर पण न संपणारी आहे. हमाचा अर्थ पत्नीला विवाह समाप्त झाल्यानंतरही देखभालीचा अधिकार प्राप्त झालेला असतो.

३) पत्नीचा पोटगी /देखभालीचा अधिकार हा तीन प्रकारच्या परिस्थितीत निर्माण होऊ शकतो.

अ) जेव्हा पत्नी ही नवऱ्याबरोबर राहते, एवढेच नव्हे तर अपवित्र पत्नी जी आपल्या पत्नीबरोबर राहते ती पण पोटगीचा दावा करू शकते.

ब) जेव्हा पत्नी तिच्या नवऱ्याच्या परवानगीने त्याच्यापासून। स्वतंत्र राहाते.

क) जेव्हा पत्नी ही तिच्या पतीपासून न्यायालयीन विभक्तीकरण वा घटस्फोट हमा कारणांनी विभक्त राहाते.

४) पोटगीचे अन्य घटक / मुलतत्वे आहेत ज्यांचा संबंध मुलीशी आहे. पुढील मुली हया पोटगीचा दावा करु शकतात.

अ) अविवाहीत कन्या, कायदेशीर वा अनौरस मुलगी, विधवा मुलगी इत्यादि. त्यांच्या कुमारीपणामुळे पोटगीचा हक्क हा मर्यादित असतो. ज्यावेळी मुलीचा विवाह होतो तेव्हा ती तिच्या वडीलांकडून पोटगीचा दावा करु शकत नाही.

ब) जर मुली हया हिंदू म्हणून थांबल्या तर तिला देखभाल खर्च मिळत नाही.

क) पुनर्विवाहनंतर विधवा मुलगी ही देखभालीचा दावा करु शकत नाही.

मालमत्ता (*Property):*

वारसदाराशी वा वारसा हक्कांशी संबंधित हिंदू महिलेची मालमत्ता ही तीन वर्गात विभागली गेली आहे.

१) वडील किंवा आई हयाच्याकडून वारसाहकाने मिळालेली मालमत्ता हयामध्ये तिच्या आई किंवा वडील हयांच्याकडून लग्नाच्या वेळी मिळालेल्या मालमत्तेच्या / संपत्तीचा समावेश नसतो. ती मालमत्ता तिथे स्त्रीधन असते.

२) तिचा नवरा किंवा सासरा हयांच्याकडून वारसाहक्काने मिळालेली मालमत्ता हिंदू वारसदार हक्क १९५६ च्या अंतर्गत, जेव्हा सून ही विधवा असेल तेव्हाच तिच्या सासऱ्याकडून वारसा हक्काने मालमत्ता मिळू शकते. जर तिचा नवरा जिवंत असेल तर तिला वारसदार हक्क नाही असा हयाचा अर्थ आहे.

३) वारसापरंपरा किंवा अन्य कोणत्याही मार्गाने मिळालेली मालमत्ता

४) इच्छापत्र न करता मरणारी व्यक्ति ही मृत्यूपत्र करणारी ठरते. हिंदू कुटुंबातील इच्छापत्र न केलेल्या मृत महिलेच्या संपत्तिचे वा मालमत्तेचे वाटप पुढीलप्रमाणे केले जाते.

अ) मुलगे व मुली, नवरा व मृत झालेल्या मुलगा किंवा मुलगी हयांची मुले

ब) नवऱ्याच्या नंतर त्यांचे वारसदार हयांच्यावर

क) वडिल आणि आई हयांच्यावर

ड) वडिलांच्या वारसदारांवर

इ) आईच्या वारसदारांवर

**पालकत्व (*Guardianship*) किंवा राखणदार :**

पालक किंवा राखणदार ही व्यक्ति अज्ञानी (वा वयात न आलेल्या) मुले किंवा त्यांची मालमत्ता किंवा ती व्यक्ति व तिची मालमत्ता हया दोन्हीची काळजी घेण्यासाठी जबाबदार असते. व्यक्ति ही शारीरिक, बौध्दिकदृष्टया असक्षम व परिपक्व नसेल तर ती अज्ञानी म्हणून समजली जाते त्यामुळे तिला कोणाचेतरी संरक्षणाची जरूरी असते. पालकत्व वा राखणदार वा काळजी घेणाऱ्याचे काही महत्वाचे दृष्टीकोन पुढीलप्रमाणे आहेत.

१) पिता हा मुलगे व मुली हया दोन्ही अज्ञानीचा नैसर्गिक पालक असतो.

२) जेथे पिता हा जिवंत आहे पण तो अकार्यक्षम पालक आहे तर आई ही नैसर्गिक पालक

म्हणून काम करु शकते.

३) आई ही कायदेशीर मुलांची नैसर्गिक पालक बनू शकते जर पिता हा मृत असेल वा पालक म्हणून काम करण्यास असक्षम असेल तर

४) जरी पिता हा जिवंत असला तरी माता ही बेकायदेशीर अज्ञानी मुलांची नैसर्गिक पालक होऊ शकते.

५) हिंदू माँगनारिटी (या अज्ञानत्व) व पालकत्व कायदा हा अज्ञान बालकाची ५ वर्ष वयाखालील ताबा हा आईच्या अखत्यारीत ठेवण्याचे सांगतो जोपर्यंत त्या अज्ञान व्यक्तिचे कल्याणासाठी दुसरी काही जरूरी असली तर

६) सावत्र-पालक (माता व पित्ता) हे पालकत्यासाठी पात्र नाहीत जोपर्यंत त्यांची नेमणूक ही न्यायालयातर्फे केली जात नाही तोपर्यंत

७) नैसर्गिक पालक हयाला अज्ञान व्यक्तीच्या मालमत्तेचे रक्षण करण्याचा अधिकार वा हक्क असतो.

८) मातेचा पुर्नविवाह हा काही आता अपात्रतेचे कारण होऊ शकत नाही व ज्या मातेने पुर्नविवाह केला आहे ती तिचा पालकत्वाचा वा रक्षकाचा हक्क हरवू शकत नाही.

**मुस्लिम कौटुंबिक कायदे (*Muslim Family Laws*): विवाह (*Marriage*)**

मुस्लिम विवाह (निकाह) हा विरुध्द लिगांच्या दोन व्यक्तिमध्ये केलेला करारनामा असून त्याच्याबरोबर शारीरिक संबंध व त्यामधून जन्माला आलेल्या मुलांची पैदास व त्यांचे कायदेशीरत्व हा पण कराराचा एक भाग आहे. विवाहाचे काही मुलभूत घटक पुढे दिले आहेत.

१) विवाह हा एक नागरी करार म्हणून गणला जातो.

२) तो पार पाडण्यासाठी काझी किंवा धर्मगुरु हयांची आवश्यकता असते.

३) प्रत्येक मुस्लिम ज्याने वयात येण्याची अवस्था प्राप्त केली आहे (*puberty*) व जो खंबीर मनाचा आहे तो हया विवाहाच्या करारात प्रवेश करु शकतो.

४) दोन साक्षीदारांची उपस्थिती जे प्रौढ व समजुतदार (*sane*) मुस्लिम आहेत ही विवाहाच्या कायदेशीरपणासाठी आवश्यक आहे.

५) मुस्लिम व्यक्तिखेरीज मुस्लिम स्त्री अन्य कोणाशीही विवाह करार करू शकत नाही.

६) मुस्लिम कायद्याच्या अंतर्गत, पुरुषाला एकाच वेळी जास्तीत जास्त ४ बायका करता येतात जर तो त्यांना समानतेने वागवित असेल तर. तथापि मुस्लिम स्त्री ही एकावेळी एकच नवरा करण्यास पात्र आहे विवाहाचे नोंदणीकरण हे सक्तिथे नाही.

७) मुस्लिम लोक हे मेहरची पध्दत अंमलात आणतात. मेहर म्हणजे एकत्रित संपत्ती किंवा अन्य मालमत्ता जी विवाहाच्या विचारातून नवऱ्याकडून बायकोला मिळण्यास ती लायक असते. ही रक्कम विवाहापूर्वी, विवाहाच्यावेळी किंवा लग्न समारंभानंतर ठरविली जाते.

घटस्फोट (*Divorce)*

मुस्लिम विवाह हा २ मार्गांनी घटस्फोट देऊन संपुष्टात येऊ शकतो.

अ) कोर्टाच्या मदतीशिवाय (*Recourse)*

ब) कोर्टाची मदत घेऊन

अ) हया प्रकारचे पुढील प्रकार आहेत.

१) जेव्हा घटस्फोट हा नवऱ्यापासून व त्याच्या इच्छेने काही कारण न देता पुढे जातो त्याला "तलाक " असे म्हणतात. हा एक तर पुढे घेता येतो वा मागे घेता येतो.

२) तलाक हा शब्दांनी बोलून वा लेखी दस्तऐवज देऊन ज्याला "तलाकनामा" असे म्हणतात, घेता येतो.

३) पत्नीला जेव्हा तलाक हा घोषित केला जातो त्यावेळी हजर राहण्याची आवश्यकता नसते. पण पत्नीला त्याबदद्लची माहिती ही असायलाच हवी.

४) पत्नी व पत्ती हयांच्या सामंजस्य परवानगीने घटस्फोटासाठी अधिकार काही ठराविक अटीवर देणे हे कायदेशीर आहे.

५) मुस्लिम नवऱ्याला त्याच्या पत्नीला घटस्फोटासाठी अधिकार काही ठराविक अटीवर देणे हे कायदेशीर आहे.

**ब) हया प्रकारचे विषय पुढील प्रमाणे आहेत.**

१) घटस्फोटांसंबधीच्या कायद्याला मुस्लिम विवाह समाप्ति कायदा १९३९ असे म्हंटले जाते (*Dissoution of Muslim marriage Act, 1939)*

२) कायद्याच्या अन्वये, लग्न झालेल्या पत्नीला तिच्या नवऱ्यापासून पुढील गोष्टीवर उदा. नवऱ्याचे नपुसंकत्व, नवऱ्याचा वेडेपणा, पतीकडून हेळसांड, शारीरिक व मानसिक हया दोन्ही बाबतीत नवऱ्याकडून निर्दयपणा घटस्फोट घेण्याचा अधिकार आहे.

३) घटस्फोटानंतर मेहर हा ताबडतोब परत द्यावा लागतो.

४) घटस्फोटीत जोडप्यांमधील शारीरिक नातेसंबंध हे बेकायदेशीर आहेत. ही गोष्ट घटस्फोटानंतर मागे घेता येत नाही. अशा शरीरसंबंधातून निर्माण झालेली मुले हयांना बेकायदेशीर म्हणून मानले जाते.

**पोटगी किंवा देखभाल (*Maintanance) :***

पुढील विचारांच्या बाजू हया महत्वाच्या आहेत.

१) कायदेशीर विवाहात जरी पत्नीचे स्वतःच्या खर्च चालविण्याचे मार्ग असले तरी पत्नीची देखभाल करणे हे नक्कीच कर्तव्य ठरते.

२) जर पत्नीने तिच्या नवऱ्याबरोबर असमर्थन करणाऱ्या विषयांवर सहजीवनास (*Cohabit)* नकार दिला तर पत्नीचा पोटगीचा हक्क हा रद्द होतो.

३) नव्याने छळ करून पत्नीला घर सोडवयास भाग पाडले असेल तर ह्या मुद्यांवर पत्नी तिच्या पोटगीचा हक्क मागू शकते.

४) घटस्फोटानंतर इदातच्या काळात मुस्लिम त्री ही तिच्या पतीकडून देखभाल खर्च मिळण्यास पात्र आहे पण इदातव्या समाप्तीनंतर तिला पोटगी मिळणार नाही.

५) मृत पतीच्या मालमत्तेतून विधवेला पोटगी मिळण्याचा अधिकार नाही.

६) मुस्लिम महिला (घटस्फोटानंतर संरक्षण हक्क) कायदा १९८६, हयाची स्थापना ही घटस्फोटीत, मुस्लिम त्रियांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी झाली आहे.

**मालमत्ता (*Property):***

पुढील मुद्दे हे महत्वाचे आहेत.

१) मालमत्तेचा महत्वपूर्ण भाग म्हणजे मेहर जो विवाहित मुस्लिम खी ही तिच्या नवऱ्याकडून लग्नापूर्वी, लग्नामध्ये व लग्नानंतर मिळण्यास पात्र असले त्याचे स्वरूप हे पैसा किंवा मालमत्ता असू शकते.

२) विधवा स्त्री ही तिला दिल्या गेलेल्या मेहरच्या अदलाबदल्यात तिच्या नवऱ्याच्या मालकीच्या मालमत्तेवर दावा करु शकते.

३) मेहर हा मुस्लिम स्त्रीला घटस्फोटाच्या वेळी ताबडतोब दिला जातो. त्यामध्ये संपत्ती व लिला तिचे व तिच्या नवऱ्याचे नातेवाईक हयांच्याकडून लग्नापूर्वी लग्नात व लग्नानंतर मिळालेल्या बक्षीस भेट वस्तूंचा समावेश असतो.

**पालकत्व वा राखणवार (*Gurardian ship)***

१) मुस्लिम कायद्यान्वये पिता हा नैसर्गिक पालक समजला जातो.

२) मुलाच्या ७ वर्षे वयापर्यंत मातेला त्याचा ताबा घेण्याचा अधिकार असतो व मुलीच्या बाबतीत ती प्रौढ होईपर्यंत हा हक्क असतो, स्त्रिचा हा अधिकार घटस्फोट व अलग होणे हयानंतर पण ठेवला जातो.

३) घटस्फोटानंतर देखील बापाला त्याच्या मुलाबाळांया देखभालीचा खर्च द्यावा लागतो व त्याचा दावा त्याची पत्नी करु शकते.

**ख्रिश्चन कुटुंबातील कायदे (*Christian Family Laws)* विवाह (*Marriage)***

भारतीय ख्रिश्चन विवाह कायदा १८७२ हा विवाहाच्या कायद्यांशी संबंधित आहे हे कायदे तुलनात्मक दृष्टया अप्रचलित (*Outdated)* आहेत खालील काही महत्वाचे विषय आहेत.

१) विवाह हा एक धार्मिक विधी म्हणून समजला जातो. (*Sacrament)*

२) ख्रिश्चन धर्मातील विवाह हा कायदेशीर म्हणून मानला जाण्यासाठी धर्माचा मंत्री व विवाह रजिस्ट्रार हयांनी उपस्थित हे राहिलेच पाहिजे.

३) विवाहाचे नोंदणीकरण हे सक्तिचे आहे.

४) दोन्ही पक्ष हे ख्रिश्चन असले पाहिजेत अशी कांही जबरदस्ती नाही फक्त एक पक्ष हा ख्रिश्चन असणे आवश्यक आहे.

५) एकपत्नीत्व हे काटेकोरपणे शिफारस केले गेले आहे.

६) मुलासाठी विवाहाचे वय हे कमीत कमी २१ वर्षे व मुलीसाठी १८ वर्षे आहे.

**घटस्फोट (*Divorce)***

भारतीय घटस्फोट कामदा १८६९ हा घटस्फोटांच्या कायद्याशी संबंध ठेवतो. खालील मुझे हे महत्वाचे आहेत.

१) विवाहानंतर पत्नीने केलेल्या व्यभिचाराबद्दलच्या विषयाच्या आधारावर नवरा हा घटस्फोटाचा दावा करु शकतो.

२) असे पुष्कळ प्रकारचे मुद्दे आहेत ज्यावर ख्रिश्चन विवाहित महिला ही तिच्या नवऱ्यापासून घटस्फोट मिळवून शकते.

अ) पत्तीने स्वतःच ख्रिश्चन धर्मातून दुसऱ्या धर्मात धर्मांतर केले आहे.

ब) तो मात्रागमन गुन्हयाचा दोषी आहे (*Incest)*

क) तो दोन बायका केल्याबद्दल अपराधी आहे.

ड) तो निर्दयपणाबद्दल गुन्हेगार आहे.

इ) तो वैवाहिक बलात्काराबद्दल दोषी आहे.

३) कोणताही ख्रिश्चन नवरा व नवरी ही विवेकभ्रष्टता व पौरुष्यहीन हया मुद्यांवर घटस्फोट मिळवू शकतात.

**पोटगी (*Maintanace)***

१) ख्रिश्चन महिला ही तिच्या नवऱ्याकडून गुन्हेगारी वा नागरी कायदेशीर इलाज करून पोटगीचा हक्क सांगू शकते.

२) घटस्फोटित स्त्री जी स्वतःला आधार देऊ शकत नाही ती पोटगी (*Alimony)* व देखभालखर्थ हयासाठी भारतीय घटस्फोट कायदा १८६८ च्या कलम ३७ च्या अंतर्गत अर्ज करु शकते.

३) पतीला आयुष्यभर तिला पोटगी द्यावी लागेल. ती एकतर वार्षिक तत्वावर वा दरमहा वा आठवडा तत्वांवर अदा केली जाऊ शकते.

४) ज्या ख्रिश्चन स्त्रीला स्वतःचे उत्पन्नाचे साधन आहे तरीपण तिच्या पतीकडून विवाह संपुष्टात आल्यानंतर देखभालीचा दावा करु शकते.

**मालमत्ता (*Property)***

घटस्फोटानंतर पत्नी ही मालमत्तेच्या हिस्सा यासाठी दावा करु शकते हमासंबंधात समझोता हा विषय हा नवरा व बायको हया दोघांनी निर्णय घेऊन ठरवायचा असतो.

**पालकत्व (*Guardianship)***

घटस्फोटाच्या कायदेशीर इलाजच्या वेळी मुलाबाळांची राखण ही न्यायालय स्वतःच करते. एकदा घटस्फोट उपचार पूर्ण झाला की न्यायालय हे मुलाबाळांचा ताबा व देखभाल हयाविषयी काही ठराविक आज्ञा देते.

**वैवाहिक संपत्ती (*Matrimonial Property)***

देशांत सध्या प्रचलित असलेल्या समाजिक-आर्थिक परिस्थितीत पत्नीचे कुटुंब व अर्थशास्त्र यासाठी योगदान हे मान्य केले जात नाही. बऱ्याच स्त्रिया हया मोठया संख्येने जीवन जगण्यासाठी उत्पन्न मिळविण्यास कुटुंबातर्फे केल्या जाणाऱ्या प्रयत्नांत सहभागी होतात. व त्या जरी तसे उत्पन्न मिळवित नसल्या तरी घर चालवण्यासाठी त्यांना असलेले आर्थिक महत्व घराच्या सर्व जबाबदाऱ्या उचलणे आणि नवऱ्याचा चांगुलपणा मिळविण्यासाठी गरगर फिरणे हमा गोष्टी कायद्याने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष स्वीकार केलेल्या नाहीत. विवाहीत महिला ज्यांना स्वतंत्र असे आर्थिक मिळकतीचे साधन नाही किंवा कौटुंबिक जबाबदाऱ्यांकडे संपूर्ण वेळ लक्ष देण्यासाठी विवाहानंतर ज्यांनी नोकरी सोडून दिली आहे अशा महिला हया आर्थिक दृष्टया त्यांच्या नवऱ्यांवर अवलंबून असतात लग्नात मिळालेली स्थिर व अस्थिर मालमत्ता हिची मालकी कायदेशीरपणे नवऱ्याची असते. जरी ती त्याच्या कमाईच्या बाहेरची मिळकत वा बचत हयापासून सर्व मालमत्तेमध्ये बंचित केले जाते जी त्यांना संयुक्तपणे मिळालेली असते. तसेच नवऱ्याकडून वा त्याच्या कुटुंबाकडून लग्नाच्या वेळी मिळालेली संपत्ति वा मालमत्ता पण त्यांना त्यांध्याच समाजामध्ये नाकारली जाते. आर्थिक व सामाजिक असुरक्षिता हयाची भीती ही स्त्रियांना घटस्फोट वा विभक्त होणे हयापासून दूर करते जरी विवाह हा आनंदी असला तरी त्यामुळे प्राधीन (*archaic)* आर्थिक योगदानाची परीक्षा घेणे चालू न ठेवता विवाहातील मालमत्तेवर हक्क निश्चित ठरविण्यासाठी खिगांच्या घरकामासाठी तिने दिलेल्या आर्थिक गोगदानाचे मूल्याला कायदेशीरपणे मान्यता देणे गरजेचे आहे.

**कौटुंबिक न्यायालये (*Family Court)***

सर्व विवाहाविषयक गोष्टीला चांगले बदल घडवून आणणारा कायदा हा सुटका देण्यासाठी विरुध्य तस्चाचा अवलंब करतो म्हणजेच सर्व वगातील वादी हे सुटका घेण्यासाठी सर्व सत्य सांगतो व प्रतिवादी से आरोप फेटाळून लावतो त्याशिवाय हया परिस्थितीत बरेच मुद्दे हे बिघाड सिध्दांतापेक्षा छोटया व चुकीच्या तत्वांवर आधारभूत असतात त्याचा परिणाम म्हणजे चांगली वकिली ही कौटुंबिक कल्याणापेक्षा नेहमीच खोटेपणा निश्चित करण्यासाठी सफल होते. अन्य वैवाहिक खटल्यांतील व शहरी खटल्यातील भेदभाव वा फरक हयामधील गैरहजेरी त्यामुळे अमर्याद विलंब होतो जो मन वळविण्याच्या मार्गावर (*Conciliation)* अडसर निर्माण करतो व पुढे पक्षकारांच्या मने बदल घडवून आणण्याच्या नातेसंबंधात कटुता निर्माण करतो जो विचार हा सर्व कौटुंबिक न्यायालाचा मुख्य विचार म्हणून मानला जातो तो परिस्थितीत अशी प्रकरणे हाताळण्यासाठी मार्गदर्शक तत्व आहे म्हणून आम्ही अशी जोरदार शिफारस करतो की, कौटुंबिक समस्यांमध्ये समझोता करण्यास विलंब लावणाऱ्या सर्व पध्दती हया नष्ट केल्या जाव्यात व कौटुंबिक न्यायालयांची स्थापना केली जावी प्जी मनोमिलनाचा मार्ग अवलंब करतील व त्याचप्रमाणे सामाजिक इच्छांचे निकाल प्राप्त करुन अनौपचारिक पध्दतीचा अवलंब करतील.

**समान नागरी कायदा (*Uniform Civil Code)***

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ५० वर्षे झाली तरी समान नागरी कायद्याची उणीव ही एक विसंगती *(Incongruity)* आहे जिचे स्पष्टीकरण हे दिलेच जाऊ शकत नाही. विशेषकरून निधर्मीपणा, शास्त्र व आधुनिकता हयांच्या दृष्टीकोनातून त्यांना दिले गेलेले सर्व प्रकारचे महत्व लक्षात घेतले तर निरनिराळया प्रकारच्या व्यक्तिगत कायद्यांचे अखंडत्व जे पुरुष व स्त्री हयामध्ये भेदभाव करतात हे राज्यघटनेत उल्लेख केलेल्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करतात ज्यामध्ये सर्व नागरीकांना समान प्रतिष्ठा वा दर्जा हयाचे वचन दिलेले आहे तसेच ते राष्ट्रीय एकात्मता व निधर्मीपणा हयांच्या खऱ्या हेतूंच्या विरुध्द आहे. आम्ही हया सध्याच्या प्रचलित कायद्यांत सुचविलेल्या दुरुस्त्या / सुधारणा हया फक्त त्या दिशेने सूचक आहेत ज्यामध्ये समानता ही आणावयाची आहे तत्सेच आम्ही राज्यघटनेच्या कलम ४४ च्या हुकूमामध्ये समान नागरी कायदा स्वीकारून त्याची वेगवान अंमलबजावणी झाली पाहिजे अशी शिफारस करतो.

**गुन्हेगारी कायद्यांतील सुधारणा (*Reform in Criminal Law)***

**१) लैंगिक संभोगासाठी परवानगी (*Consent to Sexual Intercourse)***

लैगिक संभोगासाठी मान्यता हयाचे कडक स्पष्टीकरण झाले पाहिजे व महिलांनी बळजबरीने हुकूम देऊन वा खोटी मान्यता ही पण काढून टाकली गेली पाहिजे. तसेच कायदे कमिशनने शिफारस केल्याप्रमाणे एखाद्याने महिलेच्या उपस्थितीमध्ये कोणाला तरी धमकी देऊन मिळविलेली मान्यता/परवानगी हिला पण मनाई केली पाहिजे. आमच्या दृष्टीकोनातून, लैंगिक संभोगासाठी संमति मिळण्यास गर्भपात न करता जास्त परिपक्वता आवश्यक आहे. ही सारखी वयोमर्यादा म्हणूनच दोन्ही केसीसमध्ये वापरली गेली पाहिजे.

### २) एकाच वेळी दोन बायका (*Bigamy)*

सध्याचा कायदा हा न्यायालयाचे अधिकार क्षेत्र अशा जागी मर्यादित करीत आहे जेथे दुसरा विवाह हा पार पडला होता किंवा जेथे पती व पत्नी अखेरचे राहत होते. हयामुळे पत्नीला अडचणी निर्माण होतात जिला नवऱ्याने दूर फेकल्यामुळे वा सोडून दिल्यामुळे जास्त दूर जावे लागते. म्हणून आम्ही असा सल्ला देतो की, न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात असलेल्या दोन गुन्हेगारी पध्दती कायद्याशिवाय चौकशी व कोर्टात दुसऱ्या पत्नीसाठी ज्याच्या अधिपत्याखाली पत्नी ही राहात आहे. त्यासाठी लवाद ह्याची तरतूद केली जावी.

### ३) व्याभिचार (*Adultery)*

आमध्या दृष्टीने व्याभिचार हाच एक वैवाहिक गुन्हा म्हणून बघितला गेला पाहिजे ज्याचा उपाय हा घटस्फोट वा विभक्त होणे हह्यांत केला गेला पाहिजे. हयाचा गुन्हेगार म्हणून ठेवणे हे गेल्या शतकातील मूल्ये आणून देतात ज्यांनी पत्नी ही नवयाची मालमत्ता म्हणून मानली होती. तसेच जुलम झालेल्या पत्नीला वकील व अन्य हयांना तिला आवश्यक ते संरक्षण देण्यास प्रतिबंध केला जातो. आम्ही अशी शिफारस करतो की व्यभिचार हा सातत्याने गुन्हा म्हणून मानणे हे एखाद्या व्यक्तिच्या सन्मान हयाच्या विरुध्द आहे व म्हणून पीनल कोड म्हणून तो काढून टाकला पाहिजे.

### राष्ट्रीयत्व (*Nationality)*

नागरीकत्व कायदा १९५५ च्या तरतूदीच्या गैरहजेरीत भारतीय स्रिया हया परदेशी माणसांशी लग्न करतात त्या वाढत्या घटनांमध्ये त्यांच्यापैकी पुष्कळ जणी हया कोणत्याही देशाच्या नागरिक नाही अशा प्रकारच्या निर्वासित झाल्या आहेत (*Stateless)* आम्ही असा सल्ला देतो की, हा कायदा सुधारित करून भारतीय खिया ज्या विदेशी माणसांशी लग्न करतात त्यासाठी विशेष असा नियम केला पाहिजे की, त्या विदेशी विवाहामुळे ती स्त्री तिथे भारतीय नागरिकत्व गमावू शकणार नाही.

सध्याचा नियम हा विदेशी माणसांशी विवाह केलेल्या भारतीय महिलांच्या मुलाबाळांना भारतीय नागरिक म्हणून मानण्यापासून प्रतिबंध करतो जेथे माता व पिता हे विभक्त झाले आहेत व आई ही पालक आहे तेथे मुलाचे राष्ट्रीयत्च हे पित्याच्या मधून पुढे चालू ठेवले जाईल हया नियमाला काहीही स्पष्टीकरण नाही. म्हणून आम्ही असा आग्रह धरतो की नागरिकत्व कायदा १९५५ च्या कलम ४(१) ची दुरुस्ती ही पुढील प्रमाणे वाचली गेली पाहिजे.

जी व्यक्ती भारताच्या बाहेर जन्माला आली आहे २६ जानेवारी वा २६ जानेवारी १९८० नंतर ती वंशपरंपरेने भारताची नागरिक होऊ शकेल जर त्या व्यक्तीच्या जन्माच्या वेळी तिची आई वा बाप हे भारतीय नागरीक असले तर

### राजा राममोहन रॉय : (२२ मे १७७२–२७ सप्टेंबर १८३३).

आधुनिक भारतातील अग्रगण्य धर्मसुधारक व ब्राह्यो समाकजाचे संस्थापक. पश्चिम बंगालमधील हुगळी जिल्हातील राधानगरी या गावी त्यांचा जन्म झाला. कृष्णचंद्र बंदोपाध्याय हे त्यांचे प्रतितामह बंगालमधील नवाबाच्या नोकरीत होते. नवाबाच्या दरबाराने ‘राय’ ही सन्मानदर्शक पदवी त्यांना दिली. त्यांचे पितामह ब्रजविनोद रॉय यांनी नवाबाची नोकरी सोडून दिली. रामकांत रॉय यांच्या कुळात वैष्णव संप्रदात होते. राममोहनांची माता तारिणीदेवी यांचे माहेर राममोहन रॉय याचे पिता आणि पितामह हे परमधार्मिक होते. घरात देवपूजा आणि भागवताचे पठण नित्य चालत

होते. राममोहन यांचे बंगाली, फार्सी व संस्कृत या तीन भाषांचे प्राथमिक अध्ययन घरीच झाले. वयाच्या अठराव्या वर्षी ते बिहारमधील पाटणा येथे अरबी आणि फार्सी यांच्या शिक्षणासाठी गेले. कुराणाचाही त्यांनी अभ्यास केला. मुल्ला व मौलवी त्यांचा अरबी, फार्सी पांडित्याने विस्मित होत. इस्लाम धर्मातील आणि सूफी संप्रदायातील त्यांची पारंगतता पाहून मातापित्यांनी संस्कृत अध्ययनासाठी त्यांची वाराणसीला रवाना केले. श्रुतिस्मृती-पुराणांचा, कुराणाचा आणि बायबलचा सखोल अभ्यास त्यांनी केला. वयाच्या सोळाव्या वर्षी ते आपल्या गावी परतले. त्या वेळी तुलमात्मक अध्ययन करून त्यांच्या लक्षात आले, की विविध देवदेवता व त्यांचे अवतार यांची आणि मूर्तीची पूजा करणे अयोग्य आहे. कारण एकच अद्वितीय परमेश्वर आहे. त्यांनी आपले मूर्तिपूजाविरोधी विचार आपल्या पित्याला व मातेला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. माता पिता आणि राममोहन यांच्यामध्ये जबरदस्त मतभेद उत्पन्न झाला. त्यांची मातापित्यावर श्रद्धा होती आणि विलक्षण भक्तीही होती. मतभेदामुळे राममोहन यांना घर सोडावे लागले. हिंदू समाज रचनेतील उच्चनीच जातिभेदही त्यांना अमान्य होता. त्यांनी भारतभर प्रवास केला. बौद्ध धर्म समजावून घेण्याकरिता बौद्ध धर्माचा व तत्त्वज्ञानाचा त्यांनी अभ्यास केला त्यासाठी तिबेटात गेले. तिबेटात प्रतिमापूजन, धर्मगुरुपूजन, मंत्रतंत्र व कर्मकांड या बाह्यांगांचा पसारा त्यांना दिसला. त्या कर्मकांडावर तेथील धर्मगुरूंशी त्यांनी वाद केले. तेथील बौद्ध लोक चिडले. राममोहनांना ठार मारण्याचाही प्रयत्न झाला. या वेळी सुदैवाने दयाळू स्त्रियांनी त्यांना प्राणसंकटातून वाचविले आणि स्वदेशी सुरक्षितपणे पोहोचविले. १९७० मध्ये स्वगृही परतल्यावर मातापित्यांचा रागही निवळला होता परंतु मातापित्यांची त्यांनी निराशा केली. त्यांची मूर्तिपूजाविरोधी व बहुदेवतावादविरोधी मते अधिकच ताठर व कणखर बनली होती. भोवतालच्या सामाज सनातनी व रूढिनिष्ठ असल्याने त्यांचा द्वेष करू लागला. पिताजींनी त्यांना घराबाहेर काढले.

तत्कालीन रीतीला अनुसरुन राममोहनांचे बालपणीच पहिले लग्न झाले होते. प्रथम पत्नीच लवकरच निवर्तल्यामुळे वडिलांनी १७८१ व १७८२ साली त्यांची दोन लग्ने लावून दिली. १८०० साली त्यांना पुत्रप्राप्ती झाली. पुत्राचे नाव राधाप्रसाद असे ठेवले. कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढल्याने घरची सांपत्तिक स्थिती ठीक असूनही त्यांना सरकारी नोकरी पतकारावी लागली. १८०३ मध्ये डाक्का येथील कलेक्टर टॉमस वुडफर्ड याचे दिवाणपद स्वीकारले. त्याच वेळी रामकांत रॉय निवर्तले. याच सुमारास राममोहनांनी ग्रंथलेखनास सुरुवात केली. फार्सी भाषेत त्यांनी ‘ईश्वरभक्तांस देणगी’ (तुहफास-उल्-मुवहिद्दीन) या अर्थाच्या शीर्षकाखाली एक निबंध प्रसिद्ध केला. त्याचे सार असे- सृष्टिकर्ता व पालनकर्ता एक निराकार परमेश्वर आहे. हा सिद्धांत सर्व धर्माचा पाया होय. निरनिराळ्या धर्माच्या लोकांनी या धर्मतत्त्वावर भलभलत्या कल्पनांचा डोलारा चढवला त्यामुळे भिन्नभिन्न धर्मसंप्रदाय अस्तित्वात आले. धर्माचे खरे मूलभूत तत्त्व ठरविण्याकरिता खऱ्याखोट्याचा ऊहापोह केला पाहिजे.

रामगड जिल्हा कोर्टाचे रजिस्ट्रार डिग्बी यांच्याशी १८०५ साली त्यांची मैत्री जमली. त्या वेळी वरिष्ठ इंग्रजी अधिकाऱ्यांपुढे भारतीय लोक हांजीहांजी करीत, गुलामासारखे वागत. राममोहन अनेक वरिष्ठ पदस्थ इंग्रजी अधिकाऱ्यांच्या नोकरीत राहिले परंतु स्वतःच्या अंगच्या गुणांच्या बळावरच ते चढत गेले. डिग्बींच्या सहवासात असताना त्यांनी इंग्रजीचे अध्ययन केले. इंग्रजीत भाषण, लेखन ते उत्कृष्टपणे करू लागले. बायबलचा व अनेक विषयांतील ग्रंथांचा व्यासंग त्यांनी सुरू ठेवला.

राममोहनांनी १८१० साली सरकार नोकरी सोडली व रंगपूरच्या जवळ माहीगंज येथे स्वतःचे घर बांधून ते राहू लागले. तेथे लोकांना पाण्याची सोय व्हावी स्वखर्चाने एक तळेही बांधले. तेथे सुशिक्षित मंडळीबरोबर धर्मचर्चा सत्र सुरू केले. या मंडळींमध्ये विविध धर्मपंथांचे लोक भाग घेत. मूर्तिपूजेचा ऊहापोह विशेष होऊ लागला कारण हिंदू धर्मात अगणित धर्मसंप्रदाय असले, तरी मूर्तीपूजा सर्वमान्य आहे. त्यामुळे मूर्तिपूजेची बाजू उचलून धरणारे बहुसंख्य लोक होते. मूर्तिपूजेचे समर्थक गौरीकांत भट्टाचार्य यांनी ज्ञानचंद्रिका हे पुस्तक लिहिले. ही सनातनी मंडली मतभेदांमुळे राममोहनांना विविध प्रकारे छळू लागली. पत्नी व मुले यांच्यासह गावात राहणे कठीण होऊ लागले. राममोहन यांनी राधानगराजवळ रघुनाथापूर येथे नवे घर बांधले. या घरासमोर त्यांनी ईश्वरोपासनेकरता एक वेदी उभारली. या घरातच त्यांच्या रामप्रसादनामक दुसऱ्या पत्राचा जन्म झाला. धार्मिक-मौलिक मतभेदांमुळे त्यांच्या मातेशी त्यांचे वितुष्ट आले. धाकटी दोन भावंडे मृत्यू पावली, म्हणून मातेच्या सांत्वनासाठी तिच्या भेटीला ते गेले. तशाही स्थितीत मातेने भेट घेण्याचे

नाकारले. या घटनेने त्यांना फार दुःख झाले. तिच्या हट्टाकरिता कुलदेव राधागोविंद याच्या मूर्तीपुढे साष्टांग नमस्कार घातला व म्हटले, की 'मी माझ्या आईच्या देवाला नमस्कार करतो'.

राममोहन १८१४ साली कलकत्त्याला स्थायिक झाले. तेथे सामाजिक व धार्मिक आंदोलनास त्यांनी प्रारंभ केला. आरंभी 'आत्मीय सभा' सुरू करून तीत भिन्नभिन्न विषयांवर चर्चा सुरू झाल्या. वेदान्तसूत्रे, उपनिषदे यांची बंगाली व इंग्रजी भाषांतरे छापून प्रसृत केली. सतीप्रथेकरता धर्मशास्त्राचे आलोडन केले. जेथेजेथे एखादी स्त्री सती जात असे, तेथे आपल्या सहकाऱ्यांसह जाऊन तिला परावृत्त करण्याचा प्रयत्न ते करू लागले. त्यामुळे समाज त्यांना हिंदुधर्मविरोधी मानू लागला. १८१८ साली, सतीची प्रथा बंद व्हावी म्हणून समाजातील प्रतिष्ठित मंडळीच्या सह्यांसह एक अर्ज त्यांनी सरकारकडे पाठवला. त्यात म्हटले, की या अमानुष चालीवर बंदी घालून सरकारने कायदा करावा आणि हे समाजाकडून व आप्तेष्टांकडून होणारे स्त्रियांचे खून बंद पाडावेत. त्यावेळचे गव्हर्नर ज. लॉर्ड विल्यम बेंटिक यांनी राममोहनांशी प्रदीर्घ चर्चा करून सतीबंदीच्या कायद्याची निश्चिती केली. ४ डिसेंबर १८२९ रोजी सतीबंदीचा कायदा जाहीर केला.

ख्रिस्ती धर्मप्रसारक व पाद्री हे हिंदू धर्मावर जबरदस्त टीका करीत. त्यांच्याशी साधार चर्चा करण्याकरिता ग्रीक व हिब्रू भाषांचे सखोल अध्ययन राममोहनांनी केले. कारण मूळ बायबल हिब्रू व ग्रीक भाषांत लिहिले आहे. हिंदू पंडितांना वाटले, की राममोहन ख्रिस्ती होणार परंतु लवकरच हिंदूंचा भ्रमनिरास झाला. १८२० साली राममोहनांनी द प्रिसेप्टस ऑफ जीझस, द गाइड टू पीस अँड हॅपिनेस (येशूच्या आज्ञा, शांती व सुखाचा मार्ग) या नावाने ७० पृष्ठांचे एक इंग्रजी पुस्तक प्रसिद्ध केले. १८८१ साली नव्या करारातील चारही शुभवर्तमानांचे बंगालीत भाषांतर केले. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या धर्मप्रसारावर व उपद्रव्यापांवर जोराचा हल्ला केला. ४ डिसेंबर १८२१ रोजी संवादकौमुदी नामक एक साप्ताहिक बंगालीत सुरू केले. सामाजिक आणि धार्मिक सुधारणांविषयक प्रश्नांचा आणि भारतीयांच्या राजकीय मागण्यांचा व तक्रारींचा ऊहापोह करणारे भारतीयाने सुरू केलेले हे पहिले नियतकालिक होय. भारतीय वृत्तपत्रव्यवसायाचा हा शुभारंभ होय. १८२२ साली मिरात-उल्-अखबार हे फार्सी साप्ताहिकही सुरू केले. यामधील भाषा आणि व्चार अतिशय प्रखर होते. याचवेळी सरकारने हुकूम काढला, की गव्हर्नर जनरलच्या परवान्याशिवाय कोणीही नियतकालिक काढू नये. हा हुकूम म्हणजे वृत्तपत्रस्वातंत्र्यावरील पहिले गंडांतर होय. राममोहनांना विस्मय वाटला व रागही आला. वृत्तपत्रस्वातंत्र्यासाठी सरकारदरबारी त्यांनी बराच काळ झगडा चालू ठेवला. वृत्तपत्रस्वातंत्र्यासाठी झगडत असताना त्यांनी शिक्षणषयक प्रश्नाला हात घातला.

याच वर्षी सरकारी शिक्षणखाते स्थापन झाले व कलकत्ता येथे शिक्षणखात्यातील मंडळींनी ही गोष्ट अमान्य झाली. भारताचा भाग्येदय होण्यास व पुढारलेल्या अन्य राष्ट्रांबरोबरीचा दर्जा भारतास प्राप्त होण्यास भारतीयांना आधुनिक पाश्चात्त्य पद्धतीचे शिक्षण मिळाले पाहिजे, असा विचार त्यांनी मांडला. नुसत्या परंपरागत संस्कृत शिक्षणाने आजच्या नवीन ज्ञानाचा जो महान विस्तार झाला आहे., त्यापासून भारतीय लोक वंचित राहणार हे पाहून त्यांनी निक्षून सांगितले, की भौतिकी, रसायन, तंत्रज्ञान, भूगोल, इतिहास, अर्थशास्त्र इ. विद्यांचे शिक्षण भारतीयांना देणारी विद्यालयेच स्थापन करणे आवश्यक आहे. त्यांनी संस्कृत महाविद्यालयाला विरोध केला, तरी स्वखर्चाने वेदान्त महाविद्यालयाची स्थापना केली (१८२५). १८२४ मध्ये बंगाली भाषेत इतिहास, भूगोल इ. अनेक विषयांवर पुस्तके लिहिली. त्यांच्या वेदान्त ग्रंथ (१८१५) ह्या स्वतंत्र ग्रंथामुळे बंगाली गद्यलेखनाचा पाया घातला गेला. बंगाली गद्याचे ते जनक मानले जातात. बंगाली व्याकरणावर दीर्घ व्यासंग करून गौडीय व्याकरण (१८३३) हा ग्रंथ लिहिला. त्यामुळे बंगाली भाषेला उत्कर्षाचे दिवस प्राप्त झाले.

आपल्या धर्मविषयक व ईश्वरविषयक उदार तत्त्वज्ञानाचा व उपासनापद्धतीचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी २० ऑगस्ट १८२८ रोजी ब्राह्म समाजाची (ब्राह्मो समाजाची) स्थापना केली. कलकत्ता येथे राममोहनांनी रामचंद्रविद्यावागीष, उत्सवानंदविद्यावागीष, ताराचंद्र चक्रवर्ती इ. सहकाऱ्यांबरोबर ब्राह्मसमाजाची पद्धतीने उपासनेला प्रारंभ केला. या नवविचारप्रणालीची यथोचित कल्पना देणारे सार्वत्रिक धर्मनामक पुस्तक लिहिले. त्यात मूळ सिद्धांत असा सांगितला,

की ईश्वर पूजा म्हणजे ईश्वराच्या गुणांचे चिंतन. तो अतर्क्य व अवर्णनीय आहे. सृष्टिक्रमावरून त्याचे आकलन होते. ज्या वेळी मन शांत असेल, त्या वेळी चांगल्या जागी, चांगल्या वेळी त्याची पूजा करावी.

दिल्लीचा बादशहा दुसरा अकबर याच्या काही राजकीय तक्रारी ब्रिटिश सरकारपुढे दाखल करण्याकरता, त्याचप्रमाणे संतीबंदीच्या कायद्याविरुद्ध ब्रिटिश सरकारच्या दरबारी अर्ज विनंत्या येत असल्याने सरकारने सतीबंदीचे धोरण कायम ठेवावे म्हणून १९ नोव्हेंबर १८३० या दिवशी राममोहन इंग्लंडला रवाना झाले. त्या वेळी दिल्लीच्या बादशहाने खुष होऊन त्यांना 'राजा' हा किताब दिला. परदेशात त्यांचे अनेक ठिकाणी सत्कार झाले. तिथल्या प्रतिष्ठित लोकांना त्यांच्याविषयी अत्यंत आदर वाटला. त्यांच्या सभासमारंभातील भाषणांनी व चर्चा संवादांनी भारताचा प्रतिमा त्यांनी उजळून टाकली. याच वेळी ते अकस्मात आजारी पडले. ब्रिस्टल येथे त्यांचे निधन झाले. रवींद्रनाथ ठाकूर (टागोर) यांचे आजोबा द्वारकानाथ ठाकूर व इतर सहकार्यांयनी कार्नोव्हेल येथे त्यांची समाधी बांधली.

ब्राह्म समाजाच्या स्थापनेने हिंदी नवयुगाची प्रभात झाली. कन्या विक्रय, कन्याहत्या, बालविवाह, बाला-वृद्धविवाह इ. अनेक हीन चालींच्या बंधनातून भारतीय स्त्रीला मुक्त करण्याकरता त्यांनी आंदोलन उभारले. बुद्धिप्रामाण्य, व्यक्तिस्वातंत्र्य आणि मानवी समानता ही तीन मूल्ये या प्रज्ञाशाली पुरूषाने भारतीयांना उपलब्ध करून दिली. सुंदर, भव्य, विद्वान, त्यागी व तपस्वी असा हा पुरूष इंग्रजी राज्याच्या स्थापनेनंतर लवकरच उदयास आला.

**ईश्वरचंद्र विद्यासागर, : (२६ सप्टेंबर १८२०—२९ जुलै १८९१).**

बंगालमधील एक श्रेष्ठ संस्कृत पंडित, लेखक व उदारमतवादी सुधारक. त्यांचा जन्म पश्चिम बंगालमध्ये मिदनापूर जिल्ह्यातील वीरसिंह या गावी झाला. त्यांच्या पित्याचे नाव ठाकूरदास आणि आईचे नाव भगवतीदेवी असे होते. प्राथमिक शिक्षण जन्मगावी घेऊन कलकत्त्याच्या (कोलकात्याच्या) संस्कृत महाविद्यालयात त्यांनी उच्च शिक्षण घेतले. १८३९ साली हिंदुधर्मशास्त्रविषयक परीक्षेत उत्तीर्ण झाल्याने मिळालेल्या प्रमाणपत्रात त्यांच्या नावापुढे 'विद्यासागर' ही उपाधी लावली होती; म्हणून बंदोपाध्याय हे त्यांचे उपनाम मागे पडून विद्यासागर हेच नाव रूढ झाले. ते अठरा वर्षांचे असताना त्याच महाविद्यालयात व्याकरणाचे वर्ग घेण्याचे काम त्यांच्याकडे देण्यात आले. वयाच्या चौदाव्या वर्षी शत्रुघ्न भट्टाचार्य यांची कन्या दीनमयी देवी हिच्याशी त्यांचा विवाह झाला.

पंडित ईश्वरचंद्र यांनी शिक्षणखात्यात साध्या शिक्षकापासून (Fort William College, १८४१) ते शिक्षणनिरीक्षकाच्या हुद्द्यापर्यंत (१८५४—५८) काम केले. सरकारी शिक्षणखात्यात असताना शिक्षणखात्यातर्फे मुली शिकल्या पाहिजेत, या हेतूने त्यांनी ३५ नवीन बालिका विद्यालये, एक मध्यवर्ती अध्यापक विद्यालय आणि बंगालमधील प्रमुख शहरांत आदर्श (Model) विद्यालये स्थापन केली. संस्कृत महाविद्यालयात पूर्वी ब्राह्मणेतर विद्यार्थांना शिक्षण मिळत नसे. ते धोरण रद्द करून त्यांनी सर्व जातींच्या विद्यार्थ्यांना मुक्त प्रवेश दिला. १८५८ साली अधिकाऱ्यांशी मतभेद झाल्याने ते शिक्षणखात्यातून बाहेर पडले. त्यापूर्वीच विधवांच्या प्रश्नाकडे त्यांचे लक्ष गेले होते. स्वतः संस्कृत पंडित असल्याने पराशर संहितेत विधवाविवाहास मान्यता असल्याचा दाखला त्यांनी काढून दाखविला. १८५६ साली विधवाविवाहाचा अधिनियम संमत करून घेण्यात त्यांचा मोठा वाटा होता. ईश्वरचंद्र हे स्वतः कर्ते सुधारक होते. स्वतःच्या मुलींची लग्ने त्यांनी त्या चौदा-पंधरा वर्षांच्या होईपर्यंत केली नाहीत. आपल्या मुलाचे लग्न त्यांनी एका बालविधवेशी लावून दिले होते. कुलीन ब्राह्मणवर्गातील बहुपत्नीकत्वाची चाल, बालविवाह, मद्यपान इ. अनिष्ट चालींविरुद्ध त्यांनी बंगालमध्ये चळवळी केल्या.

ईश्वरचंद्र विद्यासागर हे आधुनिक बंगाली गद्याचे जनक समजले जातात. त्यांची भाषा सुबोध व सामान्य जनांना सहज समजेल अशी आहे. बंगाली भाषेच्या प्रकृतीला अनुरूप अशी गद्यशैली त्यांनी प्रचलित केली आणि त्यामुळेच बंगाली गद्याच्या जनकत्वाचा मान त्यांना दिला जातो. त्यांच्यापूर्वी राजा राममोहन रॉय (Raja RamMohan Roy) यांनी गद्यशैली रूढ केली होती; पण ती पंडिती वळणाची होती. सर्वसामान्यांना ती सहजगम्य नव्हती. त्यांची स्वतःची प्रकृती तत्त्वचिंतकाची असल्याने भाषाशिल्पाकडे त्यांनी कधी लक्षच दिले नाही. ईश्वरचंद्रांची प्रकृती

त्यांच्याहून भिन्न होती. ती जशी पंडिताची तशीच साहित्यरसिकाची व सामाजिक संस्कारकाची होती. म्हणून आजही त्यांचे साहित्य वाचले जाते. त्यांचे लेखन मुख्यतः बंगाली आणि संस्कृत भाषांत आहे. ईश्वरचंद्रांनी मुख्यतः शिक्षणाचा प्रसार, समाजसुधारणा आणि साहित्यनिर्मिती अशा त्रिविध भूमिकांतून लेखन केले. संस्कृत भाषेच्या सुलभ अध्ययनासाठी त्यांनी बोधोदय (१८५१), उपक्रमणिका (१८५१), ऋजुपाठ (३ भाग, १८५१ — ५२), व्याकरणकौमुदी (३ भाग, १८५३ व १८६२) व वर्णपरिचय (२ भाग, १८५५) हे ग्रंथ लिहिले. त्याचप्रमाणे बंगाली भाषा शिकण्यासाठी कथामाला (१८५६) तसेच शब्दमंजरी नावाचा शब्दकोश तयार केला. बांगलार इतिहास (१८४८), जीवन चरित (१८४९), चरितावलि (१८५६) आणि भूगोल-खगोल-वर्णन (१८९२) हे ग्रंथ त्यांच्या ऐतिहासिक दृष्टिकोणाचे आणि चतुरस्त्र जिज्ञासेचे द्योतक आहेत. त्यांची पहिली साहित्यकृती वेताल पंचविंशति (१८४७) ही सुलभ बंगाली भाषेचे प्रतीक म्हणून आजही लोकप्रिय आहे. शकुंतला उपाख्यान (१८५४), सीतार वनबास (१८६०), आख्यान मंजरी (१८६३) आणि भ्रांतिविलास (१८६९) ह्या त्यांच्या इतर साहित्यकृती आहेत. पुनर्विवाहाच्या पुष्ट्यर्थ त्यांनी विधवाविवाह (१८५५) हा ग्रंथ लिहिला. विधवाविवाहाला पाठिंबा देणारे दाखले धर्मशास्त्रातूनच दाखविणारा आणि पंडितांना त्यांनी प्रमाणभूत मानलेल्या ग्रंथांच्या आधारेच निरुत्तर करणारा ग्रंथ म्हणून तो अद्वितीय ठरला. यांव्यतिरिक्त विद्यासागर यांनी संस्कृत नाटकांचे तसेच महाभारतादी इतर बारा ग्रंथांचे संपादन केले आहे.

१८७७ साली कलकत्त्यास भरलेल्या दरबारात ईश्वरचंद्र यांना इंग्लंडच्या राणीकडून बहुमानाची सनद मिळाली व पुढे 'सी. आय. इ.' ही पदवीही मिळाली. वैयक्तिक आचरणात ते अत्यंत साधे, परंतु निर्भय होते. समाजसुधारणेच्या बाबतीत ते राजा राममोहन रॉय यांचे वारसच म्हणावे लागतील. त्यांच्या सामाजिक कार्यामागील निकोप बुद्धिवाद त्यांनी राजा राममोहन रॉय यांच्यापासूनच उचलला होता.

ईश्वरचंद्रांनी आपल्या आयुष्यात पुष्कळ धन मिळविले; पण ते सारे त्यांनी दुःखी, कष्टी, दलित, अपमानित, उपेक्षित ह्यांच्या साह्यार्थ खर्चिले. त्यांची स्वतःची राहणी अगदी साधी होती. ते अज्ञेयवादी होते. देव, धर्म, अध्यात्म इत्यादींच्या गुंत्यात त्यांनी स्वतःला कधीच अडकवून घेतले नाही. 'मी वास्तव जगाचा व त्यात राहणाऱ्या जीवांचाच विचार करीत असतो. माणुसकीने वागणे हाच मी माझा धर्म मानतो', असे ते म्हणत. हा आपला धर्म त्यांनी आयुष्याच्या अखेरीपर्यंत निष्ठापूर्वक आचरिला. त्यामुळे सारे जग त्यांना 'विद्यासागर' म्हणून ओळखीत असले, तरी बंगालमधील सर्वसामान्य जनता त्यांना 'दयासागर' म्हणूनच अधिक ओळखते.

**महात्मा जोतीराव गोविंदराव फुले,: ( १८२७ — २८ नोव्हेंबर १८९०).**

महाराष्ट्रातील समाजसुधारकांच्या पहिल्या पिढीतील श्रेष्ठ समाजसुधारक आणि विशेषतः समाजातील श्रमजीवी वर्गाच्या शोषणाची व सामाजिक दास्याची मीमांसा करणारा क्रांतिकारक विचारवंत. सावता माळी समाजातील गोविंदराव शेटिबा फुले आणि चिमणाबाई या दांपत्याचे जोतीराव हे दुसरे अपत्य. मूळचे गोऱ्हे हे उपनाव बदलून फुलांच्या धंद्यामुळे फुले हे नाव पडले. जोतीरावांच्या लहानपणीच त्यांच्या आईचे निधन झाले. त्यांच्या पालनपोषणाचा सर्व भार वडिलांवरच पडला. जोतीरावांना इंग्रजी शिक्षणाचा वेध लागला होता. त्यात अनेक अडचणी आल्या, तरी शालान्त परीक्षेइतके इंग्रजी शिक्षण त्यांनी पुरे केले. इंग्रजीतील उच्च दर्जाचे ग्रंथ समजण्याची पात्रता तसेच इंग्रजीत लेखन करण्याची क्षमताही त्यांनी प्राप्त करून घेतली. बौद्धिक शिक्षणाबरोबरच शरीरशिक्षणही घेतले. लहूजीबुवा मांग यांच्यापाशी दांडपट्टा शिकले, मल्लविद्या संपादन केली. शिक्षण पुरे केल्यावर १८४० मध्ये जोतीरावांचा विवाह सातारा जिल्ह्यातील शिरवळपासून ५ किमी.वर असलेल्या नायगाव येथील खंडोजी नेवसे पाटील यांची कन्या सावित्री हिच्याशी झाला. सावित्रीबाईचे शिक्षण जोतीरावांनीच पुरे केले. त्या स्वयंस्फूर्तीने जोतीरावांच्या समाजसुधारणेच्या आणि लोकशिक्षणाच्या कार्यात जन्मभर सहभागी झाल्या. शालेय शिक्षण चालू असतानाजोतीरावांनी अनेक मित्र मिळविले. सदाशिव बल्लाळ गोवंडे, सखाराम यशवंत परांजपे, मोरोपंत विठ्ठल वाळवेकर इ. मित्र शेवटपर्यंत जोतीरावांना सामाजिक सुधारणेच्या चळवळीतही सहकारी म्हणून चिकटून राहिले. जगाचा, पश्चिमी देशांचा व विशेषतः भारताचा प्राचीन, अर्वाचीन इतिहास त्यांनी इंग्रजीमधून वाचला आणि सखोलपणे त्यावर मनन केले. अमेरिकन राज्यक्रांतीच्या

इतिहासाची त्यांच्या मनावर खोल छाप पडली. द राइट्स ऑफ मॅन (१७९१-९२) या टॉमस पेन (१७३७-१८०९) याच्या ग्रंथाची त्यांनी अनेक पारायणे केली मानवी समतेचा आणि स्वातंत्र्याचा ध्येयवाद आत्मसात केला. या तत्त्वांच्या आधारे ते भारतीय समाजाचे, विशेषतः हिंदू समाजाचे, उत्कृष्ट चिंतन करू शकले. संस्कृत ग्रंथही त्यांनी वाचले. वेद, स्मृती, पुराणे यांच्यातील कथांचा अभ्यास केला. अश्वघोषाच्या नावावर प्रसिद्ध असलेले वज्रसूची हे उपनिषद त्यांना फार आवडले. त्यात अनेक ब्राह्मण ऋषिमुनींचे कूळ हे ब्राह्मण नव्हते असे सांगितले आहे. जातिभेद हा खोटा आहे, हे तत्त्व स्पष्ट रीतीने मांडले आहे. कबीराच्या बीजक ग्रंथातील 'विप्रमति' या प्रकरणाचा त्यांच्या विचारसरणीवर प्रभाव पडला. त्यांनी एका ठिकाणी स्वतःचा 'कबीर साधूच्या पंथाचा' असा निर्देश केला आहे. अशा चिंतन मननाने त्यांची भारतीय समाजक्रांतीची विचारसरणी तयार झाली. जगातील क्रांतिकारकांच्या नेत्यांमध्ये शोषित समाजातून पुढे आलेले यांच्यासारखे नेते फार थोडे, कार्ल मार्क्स, लेनिन इ. मध्यमवर्गीय नेते कामगारक्रांतीचे पुरस्कर्ते झाले. फुले, आंबेडकर हे शोषित समाजातून निर्माण झाले. हे त्यांचे वैशिष्ट्य होय.

जोतीरावांनी आपल्या विचारांचा एक सुबोध व सुंदर, सूत्रबद्ध सारांश सांगितला आहे — ''विद्येविना मति गेली मतीविना नीति गेली नीतीविना गति गेली! गतीविना वित्त गेले वित्ताविना शूद्र खचले इतके अनर्थ एका अविद्येने केले.'' त्यांनी हा निष्कर्ष शेतकऱ्याचा आसूड (१८८३) मध्ये प्रारंभी सांगितला आहे. त्यांच्या सगळ्या सत्यशोधक चळवळीचा भावार्थ यात आला आहे. प्रचलित हिंदू धर्मसंस्था, त्यावर आधारलेली हिंदूंची समाजरचना व ब्रिटिशांची शासनसंस्था व सर्वांचा समुच्चित परिणाम म्हणजे शूद्र शेतकऱ्यांचे आणि दलितांचे सध्या दिसणारे अपार दैन्य होय या दैन्यावस्थेतून बाहेर पडण्याकरिता त्यांनी लोकशिक्षण हाच मुख्य उपाय होय, असे ठरविले. अज्ञानग्रस्त शूद्र, अतिशूद्र जसे ब्राह्मणादी वरिष्ठ वर्गाच्या दास्यात खितपत पडले आहेत त्याचप्रमाणे स्त्री जातदेखील पुरूष वर्गाच्या दास्यात युगानुयुगे सापडली आहे हे लक्षात घेऊन जोतीरावांनी मुलींसाठी एक शाळा स्थापन केली (१८४८). त्यांच्या पत्नी सावित्रीबाई यांनी याच शाळेत अध्यापनाचे कार्य सुरू केले. ब्राह्मण समाजासह सर्वच समाज स्त्री शिक्षणाच्या विरोधी होता. जातिभेदाची आणि पवित्र रूढींची बंधने अंधश्रद्धेने पाळीत होता. त्यास फार थोडे अपवाद होते. सुधारकांना स्वतःचे कुटुंब, स्वतःची जात-जमात आणि एकंदरीत सर्व समाज विरोध करीत आणि वाळीत टाकीत. जातिबहिष्काराचे असहाय असे दडपण क्रियावान सुधारकांना सोसावे लागले जिवलग नातेवाईकांचा विरोध होत असे. उदा., जोतीरावांचे वडील गोविंदराव यांनी मुलगा व सून यांना घराबाहेर काढले आणि खुद्द माळी समाजाने नाना प्रकारे अवहेलना चालू केली. या सर्व प्रतिकूल परिस्थितीला धैर्याने तोंड देऊन जोतीराव व सावित्रीबाई यांची समाजसुधारणेच्या क्षेत्रात आगेकूच सुरूच राहिली. नंतर रास्ता पेठेत व वेताळ पेठेत आणखी दोन शाळा काढल्या (१८५१). अस्पृश्यांसाठी शाळा काढली. या त्यांच्या प्रयत्नांना तत्कालीन मोठमोठ्या विचारवंत समाजसुधारकांचा आणि राज्यकर्त्यांचाही पाठिंबा मिळत राहिला. १८५२ मध्ये सरकारी विद्या खात्याकडून मेजर कँडी यांच्या अध्यक्षतेखाली जोतीरावांच्या शिक्षणकार्याबद्दल त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

त्यावेळचे सर्वच भारतीय समाजसुधारक हे स्त्रियांची दास्यातून आणि दुःस्थितीतून सोडवणूक करण्याकरता प्रयत्नशील झाले होते. हिंदूंच्या उच्च जातींमध्ये विधवाविवाह निषिद्ध मानला होता. बालपणी आणि वारंवार उद्‌भवणाऱ्या प्राणघातक साथींच्या रोगांमुळे पतिनिधन होऊन तरूणपणीच वैधव्य आलेल्यांची संख्या मोठी होती. केशवपन केल्याशिवाय विधवा ही अपवित्र मानली जात होती. समाजाची आणि कुटुंबाची त्यांच्यावर करडी नजर असे. बाल व तरुण विधवांचा प्रश्न सोडविण्याकरिता पुनर्विवाहाची चळवळ सुधारकांनी सुरू केली. या चळवळीला जोतीरावांचा पूर्ण सक्रिय पाठिंबा होता. तारुण्यकाली स्वाभाविकपणे वासनेला बळी पडलेल्या विधवांची फार विटंबना होत होती. गर्भपाताचे प्रयत्न होत, जन्मलेल्या बालकांची हत्याही होई. त्यांना संरक्षण देण्यासाठी फुल्यांनी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली (१८६३). या गृहात अशा स्त्रियांच्या बाळंतपणाचीही सोय केली होती. जोतीरावांनी पुढे जो यशवंत नावाचा मुलगा दत्तक म्हणून घेतला तो काशीबाई नावाच्या ब्राह्मण विधवेचा मुलगा होता. विधवांच्या केशवपनाची चाल बंद व्हावी म्हणून त्यांनी चळवळ उभी केली व त्याकरता न्हाव्यांचा संपही घडवून आणला.

अस्पृश्य व दलितांच्या प्रश्नालाही त्यांनी तितक्याच मनस्वीपणेचालना दिली. अस्पृश्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ही एक अत्यंत गंभीर अशी कायमची समस्या लक्षात घेऊन आपल्या वाड्यातील पाण्याचा हौद त्यांनी अस्पृश्यांसाठी खुला केला.

महाराष्ट्रातील तत्कालीन भिन्न मतांच्या व विचारसरणींच्या समाजसुधारकांच्या विविध कार्यक्रमांमध्ये जोतीरावांचा सहभाग नेहमीच असे. उदा., आर्य समाजाचे संस्थापक स्वामी दयानंद सरस्वती (१८२४-८३) यांची पुणे येथे महादेव गोविंद रानडे (१८४२-१९१०) प्रभृती सुधारकांनी मिरवणूक काढली. त्याचे पुढारीपण जोतीरावांनी केले. उलट जीर्ण मतवादी रूढीनिष्ठांनी या मिरवणुकीची थट्टा व विडंबन करण्याकरिता गर्दभानंदांची दिंडी सुरू केली (१८७५).

फुले हे १८७६-८२ या कालावधीत पुणे नगरपालिकेचे सदस्य होते. समाजाच्या मौलिक परिवर्तनाकरिता समाजरचनेतील धर्मभेदमूलक विद्वेष, जातिभेदमूलक उच्च-नीच भाव, स्त्रीदास्य, हिंदू धर्मसंस्थेतील मूर्तिपूजा, संस्कृत भाषेतील कर्मकांड इ. गोष्टींचे उच्चाटन करून समताप्रधान समाज निर्माण करण्याकरिता व अंधश्रद्धेचे निर्मूलन करून वैचारिक क्रांती करण्याकरिता सत्यशोधक समाजाची स्थापना १८७३ मध्ये फुले यांनी केली. या सत्यशोधक समाजाचे सर्व धर्मांचे व जातींचे नागरिक सदस्य व्हावेत, अशी योजना केली होती. फुले यांनी मौलिक आणि प्रासंगिक असे दोन्ही प्रकारचे लेखन करून पुस्तके आणि पुस्तिका प्रसिद्ध केल्या. त्यावेळच्या महाराष्ट्राच्या ग्रामीण व नागरी अशा दोन्ही प्रकारच्या सामाजिक जीवनात ब्राह्मणांचे धार्मिक आणि प्रशासकीय वर्चस्व होते. धार्मिक आणि प्रशासकीय वर्चस्वाच्या मार्गाने बहुजन समाजाची पिळवणूक चालली होती. परंपरागत हिंदू धर्माच्या चौकटीच्या पकडीत सर्व समाज सापडला होता. या हिंदू धर्माच्या पारलौकिक विचारसरणीचा प्रवर्तक व समर्थक वर्ग म्हणजे ब्राह्मण वर्ग होय. बहुजन समाजावर ब्राह्मणांनी लादलेली ही मानसिक गुलामगिरी स्पष्ट करण्याकरिता ब्राह्मणांचे कसब (१८६९), गुलामगिरी (१८७३), सत्सार (अंक १ व २, १८८५) इ. निबंध लिहिले. या निबंधांमधून पुराणातील अवतारांच्या कथांचा ऐतिहासिक दृष्टीने उलगडा करण्याचा प्रयत्न केला आहे. आर्य ब्राह्मण हे मूळचे इराणचे, त्यांनी भारत जिंकला आणि येथल्या तथाकथित शूद्रातिशूद्र शूर जमातींना जिंकून त्यांना धार्मिक कर्मकांडाच्या जाळ्यात अडकवून त्यांचे सामाजिक व आर्थिक शोषण केले व ते आतापर्यंत चालू राहिले, असा भावार्थ काढला आहे. श्रमिक बहुजन समाजाच्या आर्थिक अवनतीचे उत्कृष्ट चित्र शेतकऱ्याचा आसूड या विस्तृत निबंधामध्ये फुले यांनी रेखाटले आहे. ही शेतीच्या आर्थिक दुरवस्थेची समस्या अजूनही स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ३२ वर्षे होऊन गेली तरी सुटलेली नाही. या निंबधामध्ये भारतीय ग्रामोद्योग किंवा कुटिरोद्योग ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या आर्थिक धोरणाने कसे ढासळले आहेत, याचेही हृदयविदारक वर्णन केलेले आहे. शेतीचा धंदा आधुनिक तंत्रविज्ञानावर उभारावा आणि ग्रामीण उद्योगांना आधुनिक तंत्रविद्येचा आधार द्यावा, अशी उपाययोजना फुले यांनी या निबंधात सुचविली आहे. सुमारे १०० वर्षांपूर्वी लिहिलेला हा विचार आजच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही बऱ्याच प्रमाणात लागू पडतो, ही गोष्ट ध्यानात घेण्यासारखी आहे.

सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक या निंबधात (मृत्यूनंतर प्रसिद्ध, १८९१) फुले यांनी आपल्या समग्र विचारांचे सार असलेल्या विश्वकुटुंबवादाची सुसंगत मांडणी केली आहे. हा निबंध लिहीत असताना त्यांना पक्षाघात झाला होता. अशा विकलांग अवस्थेत त्यांनी हा निबंध लिहून पुरा केला. यात स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या मुलभूत मानवी मूल्यांच्या आधारावर समाजरचना कशी असावी, हे सांगितले आहे. ज्या तत्त्वांच्या आधारावर अमेरिकन राज्यक्रांती व फ्रेंच राज्यक्रांती झाली तीच तत्त्वे या पुस्तकात भारतीय समाजरचनेच्या संदर्भात मांडली आहेत. यात सांगितलेला सत्यधर्म हा 'यूटोपिया'च होय. जगातल्या मोठमोठ्या सामाजिक व राजकीय क्रांत्या युटोपियन ध्येयवादाने प्रेरित झालेल्या दिसतात. फुले म्हणतात-''स्त्री अथवा पुरूष जे एकंदर सर्व गावच्या, प्रांताच्या, देशाच्या व खंडाच्या संबंधाने अथवा कोणत्याही धर्मातील मताच्या संबंधाने कोणत्याच प्रकारची आवड निवड न करणारे, या सर्व स्त्री पुरूषांनी या भूगोलावर आपले एक कुटुंब समजून एकमताने, एकजुटीने एकमेकांशी सत्य वर्तन करून वागावे. इतकेच काय, एकाच घरात

बौद्ध धर्मी बायको, ख्रिस्त धर्मी नवरा, इस्लाम धर्मी कन्या व सार्वजनिक सत्यधर्मी पुत्र यांना प्रेमाने नांदायला लावील तोच खरा धर्म.'' यात आर्थिक समता सूचित केली आहे आणि सर्वधर्मी समभाव स्वच्छ रीतीने मांडलेला आहे.

फुले यांनी अखंडादि काव्यरचना (१८६९) केली आहे आणि काही काव्यरचना सार्वजनिक सत्यधर्म पुस्तकामध्येही अखेरीस घातली आहे. यात निर्मात्याने केलेल्या विश्वरचनेबद्दल जिव्हाळा प्रकट झाला आहे. शब्दकळा रसाळ आहे.

जोतीराव फुले यांना त्यांच्या पत्नी सावित्रीबाई ( १८३१-९७) यांनी अनन्यभावाने आयुष्यभर सहकार्य दिले. स्त्रीमुक्तिआंदोलनाची महाराष्ट्रातील पहिली अग्रणी म्हणून महाराष्ट्राचा आधुनिक इतिहास त्यांची दखल जरूर घेईल. जोतीरावांची सगळी विचारसरणी त्यांनी आत्मसात केली होती, जोतीरावांच्या निधनानंतरही सत्यशोधक समाजाच्या आंदोलनाची धुरा त्यांनी वाहिली. त्यांनी काव्यरचनाही केली आहे. काव्यफुले (१८५४), मातुश्री सावित्रीबाई भाषणे व गाणी (१८९१), बावनकशी सुबोधरत्नाकर (१८९२), जोतिबांची भाषणे (१ ते ४-संपा.) इ. त्याचे उपलब्ध साहित्य आहे.

**पंडिता रमाबाई, (Pandita, Ramabai) : (२३ एप्रिल १८५८ — ५ एप्रिल १९२२).**

स्त्रियांच्या-विशेषतः परित्यक्त्या, पतिता व विधवांच्या-सर्वांगीण उद्धाराकरिता समर्पित भावनेने कार्यरत राहिलेली महाराष्ट्रीय विदुषी. रमा डोंगरे, पंडिता रमाबाई सरस्वती, रमाबाई डोंगरे, मेधावी, मेरी रमाबाई अशा स्थितंतरातून अतिशय खडतर आयुष्य जगलेली पंडिता रमाबाई सरस्वती बनली आणि स्त्री शिक्षणाची दीपस्तंभ ठरली.

रमाबाई यांचा जन्म अनंतशास्त्री डोंगरे व अंबाबाई डोंगरे यांच्या पोटी तेव्हाच्या म्हैसूर संस्थानातील (कर्नाटक राज्य) मंगलोरजवळ माळहेरंजी जवळील गंगामूळ नावाच्या डोंगरावरील वस्तीत झाला. अनंतशास्त्री हे त्या काळी स्त्रियांच्या बाबतीत पुरोगामी विचारांचे होते. स्त्रियांना शिक्षण द्यावे, या मताचे ते होते. लक्ष्मीबाईंस व रमाबाईंस त्यांनी वेदादींचे शिक्षण दिले. रमाबाई नऊ वर्षांच्या झाल्या, तरी त्यांचे लग्न करून दिले नाही म्हणून ज्ञातिबांधवांनी त्यांना वाळीत टाकले. रमाबाईंच्या जन्मानंतर सहा महिन्यांतच आई-वडिलांना लोकांच्या त्रासामुळे सर्व मुलांना घेऊन तीर्थयात्रेला पायी निघावे लागले. या तीर्थयात्रेच्या १५-१६ वर्षांच्या कालखंडात रमाबाईंना आई-वडिलांपासून, विशेषतः आईकडून, संस्कृत व्याकरण व साहित्याचे शिक्षण मिळाले. १८७७ साली दुष्काळात रमाबाईंचे आई-वडील वारले. रमाबाईंनी संस्कृतमध्ये प्रावीण्य मिळविले होतेच; पण मराठी, हिंदी, बंगाली आणि कन्नड भाषाही त्या अस्खलितपणे बोलू शकत होत्या. त्याचबरोबर त्यांना गुजराती, तुळू व हिब्रू या भाषाही अवगत होत्या. १८७८ साली त्यांचे बंधू श्रीनिवासशास्त्री यांच्यासह प्रवास करीत त्या कलकत्त्याला आल्या. तेथे मात्र त्यांच्या विद्वत्तेचा व बुद्धिमत्तेचा उचित गौरव झाला. कलकत्त्याच्या सिनेट हॉलमध्ये त्यांना 'पंडिता' व 'सरस्वती' या बिरुदावली बहाल करण्यात येऊन त्यांचा गौरव करण्यात आला. 'पंडिता' नावाने ओळखल्या जाणाऱ्या रमाबाई या एकमेव महिला होत. बंगाली स्त्रियांनीही त्यांना 'भारतवर्षीय स्त्रियांचे भूषण' म्हणून मानपत्र दिले.

रमाबाईंचा कलकत्ता येथे केशवचंद्र सेन यांच्याशी संबंध आला आणि हिंदू धर्माविषयी त्यांच्या मनात काहूर उठले. तत्पूर्वीही त्या हिंदू धर्माविषयी साशंक झाल्याच होत्या. रमाबाईंचा अशा रीतीने सर्वत्र सत्कार होत असतानाच त्यांच्या बंधूंचा १८८० मध्ये मृत्यू झाला. त्या आता एकाकी झाल्या; परंतु कलकत्त्यातील बिपिन बिहारीदास मेधावी या शूद्र जातीतील पदवीधर व पुरोगामी विचारांच्या वकिलांनी मागणी घातल्यानंतर त्याच वर्षी त्यांच्याशी त्यांनी विवाह केला. आंतरजातीय विवाह करून रमाबाईंनी चुकीच्या रुढींविरूद्ध बंड पुकारले होते. वैवाहिक जीवन फार काळ त्यांना लाभू शकले नाही; कारण थोड्याच दिवसांत (४ फेब्रुवारी १८८२) अल्पशा आजाराने त्यांचे पती मरण पावले. वडील, आई, बहिण, भाऊ, पती यांच्या मृत्यूनंतरही त्या खचल्या नाहीत. ३१ मे १८८२ रोजी आपली एकुलती एक मुलगी मनोरमा हिला सोबत घेऊन त्या पुण्यास येऊन स्थायिक झाल्या व त्यांनी स्वतःला पूर्णतः समाज कार्याला वाहून घेतले.

बालविवाह, पुनर्विवाहास बंदी इत्यादी घातक चालीरीती व दुष्ट रूढी यांतून समाजास मुक्त करण्याच्या उद्देशाने त्यांनी १८८२ मध्ये प्रथम पुणे येथे व नंतर अहमदनगर, सोलापूर, ठाणे, मुंबई, पंढरपूर, बार्शी इत्यादी ठिकाणी 'आर्य

महिला समाजा'ची स्थापना केली. त्यामार्फत त्यांनी पुरोगामी विचाराची पेरणी सुरू केली. त्यांनी याच वर्षी स्त्रीयांसंदर्भातील स्त्रीधर्मनीति नामक पुस्तक लिहिले. मे १८८३ मध्ये स्त्रियांच्या उद्धाराकरिता अधिक प्रभावी कार्य करता यावे म्हणून इंग्रजी भाषा व वैद्यक या विषयांच्या शिक्षणाकरिता त्या कन्या मनोरमेसह इंग्लंडला गेल्या. हा प्रवासखर्च त्यांनी स्त्रीधर्मनीति या पुस्तकाच्या विक्रीतून केला. इंग्लंडमध्ये त्या वाँटिज गावच्या सेंट मेरी या मठात राहिल्या. येशू ख्रिस्ताच्या पतित स्त्रियांबाबतच्या दृष्टिकोणामुळे, तसेच भूतदया व प्रेमाच्या शिकवणीने त्या ख्रिस्ती धर्माकडे आकर्षित झाल्या. परिणामतः २९ सप्टेंबर १८८३ रोजी वाँटिज येथील चर्चमध्ये त्यांनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. त्यामुळे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या बरोबरच सनातनवादी विचारवंतांचा त्यांनी रोष ओढवून घेतला. त्यांना हिंदू धर्मातील मूर्तिपूजा, पुजाऱ्यांचा दांभिकपणा, देवापर्यंत पोहोचवण्यास लागणारे मध्यस्थ हे त्यांना मान्य नव्हते. मुक्तीसदन बांधण्यापासून ते पूर्ण होऊन त्यांचे कार्य सुरू होईपर्यंत आणि त्यानंतरही रमाबाई पूर्णपणे ख्रिस्तावर विसंबून होत्या. म्हणूनच मुक्ती सदन अथवा मुक्तीमिशन हे रमाबाईंच्या प्रभुवरील प्रगाढ श्रद्धेचे प्रतिक होते. १९१३ मध्ये मुक्ती सदन येथे रमाबाईंच्या कन्या मनोरमा या अंध विद्यार्थ्यांना ब्रेल लिपीतून शिकवित असत. त्यावरून त्यांचे मानवतावादी कार्य समोर येते.

आनंदीबाई जोशी यांच्या ६ मार्च १८८६ रोजी होणाऱ्या पदवीदान समारंभास हजर राहता यावे म्हणून त्या फेब्रुवारी १८८६ मध्ये अमेरिकेस गेल्या. हिंदुस्थानातील बालविधवांना उपयुक्त होणारी 'बालोद्यान शिक्षणपद्धती' त्यांनी शिकून घेतली व त्यासंबंधी मराठी पुस्तके लिहिली. अमेरिकेतील आपल्या वास्तव्यात हिंदू बालविधवांच्या प्रश्नाचा ऊहापोह करणारे द हायकास्ट हिंदू वूमन (१८८७-८८) हे इंग्रजी पुस्तक त्यांनी लिहिले. स्त्रियांच्या शोषणाच्या मुळाशी असलेल्या पुरुषप्रधान व्यवस्थेची कठोर चिकित्सा रमाबाईंनी त्यांच्या या पुस्तकात केली आहे. एवढेच नव्हे, तर त्या काळातील संपूर्ण देशातील आणि त्यातही महाराष्ट्रातील भौतिक, वैचारिक तसेच सांस्कृतिक व्यवहार ज्या पुरुषप्रधानतेच्या पायावर उभे होते, त्या पुरुषप्रधानतेचे सखोल विश्लेषण, चिकित्सा आपल्याला रमाबाईंच्या या ग्रंथात अभ्यासण्यास मिळते. त्यांच्या विचाराने अमेरिकन प्रभावित झाले. १८८९ मध्ये यूनायटेड स्टेट्सची लोकस्थिती व प्रवासवृत्त हे पुस्तक त्यांनी प्रसिद्ध केले. हिंदुस्थानातील बालविधवांच्या कार्यात मदत करण्यासाठी अमेरिकनांनी बॉस्टन येथे 'रमाबाई असोसिएशन' व इतरही काही संस्था निर्माण केल्या. मुळ हिब्रू भाषेतील बायबलचे त्यांनी मराठीत भाषांतर केले.

रमाबाई अमेरिकेहून परत आल्यानंतर ११ मार्च १८८९ रोजी मुंबईला विधवांकरिता 'शारदा सदन' नावाची संस्था काढली. त्यांनी अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनाकरिता स्त्रीप्रतिनिधित्वाचा पुरस्कार केला. केशवपनाविरुद्ध त्यांनी प्रचार केला व संमती वयाच्या चळवळीस पाठिंबाही दिला. नोव्हेंबर १८९० मध्ये 'शारदा सदन' पुण्यात आणण्यात आले. 'शारदा सदन' मध्ये प्रत्येक मुलीला धर्माचे स्वातंत्र्य दिले होते. तरीही गैरसमजातून झालेल्या विरोधामुळे त्यांना आपल्या कार्याचे मुख्य केंद्र केडगाव (जि. पुणे) येथे हलवावे लागले. २४ सप्टेंबर १८९८ रोजी केडगावला 'मुक्तिसदना'चे उद्‌घाटन करण्यात आले. १८९७ मध्ये मध्य प्रदेशात व १९०० मध्ये गुजरातमध्ये पडलेल्या दुष्काळात निराश्रित झालेल्या स्त्रियांना त्यांनी या आश्रमात आश्रय दिला. त्यात ३०० हून अधिक उच्चवर्णीय स्त्रिया होत्या. तत्पूर्वी १८९८ साली रमाबाई जानेवारी ते ऑगस्ट या कालावधीत पुन्हा अमेरिकेत जाऊन आल्या. त्यांच्या सांगण्यावरून 'रमाबाई असोसिएशन' बंद करण्यात येऊन 'अमेरिकन रमाबाई असोसिएशन' ही नवी संस्था स्थापन करण्यात आली आणि 'शारदा सदन' ही संस्था ख्रिस्ती संस्था म्हणून काम करणार असल्याचे जाहीर करण्यात आले. अमेरिकेहून परत आल्यानंतर त्यांनी आपल्या कार्याचे क्षेत्र वाढविले. 'कृपासदना'ला जोडून एक रुग्णालय बांधण्यात आले. त्यांनी स्थापन केलेल्या 'प्रीतिसदन', 'शारदा सदन', 'शांतिसदन' या सदनांमधून निरनिराळ्या गटांचे लोक राहत. आपल्या आश्रमातील स्त्रियांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे म्हणून रमाबाईंनी शारीरिक श्रमाचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी आश्रमातील स्त्रियांना शेती, विणकाम, मुद्रणकाम इत्यादी कामे शिकविली. 'मुक्तिसदना'त धान्य, भाजीपाला, फळफळावळ यांचे मुलींच्या साह्याने उत्पन्न काढण्यात येई. दुर्बल व आजारी लोकांकरिता 'सायं घरकुला'

ची व्यवस्था त्यांनी केली. १९१९ मध्ये रमाबाईंना त्यांच्या या समाजकार्याबद्दल ‘कैसर-ई-हिंद’ हे सुवर्ण पदक देण्यात आले.

अबला स्त्रीयांची मागासलेल्या हालाखिची परिस्थिती, पुरुष व अन्य महिलांकडून त्यांची होणारी पिळवणूक, अनिष्ट रूढी व परंपरा यांविरूद्ध त्यांनी आवाज उठवला. कुमारी मातांसाठी केंद्र, स्त्री साहाय्यता केंद्र, गरीब मुलींसाठी शाळा असे अनेक उपक्रम राबवून त्यांनी स्त्री शिक्षणाची चळवळ पुढे चालू ठेवली. महाराष्ट्रात नऊवारी ऐवजी पाचवारी साडी नेसण्यास महिलांनी सुरुवात करण्यामागे पंडिता रमाबाई यांचे प्रयत्न होते. हा फक्त कपड्यापुरता मुद्दा नव्हता, तर स्त्री स्वातंत्र्य व स्वनिर्णयाचा हक्क हे मुद्दे महत्त्वाचे होते.

रमाबाई आपल्या वडिलांप्रमाणेच काळाच्या पुढे होत्या. अत्यंत बुद्धिवान असलेल्या या महिलेचे अंतःकरण अत्यंत उदार व दीनदुबळ्या स्त्रियांकरिता सतत तळमळणारे होते. वैयक्तिक दुःखांची किंवा अडचणींची पर्वा त्यांनी कधीच केली नाही. त्यांनी जरी दीनदुबळ्यांच्या सेवेचे व्रत स्वीकारले, ख्रिस्ती धर्म स्वीकारला, तरी कोणताही विशिष्ट ख्रिस्ती धर्मपंथ त्यांनी स्वीकारला नाही. त्या धर्माने ख्रिस्ती झाल्या; मात्र त्यांनी हिंदू समाज व संस्कृती कधी सोडली नाही. शेवटपर्यंत त्या शाकाहारी राहिल्या. त्यांनी सतत खादी वापरली व आश्रमवासींनाही ते वापरायला लावली. स्त्रियांच्या उद्धाराकरिता त्यांनी आजन्म व अथकपणे केलेले प्रयत्न त्यांच्या समर्पित जीवनाचेच एक अंग होते. ज्या व्यक्तींनी आपल्या सेवेने भारताची प्रतिष्ठा वाढविली त्यांमध्ये रमाबाईंचे स्थान वैशिष्टपूर्ण आहे.

रमाबाईंचे महत्त्वपूर्ण पुस्तके खालीलप्रमाणे आहेत : स्त्रीधर्मनीति (१८८२); द हायकास्ट हिंदू वूमन (१८८७-८८); इबरी (भाषेचे) व्याकरण (१९०८); नवा करार (१९१२); बायबल (मराठी भाषांतर); प्रभू येशू चरित्र (१९१३); भविष्यकथा (२ री आवृ. १९१७); अ टेस्टिमनी, मुक्ति प्रेअर बेल अँड न्यूज लेटर्स, फॅमिन – एक्स्पिरिअन्स इन इंडिया इत्यादी.

दुसऱ्यांकरिता अविरत कष्ट करणाऱ्या या समाजसेविकेचे व्यक्तिगत जीवन मात्र फार दुःखी होते. त्यांच्या मुलीचे २४ जुलै १९२१ रोजी मिरज येथे श्वासोच्छवास व हृदयविकाराच्या आजाराने निधन झाले. शेवटच्या काळात रमाबाईंनी केडगाव मिशनमध्ये अनाथ स्त्रियांसाठी नवे जग उभारण्याचा प्रयत्न केला; मात्र लवकरच केडगाव येथे रमाबाईंचेही निधन झाले.

भारताच्या स्त्री शिक्षणाची गंगोत्री म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतातील पहिल्या मुख्याध्यापिका सावित्रीबाई जोतीराव फुले यांच्याविषयी आज आपण जाणून घेणार आहोत. त्यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील नायगाव येथे ३ जानेवारी, इ.स. १८३१ रोजी झाला. आईचं नाव लक्ष्मीबाई तर वडिलांचं नाव खंडोजी नेवसे पाटील होते. त्यांचे वडील गावाचे पाटील होते. स्त्री स्वातंत्र्य औषधालाही नसलेल्या समाजात व काळात सावित्रीबाईंचा जन्म झाला. सावित्रीबाई या ९ वर्षांच्या असताना इस १८४० मध्ये त्यांचा विवाह १३वर्षे वयाच्या महात्मा जोतिबा फुले यांच्याशी झाला.

भारताच्या स्त्री शिक्षणाची गंगोत्री म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतातील पहिल्या मुख्याध्यापिका सावित्रीबाई जोतीराव फुले यांच्याविषयी आज आपण जाणून घेणार आहोत. त्यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील नायगाव येथे ३ जानेवारी, इ.स. १८३१ रोजी झाला. आईचं नाव लक्ष्मीबाई तर वडिलांचं नाव खंडोजी नेवसे पाटील होते. त्यांचे वडील गावाचे पाटील होते. स्त्री स्वातंत्र्य औषधालाही नसलेल्या समाजात व काळात सावित्रीबाईंचा जन्म झाला. सावित्रीबाई या ९ वर्षांच्या असताना इस १८४० मध्ये त्यांचा विवाह १३वर्षे वयाच्या महात्मा जोतिबा फुले यांच्याशी झाला.

लहानपणापासून ज्योतिबांना जातीयतेचे चटके बसले होते. अस्पृश्याचे हाल पाहून ज्योतिबांचे काळीज पिळवटून निघत असे. अशा अमानुष रुढी-परंपरा व कर्मकांडाविरुद्ध ज्योतिबांचे मन पेटून उठले. ज्योतिबांच्या मनातील पेटत्या ज्योतिला प्रज्वलीत करण्याचे कार्य सावित्रीनेच केले व ती खऱ्या अर्थाने सामाजिक क्रांतीची प्रखर ज्योत झाली. शिक्षणाच्या

प्रसारासाठी अन्य सामाजिक क्षेत्रांतही काम करणे गरजेचे आहे, स्त्रियांचा आत्मविश्वास वाढवणे गरजेचे आहे हे सावित्रीबाईंनी ओळखले. त्यानंतर महाराष्ट्रातील स्त्रीशिक्षणाच्या आरंभिक टप्प्यात त्यांचे पती जोतिबा फुले यांच्यासह त्यांनी मोठी कामगिरी बजावली.

लै १८८७मध्ये ज्योतिराव फुले यांना पक्षाघाताचा आजार झाला. २८ नोव्हेंबर १८९० रोजी ज्योतिरावांचे त्या आजारात निधन झाले. अत्यंयात्रेच्यावेळी जो टिटवे धरतो त्याला वारसा हक्क मिळत असल्याने ज्योतिरावाचे पुतणे आडवे आले आणि ज्योतिरावांचा दत्तक पुत्र यशवंतरावांना विरोध करू लागले. त्यावेळेस सावित्रीबाई धैर्याने पुढे आल्या व स्वत: टिटवे धरले. अंत्ययात्रेच्या अग्रभागी चालल्या आणि स्वत:च्या हाताने ज्योतिरावांच्या पार्थिवाला अग्नी दिला. यशवंतराव हा विधवेचा मुलगा असल्याने त्याला कुणीही मुलगी द्यायला तयार नव्हते. तेव्हा कार्यकर्ता ज्ञानोबा कृष्णाजी ससाणे यांच्या राधा नावाच्या मुलीशी ४ फेब्रुवारी १८८९ रोजी विवाह यशवंतचा करून दिला. हाच महाराष्ट्रातील पहिला आंतरजातीय विवाह होय.

भारताच्या स्त्री शिक्षणाची गंगोत्री म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतातील पहिल्या मुख्याध्यापिका सावित्रीबाई जोतीराव फुले यांच्याविषयी आज आपण जाणून घेणार आहोत. त्यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील नायगाव येथे ३ जानेवारी, इ.स. १८३१ रोजी झाला. आईचं नाव लक्ष्मीबाई तर वडिलांचं नाव खंडोजी नेवसे पाटील होते. त्यांचे वडील गावाचे पाटील होते. स्त्री स्वातंत्र्य औषधालाही नसलेल्या समाजात व काळात सावित्रीबाईंचा जन्म झाला. सावित्रीबाई या ९ वर्षांच्या असताना इस १८४० मध्ये त्यांचा विवाह १३ वर्षे वयाच्या महात्मा जोतिबा फुले यांच्याशी झाला.

लहानपणापासून ज्योतिबांना जातीयतेचे चटके बसले होते. अस्पृश्याचे हाल पाहून ज्योतिबांचे काळीज पिळवटून निघत असे. अशा अमानुष रुढी-परंपरा व कर्मकांडाविरुद्ध ज्योतिबांचे मन पेटून उठले. ज्योतिबांच्या मनातील पेटत्या ज्योतिला प्रज्वलीत करण्याचे कार्य सावित्रीनेच केले व ती खऱ्या अर्थाने सामाजिक क्रांतीची प्रखर ज्योत झाली. शिक्षणाच्या प्रसारासाठी अन्य सामाजिक क्षेत्रांतही काम करणे गरजेचे आहे, स्त्रियांचा आत्मविश्वास वाढवणे गरजेचे आहे हे सावित्रीबाईंनी ओळखले. त्यानंतर महाराष्ट्रातील स्त्रीशिक्षणाच्या आरंभिक टप्प्यात त्यांचे पती जोतिबा फुले यांच्यासह त्यांनी मोठी कामगिरी बजावली.

जुलै १८८७मध्ये ज्योतिराव फुले यांना पक्षाघाताचा आजार झाला. २८ नोव्हेंबर १८९० रोजी ज्योतिरावांचे त्या आजारात निधन झाले. अत्यंयात्रेच्यावेळी जो टिटवे धरतो त्याला वारसा हक्क मिळत असल्याने ज्योतिरावाचे पुतणे आडवे आले आणि ज्योतिरावांचा दत्तक पुत्र यशवंतरावांना विरोध करू लागले. त्यावेळेस सावित्रीबाई धैर्याने पुढे आल्या व स्वत: टिटवे धरले. अंत्ययात्रेच्या अग्रभागी चालल्या आणि स्वत:च्या हाताने ज्योतिरावांच्या पार्थिवाला अग्नी दिला. यशवंतराव हा विधवेचा मुलगा असल्याने त्याला कुणीही मुलगी द्यायला तयार नव्हते. तेव्हा कार्यकर्ता ज्ञानोबा कृष्णाजी ससाणे यांच्या राधा नावाच्या मुलीशी ४ फेब्रुवारी १८८९ रोजी विवाह यशवंतचा करून दिला. हाच महाराष्ट्रातील पहिला आंतरजातीय विवाह होय.

१८९७मध्ये पुण्यात प्लेगच्या साथीने थैमान घातला होता. हा जीवघेणा आजार अनेकांचे जीव घेत होता. त्यातून उद्‌भवणारे हाल ओळखून प्लेग पीडितांची सेवा करताना सावित्रीबाईंनाही प्लेग झाला. यातच १० मार्च १८९७ रोजी वयाच्या ६६व्या वर्षी त्यांची प्राणज्योत मालवली.

सावित्रीबाईंच्या सामजिक कार्याबद्दल कृतज्ञता म्हणून १९९५ पासुन ३ जानेवारी हा सावित्रीबाईचा जन्मदिन हा बालिकादिन म्हणून साजरा केला जातो. सावित्रीबाईंना ज्ञानज्योती, क्रांतिज्योती या टोपण नावाने देखील ओळखले जाते.

१ जानेवारी, इ.स. १८४८ रोजी पुण्यात बुधवार पेठेतील भिडेवाड्यात जोतीरावांनी मुलींची शाळा काढली. या शाळेत सावित्रीबाईंची शिक्षिका म्हणून नेमणूक करण्यात आली होती. यामुळे सावित्रीबाईंना पहिल्या भारतीय शिक्षिका

म्हंटले जाते.
२) इ.स. १८४८ ते १८५२पर्यंत त्यांनी एकूण १८ शाळा काढल्या.
३) इ.स. १८५४ साली त्यांचा ‘काव्यफुले’ हा पहिला कवितासंग्रह प्रकाशित झाला.
४) २८ जानेवारी १८६३ साली स्वतःच्या घरात बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना करून एक प्रसूतिगृहही सुरू केले. बालहत्या प्रतिबंधगृह जोतीरावांनी सुरु केले असले तरी त्याच्या देखरेखीची संपूर्ण जबाबदारी सावित्रीबाईंवर होती.
५) १८७६—७७ च्या दुष्काळात त्यांनी खूप कष्ट केले.
६) इ.स. १८९३ साली सासवड येथे झालेल्या ‘सत्यशोधक परिषदे’चे अध्यक्षपद सावित्रीबाईंनी भूषविले.
७) इ.स. १८९६ सालातल्या दुष्काळात सावित्रीबाईंनी समाजाला सत्कार्याचा आदर्श घालून दिला. पोटासाठी शरीरविक्रय करणाऱ्या बाया-बापड्यांना दुष्टांच्या तावडीतून सोडवून त्यांनी त्यांना सत्यशोधक कुटुंबांत आश्रयास पाठविले. त्यांच्या कार्याला हातभार म्हणून पंडिता रमाबाई, गायकवाड सरकार अशा लोकांनी मदतीचा हात पुढे केला.

काव्यफुले (काव्यसंग्रह) —सावित्रीबाईंचीगाणी (१८९१) — सुबोध रत्नाकर — बावनकशी ही पुस्तके सावीत्रीबाईंची प्रकाशित झाली आहेत.

त्याकाळी बालविवाहामुळे अनेक मुली गरोदर असताना विधवा झाल्या. त्यांच्याकरिता या फुले दाम्पत्याने १८६३ रोजी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना करून एक प्रसूतिगृहही सुरू केले. केशवपनाविरुद्ध नागरिकांना संघटीत करून नाभिकांचा संप घडवून आणण्याचा कल्पक उपक्रम कामगार नेते नारायण मेघाजी लोखंडे यांनी केला. त्यामागची प्रेरणा सावित्रीबाईंचीच होती. इतकेच नव्हे तर विधवा आईच्या पोटी जन्म घेणाऱ्या यशवंतला दत्तक घेऊन सावित्रीबाईंनी त्याला डॉक्टर केले.